मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.


१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका



युगवाणी

ऑगस्ट'९१


अनुक्रमणिका



मोवाड पूरग्रस्तांकरता विदर्भ साहित्य संघाने अल्पसा रु. ५००१/- चा निधी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना. श्री. सुधाकरराव नाईक यांच्या स्वाधीन केला. विदर्भ साहित्य संघाचे सरचिटणीस श्री. मनोहर म्हैसाळकर यांनी या रकमेचा धनादेश मुख्यमंत्र्यांच्या स्वाधीन केला.

विदर्भ साहित्य संघाच्या नियोजित सांस्कृतिक संकुलाबाबतची योजना जाणून घेऊन त्याकरता सर्व यथोचित सहकार्य करण्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी विदर्भ साहित्य संघास त्यांच्या भेटीच्या निमित्त आयोजित छोट्याशा समारंभात दिले.

विदर्भ साहित्य संघापुढील समस्या जाणून घेऊन त्या दूर सारण्याकरता व या संस्थेतील कार्याच्या विकासाकरता मुख्यमंत्र्यांनी अगोदरच दिलेले आश्वासन या भेटप्रसंगी दहा लाख रु. चा धनादेश वि.सा. संघाचे अध्यक्ष प्रा. सुरेश द्वादशीवार यांना सोपवून पूर्ण केले.



युगवाणी

॥ विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र ॥

संपादक : श्रीपाद भालचंद्र जोशी

प्रबंध संपादक : केशव जोशी

॥ भाषा, साहित्य, संस्कृती, संवाद व कलाविषयक अभिरुचीचे जोपासन–संवर्धन–संशोधन ॥

वर्ष सत्तेचाळीसावे/अंक ४७-८ व ४७-९ ऑगस्ट / १९९१

मूल्य–१० रु./वार्षिक वर्गणी : ९० रु.

त्रैवार्षिक वर्गणी १२९ रु.

अनुक्रम ■ ■

[महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाकडून अंशतः अनुदान प्राप्त]

आवरण पृष्ठ / संजय धोतरकर
रेखाटने : अरुण मोरघडे / के. भाऊ समर्थ / संदीप राशिनकर / राजू महाजन
मुद्रित शोधन / संकलन / प्रतिलिपी इ. सहकार्य : सौ. शोभा उबगडे / श्यामकांत कुळकर्णी

जाहिरात विभाग : प्रवीण वर्दापूरकर, आमंत्रक, प्रकल्प विभाग,

संपादकीय पत्रव्यवहार ,। संपादक / युगवाणी, विदर्भ साहित्य संघ, / झाशी राणी चौक / नागपूर – १२

– दुरुस्ती –

- कृपया पृ. क्र. १५ स्तंभ –१, परिच्छेद–२, ओळ ३, मध्ये 'प्रा. श्री. सौ.' या ऐवजी ' श्री. व सौ. असे वाचावे.
- त्याच परिच्छेदातील ओळ–९ ' इगळे ' ऐवजी ' इंगळे ' असे व ' ता ' ऐवजी ' प्रा. असे वाचावे.
- पृ. –६७, उपकर्ते सभासद यातील क्र. ८ पुढील ओळीतील मजकूर " विदर्भ साहित्य संघाला लाभलेल्या उपरोक्त उपकर्त्या सभासदांनी केलेल्या सहकार्याबद्दल विदर्भ साहित्य संघातर्फे त्यांचे आभार मानून विदर्भ साहित्य संघ आपल्या परिवारात त्यांचे स्वागत करीत आहे. " असा वाचावा.



विशेष !

वाङ्‌मयीन नियतकालिकांच्या इतिहासात प्रथमच शासकीय पातळीवर या नियतकालिकांच्या, अस्तित्वाची, जीविताची व त्यांचे संपुष्टात येणे थांबविण्याची स्वतंत्रपणे दखल घेण्यात आलेली आहे. महाराष्ट्र शासनाच्या वतीने शिक्षणमंत्री डॉ. पतंगराव कदम यांनी या प्रकरणी विधान परिषदेत या नियतकालिकांच्या समस्या संबंधाने विचार करण्याकरिता समिती नेमण्याचे आश्वासन दिलेले होते. मराठीतील प्रख्यात लेखक – कवी असणारे विधानपरिषद सदस्य श्री. लक्ष्मण माने व श्री. ना. धों. महानोर तसेच ज्येष्ठ लेखिका डॉ. सरोजिनी बाबर यांचा समावेश असणारी एक समिती नेमण्याची घोषणा नुकतीच करून शासनाने या आश्वासनाची त्वरित पूर्ती देखील केलेली आहे. महाराष्ट्र शासनाचे त्याबद्दल अभिनंदन !

श्री. लक्ष्मण माने व श्री. ना. धों. महानोर यांनी गेल्यावर्षीच्या नागपूर अधिवेशनाचे वेळी विदर्भ साहित्य संघास भेट देऊन वाङ्‌मयीन नियतकालिकांच्या उपजीविकेच्या समस्या व त्यांच्या कायम अस्तित्वाकरता संभाव्य उपाययोजना याकरता 'युगवाणी'ने आपल्या नव्या संपादकीय कारकीर्दीच्या सुरुवातीपासूनच चालविलेली विस्तृत व्यापक मोहीम व या संबंधीच्या २७ मार्च '९० रोजी युगवाणीने विदर्भ साहित्य संघात आयोजिलेल्या वाङ्‌मयीन नियतकालिक विकास परिषदेतील मराठीतील वाङ्‌मयीन नियतकालिकांचे संपादक, प्रकाशक व संबंधित प्रतिनिधींच्या सूचना, ठराव, मागण्या इ. सारे सविस्तरपणे समजावून घेतले होते. ही सामुग्री सोबत घेऊन, या संबंधाने लक्ष वेधण्याकरता नागपूर अधिवेशनाचे वेळीच विधान परिषदेत हा विषय मांडण्याची सूचना त्यांनी दिलेली होती. लेखन–कला–वाङ्‌मय विश्वाचे विधानपरिषदेवरील आपले प्रतिनिधित्व हा विषय धसास लावून त्यांनी सार्थ केल्याबद्दल युगवाणीतर्फे त्यांचे अभिनंदन !

युगवाणीचा या अगोदरचा जुलै १९९१ चा अंक हा या नियतकालिकांच्या समस्या व त्यावरील उपाययोजना यांनाच वाहिलेला व त्याकरता २७ मार्च '९० रोजी आयोजित वाङ्मयीन नियतकालिक विकास परिषदेचा समग्र वृत्तांत, त्यातील विविध चर्चासत्रांतील मान्यवरांचे निबंध, टिपणे तसेच परिषदेने केलेल्या मागण्या, सूचना यांचा एकत्र समावेश असणारा विशेषांकच आहे. तसेच या समस्येला या प्रकारची वाचा प्रथमच फोडण्याचा प्रयत्न करणारे पहिले संपादकीय असणारा युगवाणीचा एमेजू-८९ व दुसरे संपादकीय असणारा जुऑस-८९ च्या अंकात या नियतकालिकांच्या संबंधातील सर्वांगीण चर्चा करून विकासाच्या प्रक्रियेतील साधनसामुग्री म्हणून असणारे त्यांचे स्थान देखील स्पष्ट केलेले आहे. वाङ्मयीन नियतकालिकांसंबंधाने शासनाकडून अपेक्षित बाबींची व संबंधित उपाययोजनेची विस्तृत चर्चा देखील त्यात आलेली आहे. त्याच अंकातील इतर संबंधित मान्यवरांची टिपणे, लेख देखील अतिशय उद्बोधक व याबाबतच्या समस्यांवर प्रकाश टाकणारे आहेत. युगवाणीच्या या तीनही अंकातील ही सर्व सामुग्री महाराष्ट्र शासनाने नेमलेल्या या संबंधीच्या समितीकडे वाङ्मयीन नियतकालिकांच्या वतीने युगवाणी पाठवीत आहेच. ही समिती त्यावर विचार करून या संबंधीच्या मागण्यांची पूर्ती त्यात सुचविलेल्या उपाययोजना, सूचना व मान्यवरांचे मार्गदर्शन या आधारे करण्याचे महाराष्ट्र शासनास सुचवील व केवळ महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या तुटपुंज्या अनुदानावरील हलाखीचे जीवन देखील अधून-मधून जगणाऱ्या या नियतकालिकांना यापुढे स्वतःच्या पायावर उभे होण्याकरता आवश्यक पूर्वस्थितीचे बळ प्रदान करील अशी अपेक्षा या समितीकडून या नियत-कालिकांची निश्चितच आहे.

श्री. ना. धों. महानोर, श्री. लक्ष्मण माने, डॉ. सरोजिनी बावर व महाराष्ट्र शासन यांचेकडून हे ऐतिहासिक महत्त्वाचे कार्य घडेलच अशी आशा करू या !

श्रीपाद भालचंद्र जोशी

सप्त समुद्र

तिथे पलिकडे आहेत
राजहंसांचे हिमशुभ्र थवे,
अथांग अवकाशात आहेत
तिथे तेजाळणारे चंद्र,
काळाच्या मातीत तिथे आहेत
अमृताचे अनिरुद्ध झरे,
निळ्या जांभळ्या गुलाबांचे ताटवे आहेत
क्षितिजापर्यंत तिथे;
" श्रद्धा, आशा आणि औदार्य "
ह्यांची आहेत तिथे कोवळी उन्हे,
करुणेचे सप्तसमुद्र आहेत तिथे—
त्याच्या रुधिरातून उचंबळते !

मनोहर चिंतामणि वझे

कविवर्य यादव मुकुंद पाठक : मूल्यभावाचे विविधांगी चित्रण

: डॉ. आशा सावदेकर

स्वातंत्र्यपूर्व काळातील साहित्यिक, कवी, वाङ्मयसेवक व शिक्षणक्षेत्रातील निरलस सेवा करणारे विद्याप्रेमी म्हणून यादव मुकुंद पाठक यांचे नाव महत्त्वपूर्ण आहे. ते नुसते कवी, कलावंत वा कलाप्रेमी नव्हते; तर भोवतालची अभिरुची घडवीत राहणे हा त्यांचा छंद होता. विदर्भाच्या शिक्षणक्षेत्रात त्यांनी मोलाचे कार्य केले. नागपूर येथे स्त्रियांसाठी स्वतंत्र महाविद्यालय असावे हे स्वप्न त्यांनी साकार केले. १९३० ते १९४० या कालखंडात विदर्भाच्या वाङ्मयीन चळवळीत रस घेऊन 'विहंगम' मासिकाचे संपादक या नात्याने त्यांनी आपल्या वाङ्मयाभिरुचीच्या सगळ्या कल्पना प्रत्यक्षात उतरविण्याचा प्रयत्न केला. विदर्भ साहित्य संघाच्या 'युगवाणी' या मुखपत्राचे संपादनही त्यांनी काही काळ केले होते. प्राध्यापक, कवी, टीकाकार, संपादक आणि सामाजिक कार्यकर्ता अशा विविध भूमिकांमधून त्यांनी केलेली कामगिरी मोलाची आहे.

शशिमोहनचा 'तो' काळ

पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजात काही तरुणांनी या. मु. पाठक यांच्या प्रेरणेने एकत्र येऊन 'विहंगमवृंद' मंडळाची निर्मिती केली होती. श्री. नि. चापेकर, या. मु. पाठक, अमृत मु. पाठक, ना. ना. हूड, व्यंकटेश वकील ही कविमंडळी त्यात होती. त्यांनी 'पिंपळपान' हा चिमुकला कवितासंग्रह प्रकाशित करून तत्कालीन वैदर्भीय कवींच्या कवितेचे संकलन प्रथम काव्यरसिकांपुढे आणले. या मु. पाठक कवी म्हणून खरे प्रसिद्धीस आले ते त्यांच्या 'शशिमोहन' या खंडकाव्यामुळे. माधवराव पटवर्धन, गिरीश, यशवंत यांच्या खंडकाव्यांचा तो कालखंड होता. भावोत्कटता अत्यंत महत्त्वाची मानणाऱ्या रविकिरणमंडळाच्या प्रभावाच्या काळात या. मु. पाठक यांनी नाट्य आणि भावोत्कटता यापेक्षाही समाजातील एक जळजळता प्रश्न महत्त्वाचा मानला. स्त्रीच्या सौंदर्याने कामांध होऊन साध्वीस भ्रष्ट करू पाहणाऱ्या दुष्टांचे निर्दालन हा त्यांच्या प्रतिभेचा विषय बनला. बंगालमधील एका सत्यघटनेवर आधारित असा हा कथाभाग. त्यात दुसरा एक पदर शोषक आणि शोषित यांच्या संघर्षाचाही आहे. दुर्बल, दरिद्री पण सौंदर्यवती हिंदू स्त्री आणि मुसलमान, धनिक जमीनदार यामधील आणि-अन्यायाविरुद्ध अगतिक होणाऱ्या दुबळ्या जीवाच्या मनातील-असा दुहेरी सूक्ष्म संघर्ष यात आहे. चारित्र्याचे पालन करणाऱ्या दरिद्री पवित्रेचे मन आणि तिच्यासाठी धावून येणाऱ्या कोवळ्या शशिमोहनचे धारिष्ट्य यांचा गौरव या. मु. पाठक करतात.

'मॉडर्न रिव्ह्यू'च्या जुलै १९२७ च्या अंकात एक सत्यकथा वाचून त्यांना हे खंडकाव्य रचण्याची स्फूर्ती झाली. सात-सात ओळींच्या १४३ बंधांमध्ये हे काव्य सामावले आहे. पहिल्या दोन व शेवटच्या दोन ओळी २७ मात्रांच्या असून तीन ओळींचा अंतरा २१ मात्रांचा आहे. प्रयोगाच्या दृष्टीने या खंडकाव्याचा आकारही वैशिष्ट्यपूर्ण आहे. सत्यकथेवर आधारित काल्पनिक वर्णन यात आले आहे; त्यामुळे वास्तव सामाजिकतेपासून हे काव्य थोडे दूर गेले आहे. नायिका पवित्राबद्दल सहानुभूती, फैजअल्लीविरुद्ध संताप आणि शशिमोहनचा गौरव या भावना वाचकाच्या मनात निर्माण होतात, पण कथा वा घटनाप्रसंग यांच्या कुशल मांडणीकडे या. मु. पाठक यांनी जास्त कसोशीने लक्ष पुरविलेले नाही. त्यामुळे 'हेतुदृष्टचा काव्याची प्रमाणबद्धता बिघडली आहे, अशी टीकाही त्यावर करण्यात आली. (अर्वाचीन मराठीतील खंडकाव्ये, ह. कि तोडमल, कॉन्टिनेंटल, पुणे, १९७४, आ. २ री, पृ. ३५६) खरे तर हे काव्य लिहिताना या. मु. पाठक यांच्या मनात विशिष्ट हेतू होता आणि तो हेतू जितका सामाजिक तितकाच भावनांना आवाहन करणारा होता. आपल्या मनोगतात तो त्यांनी स्पष्ट करून

ठेवलेला आहे. ते म्हणतात, – "प्रस्तुत काव्याने जगातील सारे पाप पाठीस पाय लावून पळून जाईल असे मला वाटत नाही. तथापि हे काव्य वाचून एखाद्याने जरी संकटात सापडलेल्या अबलेचे नरपशूपासून रक्षण केले, अथवा "या पतिव्रता मी करिन सर्व पापिणी" असा ज्याचा निर्धारच झालेला आहे अशा एखाद्या पातक्याला उपरती होऊन तो जर सदाचारी झाला, तर या काव्याच्या प्रकाशनाचे सार्थक झाले असेच मला वाटेल. पातिव्रत्याचे महात्म्य जगास कळावे आणि साध्वीस भ्रष्ट करू पाहणाऱ्या दुष्टास देहदंडच दिला पाहिजे या परमोच्च सनातन तत्त्वाची अखिल समाजास आणखी एकदा जिव्हाळ्याची आठवण करून द्यावी. एवढाच या काव्याचा उद्देश आहे." (शशिमोहन, या. मु. पाठक, 'मनोगत', कॉन्टिनेंटल, पुणे, १९७८, चौथी आवृत्ती, पृ. ८.)

दीर्घ कथा–कवितेचे धाडस !

ज्या काळात भावगीताचा आकार लहान होऊ लागला होता, कविता ही लांबलचक नाही हा हा तिचा गुण मानला जात होता, त्या काळात वैचारिक दृष्टी ठेवणारी, भावनेला वळ मानणारी पण विशिष्ट हेतूने प्रेरित झालेली दीर्घ कथा-कविता लिहिणे हे धाडस होते. त्या काळात 'शशिमोहन'ची निर्मिती झाली आहे. (१९२९) हे विसरता कामा नये या. मु. पाठकांच्या स्फुट कवितेपेक्षा 'शशिमोहन' हीच त्यांची खरी ओळख आहे.

'शशिमोहन'मध्ये फैजअलीच्या दुष्टाव्याचे वर्णन करताना पापाची परिसीमा झाल्यावरही देव का अवतार घेत नाही अशी पृच्छा कवी करतात. इथे हेही स्पष्ट व्हावे की लोकांच्या स्थितीचे वर्णन कवीला करायचे आहे. फैज-अलीच्या भयाने पुरुषामारखे पुरुष दैवाला दोष देत होते आणि 'कुक्कुटापरी, मार्जारापरि जिणे तयांचे तर' ही अवस्था या. मु. पाठक यांना भयावह वाटते आहे. कालखंड आधुनिक असला तरी दृष्टी ही पूर्णपणे आधुनिक नाही. श्रीरंग-राधा यांची होणारी आठवण (पृ. १८, १९) हे त्याचेच द्योतक आहे. परंतु या खंडकाव्यात काही आधुनिकतेच्या आकर्षक खुणाही आहेत. फैजने 'रात्री तुला सोडणार नाही' अशी धमकी दिल्यानंतर अंतर्बाह्य घुमसणाऱ्या पवित्रेचे अप्रतिम चित्र कवीने रेखाटले आहे.

> आत भेटला क्रोधभयाचा जळता ज्वालामुखी
> चुलीतल्या ज्वालेस लागली काय आच सारखी ?
> भाकरी करपल्या द्विगुणित उष्म्यामुळे
> कोवळे हातही कितिदा ते पोळले (पृ. २३)

मूल्यभावाचे विविधांगी चित्रण

पतीला आपली मानसिक अवस्था न सांगता आल्यामुळे जिभेला दोष देणारी, दुष्टाकडून आलेल्या अलंकारांना परत पाठवणारी, मनातल्या मनात हतबल होऊन आईला मिठी मारून रडणारी अशी पवित्रेची रूपे म्हणजे विविध भाववृत्तींचीच रूपे आहेत. शशिमोहनसारखा कोवळा तरुण पवित्रेचे रक्षण करतो पण त्याच्या हातून त्या दुष्टाचा खून होतो त्यावेळीही तिच्या मनातील वादळ कवीला मोलाचे वाटले आहे. न्याय, नियती, देव यांना आळवणारी पवित्रा, न्याय मिळाला नाही तरी जगात कर्तव्यजागृती अशीच असो असे म्हणणारा पवित्रेचा पती, 'नरधर्म पाळला' म्हणून मृत्यूलाही न भिणारा शशिमोहन ही व्यक्तिचित्रणे म्हणजे एका मूल्य-भावाचीच विविध चित्रे आहेत.

स्फुट कवितेत तात्कालिक कविता या. मु. पाठक यांनी जास्त लिहिली हे संग्रहावरून दिसते. प्रसिद्धीविन्मुखवृत्तीमुळे 'फुले नि मुले' (प्रकाशक–नलिनी पाठक, वर्धा) या संग्रहानंतर त्यांच्या कवितेचा संग्रह निघालाच नाही. त्यात 'तात्यारावांचा भाषणौघ स्मरून', किंवा दत्तो वामन पोतदार साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष झाले म्हणून त्यांच्या 'निष्ठेचा नित कर्मयोग' आणि 'वाग्तप' यांचे स्मरण या कविता प्रासंगिकच आहेत.

'कायदे भंग' (१९३२) ही नाटिका, 'देहांतशासन' (१९३३) हे नाटक आणि 'धबधब्याच्या धारेत' ही प्रौढ मुलींच्या प्रश्ना-वरील कादंबरी ही त्यांची साहित्यसेवा. विहंगम मासिकाच्या संपादनातही त्यांनी आपली चोखंदळ दृष्टी प्रकट केलेली दिसते. कथा, कविता, समीक्षा

राजकारण, वैचारिक, लेख अशा सर्वांगीण मजकूराला श्री. पाठक यांनी 'विहंगमा'त स्थान दिलेले दिसते. ऑगस्ट १९३४ च्या अंकात 'कुमारी-विधवा' हा लेख लिहून प्रौढ अविवाहित मुली ठेवण्याचा घातुक पद्धतीकडे त्यांनी समाजाचे लक्ष वेधलेले दिसते.

सामाजिक कर्तृत्व, शैक्षणिक नेतृत्व

सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या प्रा. पाठकांनी आपली सामाजिक मतेही 'वागीश्वरी'-सारख्या नियतकालिकातून स्पष्टपणे मांडलेली दिसतात. 'भूतबाधेवर मंत्रप्रयोग' या आपल्या लेखात या. मु. पाठकांनी लोकहिताचे कंकण बांधणाऱ्यांना भोवतालच्या 'मानवी वेताळां'-पासून वाचण्यासाठी आठ सूत्रे सांगितली आहेत. भोवतालच्या माणसावर विश्वास, शत्रू-मित्र हा भेदभाव न ठेवणे, सर्वांशी मोकळेपणाने वागणे, लपवालपवी न करणे, षडविकारांवर ताबा, सत्य व क्षमा यांची कास धरणे, ध्येयनिष्ठेला महत्त्व आणि उत्साह ही ती सूत्रे होत 'आळसाच्या समंधबाधेवर हा अष्ट मंत्र लागू पडेल असे ते सांगतात.

स्वतः जीवनात याच उत्साहाच्या बळावर त्यांनी स्त्रियांच्या स्वतंत्र महाविद्यालयाची नागपुरात उभारणी केली, १९४२ साली वर्धेचे वासुदेव आर्टस् कॉलेज नागपूरला आणले. वाङ्मयसेवेप्रमाणे ही शैक्षणिक पायाभरणीही आत्यंतिक मोलाची होती. दिवा लावणे आणि त्याची ज्योत अखंड सांभाळणे असे दुहेरी कार्य या. मु. पाठक यांनी सार्वजनिक जीवनात साहित्य व शिक्षण यांच्या प्रेमातून केले. विदर्भातील अनेक महाविद्यालयांशी संस्थापनेपासून त्यांचे संबंध होते तर वरुड व नागपूर येथील अनुक्रमे महात्मा फुले महाविद्यालय व डॉ. आंबेडकर महाविद्यालय या शैक्षणिक संस्थांचे प्राचार्यपद त्यांनी भूषविले होते.

कायद्याची परीक्षा देऊनही त्या काळच्या प्रथेप्रमाणे वकिली न करता त्यांनी प्राध्यापकी केली. कदाचित वकिलीच्या व्यवसायात सत्याची होणारी ससेहोलपट त्यांच्या तत्त्वनिष्ठ कविवृत्तीला मानवली नसावी. स्वार्थ, धनसंपत्ती वा कीर्ती यापैकी कोणत्याच मोहात न अडकता एखाद्या निस्पृह कर्मयोग्याचे जीवन हा कवी जगला, त्यांचा जन्म २५ जून १९०५ चा. ८५ वर्षे हा कर्मयोगी सुफल संपूर्ण आयुष्य जगला आणि कृतार्थ वृत्तीने देठ अलगद तुटून फळाने गळून पडावे तसा मृत्यूला सामोरा गेला.

कोण मी, मला कळले सारे!
परब्रह्म मी परब्रह्म रे
ब्रह्मच सारे ब्रह्मच सारे...

हेच शब्द शेवटी त्यांच्या ओठावर तरळले असतील ! ■

C-2, हेमराज अपार्टमेन्ट्स
१२२, शिवाजीनगर
नागपूर-४४००१०

डॉ. अ. ना. देशपांडे : बहुआयामी गुरुवर्य

: डॉ. जगन्नाथ नाईकवाडे

काही पत्रपंडित, प्राचार्य राम शेवाळकरां सारखे अनुभवी ज्ञानोपासक विद्यावाचस्पती, डॉ. वि. वा. प्रभुदेसाई, डॉ. वि. स. जोग या गुरुवर्य डॉ. अ. ना. देशपांडे यांच्या व्यासंगी शिष्योत्तमांनी केलेला गुरुवर्यांचा गौरव मी ऐकलेला आहे, वाचलेला आहे. डॉ. सुरेश डोळके यांच्यासारख्या संशोधक, विचारवंतांनी गुरुवर्यांच्या वाङ्मयेतिहासाच्या विक्रमी कार्याची तुलना ज्ञानकोशकार डॉ. श्री. व्यं. केतकरांच्या कार्याशी केल्याचे मला माहीत आहे. 'प्रसन्नतेचा अस्त' या उचित शीर्षकाच्या लेखात डॉ. वि. स. जोगांनी गुरुवर्यांना वाहिलेली श्रद्धांजली सदैव स्मरणात राहणारी आहे. गुरुवर्यांचे सहकारी डॉ. व. कृ. वऱ्हाडपांडे यांनी गुरुवर्यांच्या विपुल वाचनाची, विपुल साधनांची, दिलेल्या संदर्भाची मुक्त कंठानं स्तुती केली आहे. इतरांच्या अभ्यासाचा आपल्या वाङ्मयेतिहास लेखनासाठी उपयोग करणारा त्यांच्यासारखा समीक्षक आणि साक्षेपी इतिहास लेखक मराठीत नाही असाही त्याचा अभिप्राय आहे. म्हणूनच गुरुवर्यांसंबंधी लिहिणे कठीण झालं आहे. सत्वशील, सदाचारसंपन्न, परोपकारी, ज्ञानोपासक, कर्तव्यनिष्ठ, सेवाशील, तत्त्वचिंतक, मानवतावादी शिक्षकांचा शिक्षणक्षेत्रातही आज अभाव जाणवतो. आमचे पूजनीय गुरुवर्य अशा दुर्मिळ होत जाणाऱ्या उत्तमोत्तम गुणांच्या आदर्शांचे चालते बोलते प्रतीक होते. माझ्या सारख्या हजारो विद्यार्थ्यांचे ते जिते जागते प्रेरणास्थान होते. म्हणूनच त्यांच्या जाण्यानं शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्राचं मोठं नुकसान झालं आहे.

वाङ्मयेतिहासाचे महान कार्य !

तीस-बत्तीस वर्षे सातत्यानं, चिकाटीनं, परिश्रमपूर्वक पाठपुरावा करून गुरुवर्यांनी वाङ्मयेतिहासाचा आपला प्रकल्प याच देही याच डोळा सिद्धीला नेला. एकट्यानं एकटाकी लिहून नऊ खंडात पूर्ण केलेला हा प्रकल्प म्हणजे अपूर्व असं चिरंतनकार्य आहे. मराठी माणूस, मराठी भाषा, मराठी साहित्य आणि मराठी संस्कृती जोपर्यंत या भूतलावर आहे तोपर्यंत गुरुवर्यांच्या या महानकार्याचा कीर्तीदरवळ कायम राहणार आहे. डॉ. वि. स. जोगांच्या अलंकारिक शब्दात सांगायचे तर "त्यांनी लिहिलेले नऊ खंड म्हणजे त्यांच्या उत्तुंग व्यासंगाची नऊ हिमशिखरे होती. अध्यापनाचा जिवंतपणा, रसाळपणा आणि प्रवचनातली प्रासादिकता त्यांच्या वाङ्मयेतिहासलेखनात उतरली आहे."

गुरुवर्य अनांच्या जीवनकार्यातील यशाचं रहस्य महाकवी भवभूतीच्या मालती-माधव नाटकातील एका श्लोकाद्वारे सांगता येईल. तो श्लोक असा,

"शास्त्रेषु निष्ठा, सहजश्च बोधः
प्रागल्भ्यमभ्यस्त गुणाच वाणी ।
कालानुरोधः प्रतिभानवत्वं,
एते गुणः कामदुधाः क्रियासु ॥" (अंक ३.)

आपल्या वाङ्मयेतिहाससंबंधीचे गुरुवर्य अनांचे प्रांजळ निवेदन लक्षात घेण्यासारखे आहे. ते म्हणतात, "वाङ्मयेतिहास लेखन हे माझ्या आवडीचे काम होते ! हे कष्टाचे काम माझ्यावर कुणी लादले नव्हते; किंवा कोणत्याही अपेक्षेने मी ते स्वीकारले नव्हते ! सुमारे पाच हजार पृष्ठांचा हा इतिहास लिहिण्यासाठी मी अभ्यासाचे भरपूर परिश्रम घेतले पण ते परिश्रम आहेत याची जाणीव मात्र मला कधीच झाली नाही. पाहतापाहता या अभ्यासात मी रंगून जातो, रमून जातो...पुन्हा पुन्हा कृतज्ञतापूर्वक सांगतो की मी अभ्यासात रमू शकतो, रंगून जातो ही त्या संतांची आणि ईश्वरी अवताराची कृपा आहे. एक विशिष्ट भूमिका स्वीकारून प्राचीन मराठीवाङ्मयाचे समालोचन करण्याचा मी हा प्रयत्न करीत आहे. विज्ञानदृष्टी नव्हे,

राष्ट्रदृष्टी नव्हे, व्यवहारदृष्टी नव्हे तर संत-सृष्टीच फक्त मानवाला आजच्या काळी तारा-वयास समर्थ आहे; या श्रद्धेवर ही भूमिका आधारलेली आहे."

इतर लेखन–संपादन–अध्यक्षीय

वाङमयेतिहासाचा भव्य प्रकल्प आणि अध्यापन एवढचा दोनच गोष्टी गुरुवर्यांनी आपल्या उभ्या आयुष्यात केल्या असल्या तरीही इतिहासाला त्यांच्या कार्याची नोंद घ्यावी लागली असती. पण गुरुवर्यांचं लेखनकार्य एवढचावर मर्यादित नाही. 'केशवसुत नवदर्शन', 'प्लेटोचे साहित्य-शास्त्र', 'मराठी संत', 'महानुभाव संतांची सामाजिक आणि वाङमयीन कामगिरी' 'विदर्भाचे मानकरी' इत्यादी अकरा ग्रंथांचे त्यांनी लेखन केलेले आहे. ग्रंथ लेखनाबरोबर ग्रंथ संपादनाचे कार्यही त्यांनी केलेले आहे. नागपूर विद्यापीठाने प्रकाशित केलेल्या 'प्राचीन मराठी वाङमय कोश' या ग्रंथाचे संपादन गुरुवर्यांचे आहे. 'वामन मल्हार जोशी–साहित्यातील विवेक' 'प्रमेयाची उद्याने' विनोबांची साहित्यसृष्टी', 'ज्ञानेश्वरी अध्याय नववा', 'हरिश्चंद्राख्यान', 'चिपळूणकर दर्शन', 'शं. दा. पेंडसे गौरव ग्रंथ' इत्यादींचे कुशल संपादनही त्यांनी केलेले आहे. वृत्तपत्रातून, नियत-कालिकातून विपुल स्फुटलेखन गुरुवर्यांनी केलेले आहे. हे स्फुट लेखन विविध विषयांवर आहे. या सर्व लेखनप्रपंचात ईश्वरनिष्ठा आणि धर्म-दृष्टीला अनन्य साधारण महत्त्व गुरुवर्यांनी दिलेले आढळेल. चंद्रपूर येथील नागपूर विद्यापीठ प्राध्यापक परिषदेच्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी, धर्मदृष्टी प्रमाण असणाऱ्या पुस्तकांनाच पाठ्य-क्रमात स्थान दिले पाहिजे असे आग्रहाने प्रतिपादन केले आहे. "तैसे अध्ययन अध्यापन। अवघेचि अप्रमाण । श्रोते हो धर्म दृष्टीविण। निश्चयेसी।" असा त्यांचा निश्चय होता. शिक्ष-णाच्या क्षेत्राचं दुर्दैव असं की ईश्वरनिष्ठा आणि धर्मनिष्ठा यांना जीवनातून हद्दपार करणारा शिक्षक वर्ग आज अस्तित्वात आला आहे. १७–९–१९६६ रोजी विदर्भ साहित्य संघाच्या काटोल येथील संमेलनाच्या अध्यक्षपदावरून केलेल्या धीर गंभीर भाषणातील हे शब्द–

"आजच्या मानवतेने शांतीसाठी जी हृदय-भेदक हाक दिलेली आहे तिला मराठी साहित्यि-काला तन्मयतेने जिव्हाळयाने साद द्यावीच लागणार आहे. अशी साद देणे त्याचे कर्तव्य आहे. युद्धखोर सत्तापिसाटांच्या राजनीतीला बळी पडलेल्या मानवतेचे करुणभीषण आक्रंदन मराठी साहित्यिकाला ऐकावयाचे आहे. या युद्धखोर क्रूर राजनीतीचा त्याला जळजळीत शब्दात निषेध करावयाचा आहे. मानवजातीच्या इतिहासातील शांतीचे पर्व उघडण्याला अनुकूल अशी भूमिका त्याला निर्माण करावयाची आहे. मराठी साहित्यि-काला शांतरस मनःपूर्वकतेने आळवावा लागणार आहे."

गुरुवर्य जसे लेखनात रमले, अध्यापनात रमले तसेच ते तत्त्वचिंतक, प्रवचनकार म्हणूनही सुपरिचित झाले त्यांचा पिंड अध्यात्माचा होता. जे. कृष्णमूर्ती, भगवान बुद्ध, येशूख्रिस्त, महंमद पैगंबर यांच्या विचारांचे व रामायण, महाभारत, वेदउपनिषदे आणि संत वाङमय यांचे ते अभ्या-सक होते. अवतार मेहेर बाबांच्या शिकवणूकीवर त्यांची डोळस श्रद्धा होती. रसाळ प्रवचनकार म्हणून त्यांनी नावलौकिक मिळविला होता. त्यांच्या प्रवचनांना नेहमीच गर्दी लोटायची. जागतिक स्तरांवरील तत्त्वचिंतकांचे विचार, संतमहात्म्यांची उद्धरणे असलेले कागद प्रवचन करताना त्यांच्या हाताशी असत आणि दैनंदिन जीवनातील दृष्टान्त देऊन ते प्रवचनाची रंगत वाढवीत असत. 'ज्ञानेश्वरी' हा त्यांच्या प्रवचनाचा आवडता ग्रंथ !

चैतन्यात न्हाऊ घालणारा प्राध्यापक

गुरुवर्यांचं अध्यापन म्हणजे विद्यार्थ्यांना नव-रसाची मेजवानीच वाटायची. धोतर, सदरा, कोट, काळी खड्याची टोपी असा भारतीय परंपरावादी नित्याचा नि खादीचा पोषाख करून सरांनी वर्गात प्रवेश केला की सारं वातावरण उल्हासानं, उत्साहानं भरून जात असे. मनाचा कान करून सारा वर्ग सरांच्या शब्दब्रह्मात भान हरवून जायचा. डॉ. वि. स. जोगांच्या शब्दात सांगायचं तर "शिकवताना स्वतः चैतन्यात न्हाणारा आणि विद्यार्थ्यांना चैतन्यात न्हाऊ

घालणारा मराठीचा अन्य प्राध्यापक माझ्या तरी पाहण्यात नाही. अनांच्या हाताखाली मी सतत चार वर्षे आवश्यक मराठी किंवा मराठी साहित्य शिकलो परंतु या चार वर्षातल्या एकाही तासाचा कधी कंटाळा आला नाही. एकही तास शिळा वाटला नाही, एकही तास चुकवावासा वाटला नाही. एखादा तास स्वतःकडून बुडाला तर त्याची दीर्घकाळ रुखरुख वाटायची." गुरुवर्य अनांच्या विद्यार्थ्यांचं हृदगत् च डॉ. जोगांनी मोजक्या प्रभावी शब्दात प्रकट केलेलं आहे. गुरुवर्य विद्यार्थ्यांना आवडायचे ते आणखी एका कारणामुळे "त्यांच्या अध्यापनाच्या विनोदी तंत्रामुळे. त्यात विदुषकी नाटच होते. नकलाकारांच्या गमतीही होत्या. पण या विदुषकी किंवा नकलाकारी शैलीने त्यांच्यातल्या आब-रुबावाला धक्का पोचवला नाही. ते नेहमी खाद्यपदार्थांचे दृष्टान्त देत ही गोष्ट तर सगळ्यांनाच माहीत आहे. त्यांचे अध्यापन म्हणजे श्रीखंड पुरीची मेजवानी होती त्यांच्या अध्यापनाचे आणखी एक वैशिष्टय होते. सहसा ते खुर्चीवर वसून शिकवीत नसत. चंद्रपूरच्या व्याख्यानात खुर्चीवर वसून शिकविणाऱ्या प्राध्यापकाची तुलना कडबा चघळून जमिनीवर वसून रवंथ करणाऱ्या बैलाशी त्यांनी केली आहे. ते विद्यार्थ्यांवर कधीही रागावत नसत. तशी वेळच आली तर क्वचित ते संबंधित विद्यार्थ्यांकडं पाहून नुसते अनेकार्थी स्मित करीत की विद्यार्थी वरमून जायचा."

"अनांचे अध्यापन केवळ ग्रंथनिष्ठ किंवा केवळ ग्रंथालयनिष्ठ नव्हते. ते जीवननिष्ठ होते. त्यातही ते त्यांनी पुढे पुढे वहुजन–समाजनिष्ठ केले. हे अध्ययन आणखी एका अर्थाने जीवननिष्ठ होते. काही वर्षे अनांनी असा पायंडा पाडला होता की वर्गातल्या प्रत्येक विद्यार्थ्याकडे स्वतः जायचे. मग तो शहरातल्या कोणत्याही वस्तीत व कितीही दूर राहणारा का असेना." त्यांच्या अध्ययनशैलीचे विविध विशेष सांगण्यासारखे असले तरी तो मोह आवरला पाहिजे.

बहुआयामी व्यक्तित्व

अनेकदा जीवन उजळून टाकणारा व्यक्तीचा विशेष किंवा काहीच विशेष लोकांच्या नजरेला जाणवतात. वहुआयामी व्यक्तित्वाच्या वावतीत हे घडत असते. यातूरमातूर ललितसाहित्य लिहून नाव आणि पैसा मिळविण्याच्या मागे लागणाऱ्या आजच्या तथाकथित साहित्यिकांच्या काळात कशाची पर्वा न करता व कोणतीही अपेक्षा न बाळगता एखाद्या मानवी सेवेच्या कार्यात आयुष्यातला उमेदीतला काळ वेचणारे असे किती साहित्यिक, किती प्राध्यापक सापडतील ? आपले, अध्ययन, अध्यापन, लेखन, प्रकल्प त्यासाठी अध्ययन, विशेष वाचन, मनन–चिंतन ? कौटुंबिक जवाबदाऱ्या पार पाडीत असताना गुरुवर्यांनी एक-दोन नव्हे सतत पंधरा वर्षे शुद्ध समाजसेवेच्या भूमिकेतून नागपूरच्या अंधविद्यालयाचे मानद सचिव म्हणून केलेले कार्य अनेकांना अज्ञात आहे. ते आंधळ्यांची काठी झाले. त्यांचे संगोपन, त्यांचा शारीरिक मानसिक विकास, त्यांचे शिक्षण आणि वाढत्या वयावरोवर त्यांचे पुनर्वसन या सर्व घटकांचा विचार आणि कृती करताना त्यांना त्यांच्या सहकाऱ्यांनी, त्यांच्या आरंभीच्या विद्यार्थ्यांनी पाहिले आहे. त्यासाठी त्यांच्या पुणे–मुंबईच्या या विद्यार्थ्यांबरोवर वाऱ्या झाल्या आहेत. काही लोकांनी त्यांची त्यासाठी कुचेष्टाही केली आहे. "दिनाचा दयाळू मनाचा मवाळू। स्नेहाळू कृपाळू जनीं दास पाळू" या समर्थांच्या मनाच्या श्लोकांच्या पंक्ती गुरुवर्यांचीही अंधसेवा वघून आठवल्याशिवाय राहात नाहीत. या सेवाभावाचं मोल रुपये नाण्यांनी करताच येण्यासारखं नाही.

सामाजिक कर्तृत्व

दारिद्र्यामुळे, आर्थिक प्रतिकूल परिस्थितीमुळे, कौटुंबिक अडचणीमुळे त्यांना वालवयातच नोकरी, व्यवसायाकडे वळावं लागलं. ज्यांचं मराठी चार वर्गापुढं शिक्षण झालं नाही अशा प्रौढ विद्यार्थ्यांकरिता गुरुवर्य प्राचार्य डॉ. डी. जी. मोझेस या हिस्लॉप कॉलेजच्या प्राचार्यांनी शुद्ध समाजसेवेच्या भूमिकेतून १९२८ साली कॉलेजातच हिस्लॉप कॉलेज सिटी नाईट स्कूल या संस्थेची स्थापना केली. गुरुवर्य देशपांडे १९४५ साली हिस्लॉपमध्ये येताच या संस्थेच्या अध्यक्षपदी त्यांची नेमणूक डॉ. मोझेस यांनीच केली. गुरुवर्यांच्या कारकीर्दीत या लहानशा रोपट्याचा प्रचंड असा वटवृक्ष

झाला. सायंकाळी सहा ते नऊ या वेळात महाल-सारख्या गजबजलेल्या वस्तीतील हिस्लॉप कॉलेजच्या इमारतीत (आताचे सहकार मंदिर) सात–आठशेंच्या संख्येने प्रौढ विद्यार्थी शिकायला येत असत. तीस पस्तीस महाविद्यालयीन विद्यार्थी इथे निःशुल्क अध्यापनाचं कार्य करीत असत. या विद्यार्थ्यांचे प्रेरणास्थान गुरुवर्य अनाच होते. माझा आणि गुरुवर्यांचा जो संबंध आला तो या नाईटस्कूलच्या माध्यमातूनच. वयाच्या तेवीसाव्या वर्षी एक व्यावसायिक प्रौढ विद्यार्थी म्हणून १९४९ मध्ये मी या नाईटस्कुलच्या पाचव्या म्हणजे इंग्रजी पहिल्या वर्गात प्रवेश घेतला. संस्थेचे अध्यक्ष म्हणून गुरुवर्यांचा मला परिचय झाला. पाच वर्षानंतर मी गुरुवर्यांचा विद्यार्थी झालो. या नाईट स्कूलनं आदर्श शिक्षकांची, प्राध्यापकांची, संस्था निर्मात्यांची, समाजसेवकांची आणि उत्तम नागरिकांची एक पिढीच निर्माण केली असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही. प्राचार्य रा. प्र. अयाचित, प्रा. वी. के. जोशी, कवी मा. गो. जामदार, पोस्टलकर्मचाऱ्यांचे नेते अॅड. कमलाकर मासोदकर, कामगार शिक्षण विभागाचे अधिकारी श्री. पुरुषोत्तम पांडे, व श्री. मोरेश्वर अभ्यंकर, श्री. मनोहर पांडे, श्री. वासुदेवराव चोरघडे, डॉ. मनोहर रोकडे, रसिकचे श्री. प्रभाकर चाफेकर, श्री. बांगरे, श्री. दे. ब. देवतळे, प्रा. प्रभाकरराव हेजीब, श्री. जयंत बारोकर, सहकारी रुग्णालयाचे संस्थापक डॉ. विजय काशीकर, श्री. देहाडराय, श्री देवपुजारी, अॅड. श्री सत्तभैय्या, नटवर्य गणश सोळंकी, नाटककार वसु भगत, जवाहर एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक संचालक अॅड. मोतीरामजी पावडे, शिक्षणाधिकारी पुंडलीकराव जीवतोडे, शिक्षणाधिकारी अरुण काळबांडे, प्रा. विश्वासराव गोखले, श्री मधुकरराव देशमुख, श्री दत्तात्रेय पाटील, श्री. दादा भोंगळे, कु. विमल फुले, कु. सुधा जोशी, कु. देशपांडे, डॉ. वि. स. जोग, श्री. मदन गडकरी, श्री मधुकर कणेर, अशी किती तरी नावे सांगता येण्यासारखी आहेत. ही श्रेयनामावली आणखी वाढविता येईल पण विस्तारभयास्तव मोह टाळला पाहिजे. यातले अनेक मला गुरु-स्थानी आहेत. अनेक माझे शिक्षक सहकारी आहेत. गुरुवर्य देशपांडे या सर्वांचे प्रेरणास्थान होते हे लक्षात घेतले म्हणजे त्यांच्या या समाजप्रबोधनाच्या कार्याचे महत्त्व चटकन लक्षात येते. जवळ जवळ सतरा वर्षे अध्यक्ष या नात्याने गुरुवर्यांनी या संस्थेचा वाढता प्रपंच चालविला. शेकडो विद्यार्थ्यांना त्यांनी समाजसेवेची दीक्षा दिली. माझ्या सारख्या हजारो विद्यार्थ्यांनी या संस्थेचा लाभ घेतला. कै. भाऊ तायवाडे, प्रा. राम हेडावू, प्रा. नरेन्द्र निमजे, श्री. कणेर, श्री. भा. म. महाले असे अनेक विद्यार्थी या नाईट-स्कूलमधून पुढे आले, १९५४-५५ मध्ये मी मॅट्रिक उत्तीर्ण झालो आणि गुरुवर्यांच्या प्रेरणेने हिस्लॉप कॉलेजचा विद्यार्थी झालो. नाईट स्कूलचा शिक्षक झालो. त्यामुळे गुरुवर्यांचे जीवन मला जवळून बघता आले. माझा त्यांच्या कुटुंबातील लहान मोठ्यांशी परिचय झाला, विद्यापीठातून सेवानिवृत्त होण्याआधी गुरुवर्यांना एकदा हृदय विकाराचा जबरदस्त झटका येऊन गेला होता. त्यापूर्वी गेल्या चाळीस वर्षात ते आजारी पडल्याचे मला तरी स्मरत नाही. याचं कारणही एखाद्या योग्यासारखी शिस्त त्यांनी आपल्या जीवनाला लावली होती. नियमितपणा, संयम यांना ते महत्त्व देत असत पहाटे चारला ते नियमित जागे होत असत, नंतर योगासने, फिरायला जाणे, बागेतील झाडांना पाणी घालणे, स्वत चे कपडे धुणे, पूजापाठ या कार्यक्रमात कधीच खंड पडू देत नसत. माजी पंतप्रधान मुरारजीभाई देसाई यांच्या प्रमाणेच ते शिवाम्बुचा प्रयोगही नियमानं स्वास्थ्या-साठी करीत असत. त्यामुळेच या पहिल्या हृदय विकाराच्या धक्क्यातून सावरल्यानंतर ते पुन्हा कायाकल्प झाल्यासारखे दिसत.

आपल्या विद्यार्थ्यांचं कौतुक करण्यात गुरुवर्य. अनांना अतिशय आनंद वाटायचा. तो आनंद त्यांच्या शब्दातून, त्यांच्या पत्रातून, त्याच्या कृतीतून प्रकट होत असे.

मी 'महाराष्ट्रभाषा संवर्धक मंडळा'चा कार्य-कर्ता होतो. गुरुवर्य त्याचेही अध्यक्ष होते. बहुधा १९५७ ची घटना असावी. मंडळाच्या निवडणूका फार अटीतटीच्या झाल्या. मी एका गटाचा प्रमुख होतो. कार्यकारिणीची निवडणूक होती. निवडणूक

अधिकारी गुरुवर्य अनाच होते. विरोधी गटाच्या उपस्थित सदस्यांची संख्या आमच्या तुलनेत दोननं कमी असूनही त्यांना अधिक मते मत मोजणीत मिळाली. घाईघाईत गुरुवर्यांनी ते विजयी झाल्याचा निकालही जाहीर करून टाकला. पण आम्ही संख्या मोजली ती तीन मतांनी कमी होती. अनुपस्थित असलेल्या तिघांचे नकली मतदान करून त्यांनी विजय संपादन केला होता. मी गुरुवर्यांकडे तक्रार केली, वस्तुस्थिती समजावून सांगितली ती त्यांनी मान्यही केली आणि फेर-निवडणूक घेण्याची त्यांनी तयारी दाखविली पण विरोधी गटाचे विद्यार्थी गुरुवर्यांनाच अद्वातद्वा बोलू लागले. हातघाईवर आले. अपशब्दही बोलू लागले. मग आम्ही प्राचार्य डॉ. डी. जी. मोंझेस-कडे न्यायासाठी मोर्चा वळविला. गुरुवर्यांनी मला बोलवले, माझी समजूत घातली, चूक कबूल केली पण प्रकरण प्राचार्यांकडे नेऊ नका, माझ्यावर विश्वास ठेवा, कार्यकारिणीत मी तुमची नियुक्ती करतो असे सांगितले. अन्याय, अपमान गिळून मी त्यांच्या आदेशाचं पालन केलं. त्याचा मोबदला मला पुढील आयुष्यात सव्याज मिळाला. मी कार्यकारिणीचा सदस्य झालो, १८५७ च्या स्वातंत्र्य संग्राम शताब्दीनिमित्त प्रकाशित होणाऱ्या हिस्लॉपच्या वार्षिकाच्या मराठी विभागाचा त्यांच्या कृपेनं संपादक झालो.

संकटांचा सामना

प्रबंध लेखन कालात चार आठ दिवसात मी गुरुवर्यांकडे जात असायचा. अशावेळी ते आपली कौटुंबिक विवंचना एखाद्या मित्रासारखी आत्मीयतेनं बोलून दाखवायचे. त्यांची गुणवान, बुद्धिमान कन्या गीता, तिला ते माया म्हणत, हिंदीत एम्. ए. झालेली, ग्रंथपालाचे प्रशिक्षण घेऊन त्या विषयाची पदवी परीक्षाही उत्तम प्रकारे उत्तीर्ण झालेली. दिसायला साधारण पण रेखीव, सव्वीस सत्तावीस वर्षांचं वय होऊनही तिचं लग्न जुळत नव्हतं. ते सतत प्रयत्नात असत. मलाही त्यांनी वर शोधायला सांगितले होते. एकदा तर त्यांनी त्यांच्याच एका विद्यार्थ्याला विचारायला सांगितलं. त्यानं का नकार दिला हे मला माहीत होतं पण गुरुवर्यांची निराशाच झाली. तिच्या विवाहाची चिंता त्यांना पोखरीत राहिली.

कधी कधी संकटं एका पाठोपाठ येतात. गुरुवर्यांच्याही जीवनात अचानक संकटं आली. मुंबईला शासकीय सेवेत प्रथम श्रेणी अधिकारी असणाऱ्या त्यांच्या ज्येष्ठ चिरंजीवाला, नानाला मुंबई पुणे मार्गावर मोटार अपघात झाला. त्याचे दोन वरिष्ठ अधिकारी त्याच जागी ठार झाले. नानाची अवस्था ही अतिशय चिंताजनक होती. त्याच्या शरीराला अनेक जखमा होत्या मेंदूलाही मार लागला होता. वृत्तपत्रातून ही वार्ता कळली. त्याला पुण्याच्या इस्पितळात भरती केलं होतं. निरोप मिळाला तसेच गुरुवर्य आणि सौ. सुशीलाबाई उभयता पुण्याला गेले. नाना दोन महिने बेशुद्ध स्थितीत होता. या वरून त्याच्या अपघाताचं गांभीर्य लक्षात येतं. मी घरी जाऊन आलो. गीता आणि बाळ यांची भेट घेतली. पुन्हा एकदा भेटलो तेव्हा गीता आजारी दिसली. मी चौकशी केली तेव्हा कावीळ झाल्याचं तिनं सांगितलं ! "तू गुरुवर्यांना आपल्या आजाराची कल्पना दिली का ?" असा मी प्रश्न विचारला, तेव्हा ती म्हणाली, "नानाची प्रकृती गंभीर आहे. तशात मी माझ्या आजाराचं सांगून त्यांच्या मनाला घोर लावू इच्छित नाही. मी उपचार घेईन ! मला बरं वाटेल !" ती रविनगरच्या सी. पी. ॲण्ड बेरार हायस्कूलात ग्रंथपाल म्हणून नोकरीला होती. अडीच महिन्यानंतर नानाच्या प्रकृतीला आराम पडला तसे गुरुवर्य सौ. सुशीलाबाईसह नागपूरला आले. तोवर गीताच्या प्रकृतीनं गंभीर वळण घेतलं होतं. तिच्या काविळाच जलोदरात रूपांतर झालं होत. मी आणि डॉ. वि. स. जोग डॉ. धर्माधिकारी, डॉ. ब. स. येरकुटवार यांना घेऊन गेलो. गीताचे काका आणि चुलत भाऊही डॉक्टर आहेत तेही आले पण काहीच उपयोग झाला नाही. अवघ्या दहा बारा दिवसात गीता कोमात गेली. जिचं एका सुविद्य वराशी लग्न जुळवून कन्यादान करण्याची गुरुवर्यांची इच्छा होती ती तशीच राहिली. मृत्यू हाच वर निश्चित झाला आणि त्यालाच कन्यादान करण्याची पाळी गुरुवर्यांवर आली.

गुरुवर्य पहिल्या हृदयविकाराच्या झटक्यानंतर तिसऱ्यांदा हादरले. त्यांची 'माया' त्यांना सोडून लांबच्या प्रवासाला गेली होती.

आणि त्यानंतर एक दिवस गुरुवर्यांच्या वडिलांच्या निधनाची बातमी वृत्तपत्रातून झळकली. मी त्यांच्या घरी त्यांच्या वडिलांना कधीच बघितले नव्हते. त्यांचे काय कौटुंबिक मत-भेद होते हे मला नाहीत नाही पण परस्परात दुरावा असावा. आपल्याला वडिलांची सेवा शुश्रुषा करता आली नाही याची खंत त्यांच्या मनात असावी. अनेक संतांनी कठोर शब्दात आत्मनिंदा केल्याचे मी वाचलं आहे. याचा अर्थ ते दुष्ट प्रवृत्तीचे होते असा होत नाही. त्यांच्या पश्चात्तापदग्ध अंतःकरणाचा तो प्रकट हुंकार दिसतो. गुरुवर्यांनीही 'तरुण भारता'त प्रकट पत्र लिहून "मी दुष्ट, मी पापी, मी लंपट, मी घातकी, मी नतद्रष्ट" म्हणून आत्मनिंदा केली. त्यातून त्यांच्या साधुशील अंतःकरणाची साक्ष काही लोकांना पटली तर गुरुवर्य अनेकांना दांभिक वाटले, ते थट्टेचा विषय झाले. काहींना तो त्यांचा विक्षिप्तपणा वाटला.

या सर्व आघातांना सोसूनही गुरुवर्य सावरले. पुन्हा त्यांचा नित्यक्रम सुरू झाला. लेखन, वाचन, मनन, चिंतन, व्याख्याने, प्रवचने यात ते रस घेऊ लागले. अगदी काहीच घडले नाही असे ते वागू लागले. महाराष्ट्र पुरातत्त्व खात्यानं आकाशवाणी द्वारा त्यांची मुलाखत ध्वनिमुद्रित करण्याचं ठरविलं. त्यासाठी आवश्यक तो पत्रव्यवहार झाला ही ध्वनिफित चार तासांची होती. मुलाखत घेण्यासाठी गुरुवर्यांनी माझ्या नावाची शिफारस केली होती. माझी मान्यता आणि पात्रता ही मुंबईच्या पत्त्यावर कळविण्यात आली. आम्ही प्रतीक्षा करीत राहिलो या घटनेनं त्यांचं माझ्या वरील प्रेम पुन्हा एकदा प्रकट झालं.

खंबीर सहकारी

आपल्या विद्यार्थ्यांप्रमाणं आपल्या सहकाऱ्यांच्या पाठीशी ते एखाद्या पहाडासारखे खंबीरपणे उभे राहात असत. विद्यापीठात ते विभाग प्रमुख असताना डॉ. द. भि. कुळकर्णी प्रकरण गाजले. माझ्या घरी गुरुवर्य डॉ. अ. ना. देशपांडे आणि गुरुतुल्य डॉ. व. स. येरकुंटवार यांची बौद्धिक खडाजंगी, वाग्युद्ध झालेलं, मी, डॉ जोग, सावरकर समितीचे प्रमोद सोवनी. डॉ. श्री. प्र कुलकर्णी यांनी अनुभवलं आहे. गुरुवर्यांच्या विदर्भ साहित्य संघातील अमृत महोत्सवी सत्कार प्रसंगी आपल्या जीवन यशातील पहिले प्रेरणास्थान म्हणून त्यांनी सर्वांसमक्ष आपल्या प्रेमळ कर्तव्यदक्ष अर्धांगिनी सौ सुशीलाबाईंच्या गळयात प्रथम पुष्पमाळा टाकून सर्वांना विस्मयाचा धक्का दिला.

मोहोळ उठविण्याचा पिंडच !

गुरुवर्यांना असत्य, दांभिकपणा, अप्रामाणिक-पणा, दोगलेपणा, तोंडपूजेपणा अजिबात रुचत नव्हता. ते निर्भीड, निःस्पृह आणि स्पष्टवक्ते होते. अर्थात दांभिक, कृपण, फसवणूक करणारे, अशी त्यांच्यावरही त्यांच्या हितशत्रूंनी टीका केल्याचं मला माहीत आहे. मोहळ उठविण्याचा गुरुवर्यांचा स्वभाव होता. केसरीतून लेख लिहून त्यांनी रामायणकार ग. दि. माडगूळकरांची हजेरी घेतली. दुबळा, दैववादी, नेभळट राम रेखाटल्या-बद्दल सडेतोड टीका केली. मध्येच गुरुवर्य विदर्भवादी बनले. विदर्भाचे स्वतंत्र राज्य झाले पाहिजे म्हणून ते पत्राद्वारे प्रचार करू लागले. त्याचा परिणाम असा झाला की नागविदर्भ आंदोलन समितीनं त्यांच्या हस्ते आपल्या मोहीमेचं आणि कार्यालयाचं उद्घाटन केलं. मध्यंतरी त्यांनी 'तरुण भारत' आणि दैनिक 'लोकमत'-मध्ये पत्र लिहून, संघात केवळ ब्राह्मण जातीच्या लोकांनाच महत्त्वाची पदे दिली जातात अशी राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर टीका केली आणि "जगन्नाथ नाईकवाडे यांना संघचालक पद द्यायला काय हरकत आहे !" असाही प्रस्ताव मांडला. या प्रश्नावर एवढे मोहोळ उठले की ती चर्चा दोन्ही वृत्तपत्रात बरेच दिवस चालली. मीच शेवटी त्यांना भेटलो आणि म्हणालो, "सर ! मला कशाला वादविषय करता आणि आपल्या स्वतःवर टीकेची झोड उठवून घेता !" त्यावेळी ते नुसते हसले !

मध्यंतरी त्यांनी तरुण भारतात एक पत्र लिहून 'सर्व नवरे दुष्ट असतात' असा सर्व-

सामान्य सिद्धांत मांडून पुन्हा स्त्री–पुरुष वादाचे मोहोळ उठविले. वास्तविक हे विधान मुळात प्राचार्य वा. म. जोशी यांचे आहे. पण ते गुरुवर्यांनी वापरले आणि टीकाविषय झाले. आपल्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यासाठी ते जसे पत्र पाठवीत, प्रसिद्धीला देत असत तसेच कधी कधी त्याच्या आजाराचे वृत्तही ते प्रसिद्धीला देत असत. त्यांचे प्रबंध लेखक विद्यार्थी श्री. अनंत फंदी यांच्याबद्दल त्यांना अतिशय आत्मीयता वाटत असे. त्यांनी शाहिरी वाङमयावर सुमारे तीन हजार पृष्ठे लिहिली परंतु त्यांना आपला प्रबंध विद्यापीठाला सादर करता आला नाही. त्यांना कर्करोग झाला. ही वातमी गुरुवर्यांनी वृत्तपत्राला स्वत: दिली. त्यामूळे माझ्यासारख्या श्री. फंदीच्या अनेक चाहत्यांना जाऊन भेटता आले ते गुरुवर्यांमुळेच. अशा या मातृहृदयी, सौजन्यशील, उदारमनस्क, साग्रशील अंत:करणाच्या माणसाची महाराष्ट्रानं फारशी कदर केली नाही. कागदोपत्री विलंब लागल्याने त्याच्या जीवनासंबंधीची त्यांच्या मुखाने निवेदन होणारी ध्वनिफित शेवटी घेता आली नाही याचे अतिशय दु:ख होते.

गुरुवर्यांचा शिष्यवर्ग सर्व महाराष्ट्रभर विखुरला आहे. प्राचार्य शेवाळकर, डॉ. प्रभुदेसाई डॉ. द. भि. कुळकर्णी, प्रा. श्री. सौ. वावगावकर, डॉ. भाऊ मांडवकर, डॉ. शरद कळणावत, डॉ. गंगाधर पानतावणे, प्राचार्य श्री. म. पांडे, प्राचार्य प्रभाकरराव दाढी, डॉ. वि. स. जोग, डॉ व. कृ. वऱ्हाडपांडे, डॉ. वेलणकर, डॉ. मदन कुलकर्णी, डॉ. आशा सावदेकर, डॉ. विजय इंगळे, ता. अरविंद खांडेकर अशी किती तरी श्रेयनामावली सांगण्यासारखी आहे. या सर्वांनी गुरुवर्यांच्या स्मृती ग्रंथाला हातभार लावावा ही विनंती आहे. ■

अनुक्रमणिका

टिपण

कॉ. डांगे कम्युनिस्ट असले तरी....!

भास्कर लक्ष्मण भोळे

आजपर्यंत अनेकांनी वेगवेगळ्या संदर्भात लिहितांबोलताना 'कॉ. डांगे कम्युनिस्ट असले तरी...' अशा शब्दांनी सुरुवात करून या नेत्याविषयी आपापली विधाने केलेली आढळतात. त्यात डांगे यांचे विरोधक असतात तसेच समविचारी समर्थकही सापडतात. एकोणसाठ साली 'नवाकाळ'चा अग्रलेख लिहिताना संपादकांनी म्हटले आहे की, 'कॉ. डांगे कम्युनिस्ट असले तरी त्यांची चण मराठी माणसाची आहे, कम्युनिस्ट पक्षात राहूनही त्यांनी आपले व्यक्तित्व आणि स्वभाव वैशिष्टये राखून ठेवली आहेत. 'जग निर्माण करूनही त्यापासून अलिप्त व निराळे राहणाऱ्या आदिशक्तीप्रमाणे!'... तर साम्यवादी चळवळीतील काही सहकाऱ्यांना क्रांतिकारी आंतरराष्ट्रीयतावादाने इतके झपाटले होते की कॉ. डांगे 'राष्ट्रीय' दृष्टिकोनातून विचार करतात हे त्यांना मुळीच खपले नाही. 'कॉ. डांगे कम्युनिस्ट असले तरी राष्ट्रीय परंपरा, राष्ट्रीय एकात्मता, राष्ट्रप्रतिष्ठा अशा 'संकुचित' परिभाषेत बोलतात' अशी टीका करून त्यांनी डांगे यांना पक्षातून काढून टाकले... कॉ. डांगे कम्युनिस्ट असूनही त्यांचा संस्कृत नाटय वाङ्मयाचा सखोल व्यासंग आहे, ते नियमित योगासने, प्राणायाम व ध्यानधारणा करतात याबद्दल आश्चर्यचकित होणाऱ्या परंपराभिमानी मंडळीची संख्या तर बरीच मोठी भरेल!

एरव्ही ज्यांच्यातून विस्तव जात नाही अशी ही उजवी-डावी माणसे या एका मुद्यावर सहमत झालेली पाहून फार गमत वाटते. 'हे कसे काय शक्य व्हावे?' असा प्रश्न पडतो. त्याचे उत्तर शोधू जाता असे दिसते की "कम्युनिस्ट" माणूस कसा असावा याबद्दलचा एक आडाखा समाजात सकारण-अकारण पक्का झालेला असतो. तो परभृत, उपरा, परंपरेविषयी अनभिज्ञ, राष्ट्राशी बांधीलकी नसलेला, पुस्तकी, शुष्क, धर्मसंस्कृतीचा शत्रू, नैतिकतेचा वैरी-अशी एक प्रतिमा आपल्याकडे आढळते. कम्युनिस्ट विरोधकांच्याच नव्हे तर अनेक कम्युनिस्टांच्याही मनात हीच स्वप्रतिमा घर करून बसलेली अनुभवास येते. त्यामुळे एखादा कम्युनिस्ट नेता दिलखुलास हसतो-हसवतो, मिष्किल व्यक्तिमत्वाने गंभीर समस्यांना सामोरा जातो किंवा परंपरेविषयी आत्मीयतेने बोलतो एवढया कारणावरून एका बाजूने कम्युनिस्ट विचारधारेवरील त्याच्या निष्ठा संशयास्पद ठरवल्या जातात आणि दुसऱ्या बाजूने जणू 'काहीतरी आगळीक घडली आहे' असा विस्मय कम्युनिझम्ला असाध्य व्याधी समजणारांकडून व्यक्त केला जातो. दोन्हीही बाजू संबंधित नेत्यावर अन्यायच करीत असतात, त्याला समजून घेऊन त्याचे श्रेय त्याच्या पदरात घालण्याची तयारी कोणाचीच नसते कॉ. डांगे यांचे या देशात हेच झाले आहे.

कॉ. डांगे यांच्या संस्कृतप्रेमाने प्रभावित, सद्गदित होणारे विद्वान देखील त्यांची ऐतिहासिक भौतिकवादी चिकित्सा नीट समजून घेऊ इच्छीत नाहीत. संस्कृतदिनाचे पाहुणे म्हणून पाचारण

करण्याच्या सन्मानापलीकडे त्यांच्या व्यासंगाची दखल घेण्याची गरज त्यांना भासत नाही. त्यामुळे एकतर परिवर्तनवादी विचारवंतांचे पारंपरिक वर्तुळात आत्मसातीकरण होऊन त्याच्या पुरोगामी प्रतिमेला पुसट करण्याचे श्रेय संबंधितांच्या पदरात पडते आणि दुसरे असे की परंपरा जशाच्या तशाच नवता म्हणून मिरवू लागतात. कॉ. डांगे कम्युनिस्ट असले तरी आमच्याच मताचे असे भासवीत असतानाच कॉ. डांगे यांनी संस्कृत नाटकांविषयी जे काही म्हटले ते विद्यापीठीय वर्तुळात त्या नाटकांचे अध्ययन करणारांपर्यंत पोचूच शकत नाही. ते जुन्याच परिपाठीतून घोकंपट्टी चालू ठेवतात.

एकावाजूने परंपरावादी समाजधुरिणांकडून झालेली ही वंचना उपेक्षा आणि लाभलेले औदासिन्य तर दुसऱ्या बाजूने विचारात सहप्रवासी म्हणून वावरणाऱ्या पोथीनिष्ठ सहकाऱ्यांकडून झालेला दुस्वास अशा दुहेरी कात्रीत कॉ. डांगे यांच्यासारखे नेते सापडतात. स्वतःच उभारलेल्या पक्षातून बाहेर पडून राजकीय विजनवासात राहण्याची पाळी त्यांच्यावर येते. यात कॉ. डांगे यांचे काहीच कधी चुकले नाही किंवा फक्त इतरांनीच त्यांच्यावर अन्याय केला असे मुळीच म्हणायचे नाही. किंबहुना कॉ. डांगे यांच्या राजकीय नेतृत्वशैलीचे व यशापयशाचे परिपूर्ण मूल्यांकनही इथे अभिप्रेत नाही. तर फक्त एकाच मुद्द्यावर इथे काही मांडणी करायची आहे. कॉ. डांगे यांच्या राजकीय मूल्यांकनापेक्षाही इथल्या साम्यवादी चळवळीच्या भवितव्याच्या दृष्टीने अशी मांडणी करणे प्रस्तुत लेखकास अगत्याचे वाटते. देशविशिष्ट परंपरा, परिस्थिती, जनमानस व जनजीवन यांची साम्यवादी चळवळीने किती व कशी दखल घ्यावी ? ही विशिष्टता व आंतरराष्ट्रवाद यांचा समन्वय कसा घालावा ? मार्क्सवादी तत्त्वप्रणाली देशकालवर्तमानाच्या अनुषंगाने कशी प्रत्यक्षात राबवावी ? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे शोधणे या चळवळीसाठी निकडीचे झाले आहे. जगभरच देशोदेशीचे कम्युनिस्ट मार्क्सवादाची स्व-देशी परिष्कृती करण्याच्या प्रयत्नात आहेत. अतिसैद्धान्तिक कडवेपणाची आणि आंधळ्या आंतरराष्ट्रवादाची जागा अलीकडे सखोल परंपराभ्यास, आणि सृजनशील चिंतन घेऊ लागले आहे. 'मार्क्सवादी नवचिंतन' म्हणून लोकप्रिय होत असलेला विचारप्रवाह दिवसेंदिवस जोर धरीत आहे. कॉ. डांगे यांनी आपल्यापरीने या चिंतनाला आपल्या लेखनातून व कार्यातून चालना दिली होती. व्यक्ती म्हणून त्यांच्या नेतृत्वाच्या ज्या मर्यादा व चुका होत्या त्या उगाळीत बसण्यापेक्षा नवचिंतनप्रक्रियेतील त्यांचे योगदान लक्षात घेणे कम्युनिस्ट चळवळीच्या दृष्टीने अधिक उपयुक्त ठरू शकेल.

बाबूराव रणदिवे यांच्या 'कॉ. डांगे' या पुस्तकास लिहिलेल्या प्रस्तावनेत रा. नारायण देसाई यांनी या मुद्द्याला स्पर्श केला आहे. प्राचीन आणि नवीन यांचा नित्यनूतन संयोग साधीत जाणे हेच विरोधविकासवादाचे सारतत्त्व असून युरोपपेक्षा भारतात ते पूर्वापार प्रचलित आहे असे सांगून रा. देसाई विरोधविकासी तर्कशास्त्राचे यथार्थ स्पष्टीकरण देतात. त्यांच्या मते, "योग→प्रतियोग→संयोग' हे विरोधविकासाचे सूत्र सर्वश्रुत असले तरी त्याचे आकलन मात्र बहुदा चुकीचे घडते. विरोधविकासाच्या प्रक्रियेत 'प्रतियोगा' ने 'योगा'ला संपूर्णपणे नष्ट केले तरच प्रगतीचा गाडा पुढे पुढे सरकतो असे सामान्यतः मानले जाते. पण यात मोठीच गफलत आहे. या शास्त्राचे अतिसुलभीकरण आणि दुरुपयोग होऊ नये म्हणून कॉ. डांगे यांनी ही गफलत ६५ वर्षांपूर्वीच लक्षात आणून दिली होती. डांगे म्हणतात, की "प्रतियोगाने (अँटीथीसिस) जर योगाला (थीसिस) पुरते गिळून संपवायचे तर मग संयोग (सिन्थिसिस) व्हायचा तो कशाचा आणि कुणाशी ?" आपल्या देशात मार्क्सवादाची धुरा पंडिती पुढाऱ्यांच्या खांद्यावर राहिल्यामुळे अस्सल मार्क्सवादी विद्वत्ता विकसित होण्याऐवजी-यांत्रिक विरोधविकासवाद आणि फाजील जडवाद यांचे पीक उदंड आले. "जुने जाऊ द्या मरणा लागुनी, जाळुनी किंवा पुरुनी टाका" अशी उताविळी आकांक्षा नवशिक्षित पुरोगाम्यांनी बाळगली. इथल्या कर्मठ अध्यात्मवाद्यांइतकीच अहंता, असहिष्णुता, नवदीक्षित कट्टर मार्क्सवाद्यांच्याही आचरणात दिसून आली. आर्थिक क्रांतीतून आपोआपच सांस्कृतिक-नैतिक परिवर्तन घडून येईल

असा भावडा आशावाद कम्युनिस्ट चळवळीच्या बहुतेक सूत्रधारांनी मनात बाळगला. साहसवादाच्या आहारी जाऊन त्यांची चळवळ जनआंदोलनांपासून दुरावली. विरोधविकासी तर्कशास्त्राच्या कसोटयांवर भारतीय इतिहासाचे नीट अवगाहन करणे आणि सामाजिक–सांस्कृतिक स्थित्यंतरांचा वेध घेणे तिला साध्य झाले नाही.

कॉ. डांगे यांनी वेगळी वाट चोखाळण्याचा प्रयत्न परोपरीने केला ते त्यात कितपत यशस्वी झाले? झाले नसल्यास त्यांच्या अपयशाची कारणे कोणती याचा स्वतंत्रपणे शोध घेता येईल. पण त्यांच्या प्रयत्नांची दिशा इतरांपेक्षा वेगळी होती, त्यांची भूमिका चळवळीला अधिक पोषक ठरू शकणारी होती असे निश्चितपणे म्हणता येईल.

आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर सावरकर, टिळक, गांधी, लेनिन प्रभृतींचे संस्कार स्वीकारून स्वतःचे वर्तन बदलण्याचा लवचिकपणा हा जसा कॉ. डांगे यांच्या व्यक्तिमत्वाचा ठळक पैलू दिसतो तद्वतच भारतीय इतिहासाचे सम्यक आकलन आणि जागते भान हाही त्यांच्या विचार–कार्याचा महत्त्वपूर्ण आयाम असल्याचे सतत जाणवते. 'इंडियन कम्युनिस्ट' या शब्दाला संकुचितपणाचा वास येतो या कारणाने ज्यांना 'कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया' हे पक्षनाम 'इंडियन कम्युनिस्ट पार्टी' पेक्षा अधिक स्वीकार्य वाटले, त्यांच्या रागालोभाची पर्वा न करता कॉ. डांगे यानी स्वतःचा उल्लेख 'इंडियन' कम्युनिस्ट असाच केला यातून त्यांचा हा साक्षेप व्यक्त झाला होता. संस्कृत साहित्य, पुराणकथा, प्रागैतिहासकाळापासून आधुनिक काळापर्यंतचा या समाजाचा प्रवास इत्यादींमधून भारताच्या राष्ट्रीय अस्तित्वाचा आणि अस्मितेचा शोध घेण्याचा अथक प्रयत्न कॉ. डांगे त्यामुळेच करू शकले. या समाजाच्या ऐतिहासिक विकासातील प्रत्येक अवस्थेचा अन्वयार्थ ऐतिहासिक भौतिकवादी विरोधविकासी तर्कशास्त्राच्या आधारे त्यांनी लावून दाखवला. एवढेच नव्हे तर या समाजाच्या सांस्कृतिक वाटचालीचाही भौतिकवादी आलेख त्यांनी उभा केला.

कला, साहित्य आणि भाषा यापैकी काहीही स्वतंत्र-स्वायत्त नसून विशिष्ट युगसत्याच्या संदर्भातच त्यांचा विचार केला जाऊ शकतो. समकालीन समाजांतील वर्गसंघर्षाचे प्रतिबिंब भाषेतही पडलेले आढळते. संस्कृत नाटकांतील भाषा हे याचे उत्तम उदाहरण असल्याचे मत कॉ. डांगे यांनी दिले आहे. आयात केलेल्या विचारप्रणालीची स्थलकालनिरपेक्ष पोपटपंची जशी परिणामदृष्टया वांझ ठरते तद्वतच केवळ दलित–शोषितांचे जाहीरनामे फडकावणारे अनुकरणात्मक साहित्यही निष्प्रभ आणि तकलादू ठरते. कॉ. डांगे म्हणतात त्याप्रमाणे, "जी कलाकृती आपापल्या युगातल्या 'सत्याशी', 'वास्तवतेशी', 'मानवतेशी' खरोखरी समरस होते तीच आपला आविष्कार करण्यासाठी, आपली स्वतःची स्वतंत्र रीत शोधून काढते. आपापल्या परी स्वतंत्र रूप धारण करते, आपली कामगिरी करण्यासाठी आपले स्वतःचे एक वेगळेच जग निर्माण करते. जी कलाकृती अशी समरस होत नाही, जीवनाच्या वास्तवतेपासून स्वतःची फारकत करून घेते तिला उतरती कळा लागते, ती पोकळ ठरते." (बारा भाषणे, पृ. १६-१७). राजकीय क्षेत्रातील क्रियाशीलांप्रमाणेच वाङमयव्यवहार करणारांनीही आपापल्या राष्ट्रीय भाषा व संस्कृती यांच्याद्वारे आपापल्या जनतेशी समरस होऊन सर्जन केले तरच ते अव्वल दर्जाचे होऊ शकेल एवढेच नव्हे तर त्याला विश्वात्मतेचेही अधिष्ठान आपोआपच लाभू शकेल अशी स्पष्ट भूमिका कॉ. डांगे घेताना दिसतात.

मराठी भाषा आणि वाङमय यांचा त्यांना अभिमान वाटतो, कारण दलित जनतेने आपल्या पिळवणुकीविरुद्ध उभारलेल्या बंडातून त्या दोहोंचा जन्म झाला आहे. इसवी सनाच्या आठव्या शतकापासून हिंदू सरंजामी जुलूमशाहीच्या विरोधात जनतेने केलेल्या बंडखोरीतून मराठी वाङमयाचा आविष्कार झाल्याचे ते अभिमानपूर्वक नमूद करतात. ते लिहितात, "दलित वर्गाला ज्या भाषेत वाचा फुटली, ज्या भाषेत त्याने राज्यकर्त्यांविरुद्ध आवाज उठवला ती माझी भाषा. ती परंपरा जे चालवील तेच माझे साहित्य. तेच कायम टिकेल. बाकीचा सारा पालापाचोळा

कालक्षयात जळून खाक होईल." (किता, ९१). ज्ञानेश्वरी सातशे वर्षे टिकून आहे याचे रहस्य तिच्या काव्यगुणात वा तत्वज्ञानात असण्यापेक्षा ती "ब्राह्मणांची मक्तेदारी पार धुळीला मिळावी या इर्षेने लिहिलेली, दलितांच्या आकांक्षांना वाचा फोडणारी" कलाकृती आहे यात सामावलेले आहे असे कॉ. डांगे म्हणतात. ज्ञानेश्वरीचा सातशेवर्षीय सोहळा साजरा करणाऱ्या कोणालाही याचे आज स्मरण होऊ नये आणि चहू बाजूंनी तिची केवळ पारायणेच पारायणे होत राहावीत ही खेदाची गोष्ट आहे. संत वाङ्मयात अंगभूत असलेली बंडखोरी आणि तिच्या मर्यादा यांचा मार्मिक ऊहापोह करून त्या पार्श्वभूमीवर आधुनिक मराठी वाङ्मयाचे किरटेपण कॉ. डांगे यांनी अधोरेखित केले आहे. "यातल्या बहुतेक वाङ्मयाने, विशेषत: १९२० नंतरच्या वाङ्मयाने (आपल्या) कार्यात कसूर केली हे आपल्याला कबूल करणे भाग पडते. लक्षावधी गांजलेल्या दलित जनतेच्या हृदयातील तळमळीला आधुनिक मराठी वाङ्मयाने दगा दिला" असा स्पष्ट आक्षेप त्यांनी केला आहे. (कित्ता, ३२). ते पुढे म्हणतात. मराठी साहित्यिक श्रमजीवी शोषितांच्या भावनिक प्रस्फोटांशी समरस झाले नाहीत, त्यांच्या लढ्यांविषयी अनास्था व अनभिज्ञता बाळगून आपल्यातच मश्गूल राहिले." राजकारणाला आपले वाङ्मय घाबरले कुजलेल्या डबक्यात जियल्या तिथे अडकून बसले.

इतिहास, कला, साहित्य, संस्कृती इत्यादींच्या संदर्भात आपल्या वेगळेपणाचा शोध घेतल्याखेरीज आणि त्याबरहुकूम आपल्या वैचारिक भूमिकेची स्पष्ट जडणघडण केल्याखेरीज समाजवादी भारताची उभारणी करता येणार नाही असा इत्यर्थ कॉ. डांगे यांच्या जीवन व कार्यातून काढता येतो. त्यांनी त्यांच्या परीने लेखन-भाषणांतून तो सांगण्याचा प्रयत्न केला होता. त्यांना अपेक्षेपेक्षा अत्यल्प यश लाभले. कॉ. डांगे कम्युनिस्ट असले तरी कम्युनिस्ट पक्षांनी त्यांना आपले मानले नाही. जवळपास 'वन् मॅन पार्टीत' राहणे त्यांना भाग पडले. याची कारणे काहीही असोत. पण त्यांनी दाखवलेली दिशा जर अचूक असेल तर तिकडे जाण्याच्या अधिक कल्पक व परिणामकारक मार्गांचा शोध घेण्यास प्रत्यवाय नसावा. ■

क्रांतिवादी सौंदर्यशास्त्राच्या दिशा

प्रा. वासुदेव डहाके

गेल्या काही वर्षांपासून क्रांतिकारी साहित्याचे भरघोस पीक मराठी साहित्यभूमीत आले. त्या मागे कोल्हटकर, हरिभाऊ, केशवसुत, गडकरी वगैरेसारख्या प्रतिभावंतांनी, फुले, आंबेडकर, आगरकर या सारख्या विचारवंतांनी सामाजिक व राजकीय क्षेत्राप्रमाणेच वैचारिक क्षेत्रातही घडवून आणलेली क्रांती आहे. मराठीतील (आजचे) क्रांतिवादी साहित्य याच विचारांचा वारसा अव्याहतपणे चालवीत आले आहे. पु. ल. देशपांडे, वि. वा. शिरवाडकर पेंडसे, खानोलकर, गाडगीळ, बागूल, मनोहर, ढसाळ, पवार, माने, सुर्वे वगैरे असंख्य नावांचा निर्देश या संदर्भात करावा लागेल. पुरोगामी, मार्क्सवादी, जन, आदिवासी, दलित या साहित्यधारांनी क्रांतिकारी साहित्याच्या समृद्धीत मोलाची भर घातली आहे.

क्रांतिकारी साहित्याच्या विकास व समृद्धीसोबतच त्याच्या सौंदर्यशास्त्राचाही विकास आजवर व्हायला हवा होता. तो मात्र म्हणावा तसा झाला नाही. त्याला अनेक कारणे असू शकतात. एक तर अध्यात्म, देव, दैव, स्वर्ग, मोक्ष आणि भारतीय पुरुषार्थविचार या पारलौकिक विचारांभोवती मराठी साहित्य शेकडो वर्ष रिंगण घेत राहिले. 'मज त्या विश्वंभरे बोलविले', 'आपण काही

तरावया गावे', 'श्रीकृष्णाच्या गुणी जो विनटला। माझा जिवू श्री चक्रधरा विनटला। तो आतूल आनंद प्रगटला। कविताचेनी मिसे." ही प्राचीन कविता निर्मितीमागची उद्दिष्टे असल्यामुळे आपल्या या उद्दिष्टांपासून ते साहित्य पुढे सरकू शकले नाही. त्या साहित्याने परिवर्तनाचा सुखसोहळा कधी अनुभवलाच नाही. ..."यामुळे माझिये मनीचा सामान्य परिवारु नागवेल की" असे कळकळीचे उद्‌गार काढणाऱ्या प्रतिभाही क्रांतिवादी सौंदर्य शास्त्रापासून दूर राहिल्या, असे सौंदर्यशास्त्र निर्माण करण्याची गरज त्यांना वाटली नाही.

अर्वाचीन साहित्याच्या विकासासोबतच सौंदर्यशास्त्राचाही विचार मराठीत होऊ लागला. त्या विचारवंतात कोल्हटकर, विष्णुशास्त्र्यांपासून फडके, मर्ढेकरांच्या सौंदर्य विचारांचाही विचार करावा लागेल. हा विचार प्रामुख्याने अलौकिकवादी असतो. कलेच्या सम्राज्ञीच्या गळ्यात नीती-मूल्यांचा, जीवनवादाचा हार घालणे चूक आहे. असा विचार त्यातून सूचित होतो. मर्ढेकरांनी हा विचार आपल्या सौंदर्यमीमांसेत शास्त्रशुद्ध रीतीने मांडला आहे. 'आधुनिक युगाची जी जी म्हणून वैचारिक किंवा व्यावहारिक ध्येये आहेत त्यांच्या साधनेला कलानिर्मितीचा यत्किंचितही फायदा नाही. म्हणून कलानिर्मिती कायद्याने बंद केली तर मोठेसे अरिष्ट ओढवेल ही भीती नको...ज्या युगाला किंवा संस्कृतीला रात्रंदिवस साध्य आणि साधने ह्यांचा निदिध्यास त्या युगात वा संस्कृतीत कलेला स्थान नाही पण यदाकदाचित साध्य-साधनांच्या अहर्निश चक्रातून आपण आपली कधी सुटका करून घेऊ शकलो; वस्तू आणि उपभोग, घटना आणि त्यांची कार्ये, विचार कल्पना व सहचारी कल्पना आणि विशेषत: 'सत्य' ह्यांच्या गळचेपी करणाऱ्या अखंड फेऱ्यातून मुक्त होऊ शकलो; संवेदनांच्या केवळ अंगभूत गुणांवर गुंफलेल्या संवेदना आकृतींपुढे उभे राहून अनिमिष नेत्रांनी केवळ त्यांचाच आस्वाद घेण्यात समाधान मानू शकलो; आणि रेषा, रंग, घनरूप इत्यादी संवेदनांच्या लयबद्ध रचनांनी वेडावून जाण्याइतकी नितळ संवेदनाशक्ती टिकवू शकलो व त्या रचनेतून दुसरा कुठलातरी त्या संवेदनांव्यतिरिक्त असा 'अर्थ' शोधून काढण्याचा मोह टाळू शकलो; तर-तरच अजूनही आपल्याला कलेचे गोडवे गाण्याचा अधिकार राहील. आणि दैवी वरदानापेक्षाही श्रेष्ठ अशा वरदानाचे आपण वाटेकरी होऊ'". मर्ढेकरप्रणीत ही 'कलेची फलश्रुती' क्रांतिकारी साहित्याच्या सौंदर्यशास्त्राला सर्वथा मारक आहे. प्रत्यक्ष जीवनापासून व जीवनवादी लौकिक, लौकिक कला व साहित्यविचारांपासून ती दूर गेल्याने बहुजनांच्या साहित्य शास्त्रांची बीजे मर्ढेकरी सौंदर्यमीमांसेत सापडणे अशक्य आहे.

या जाणिवेतूनच जीवनवादी सौंदर्यमीमांसकांनी मर्ढेकरांवर सडकून टीका केली. आणि क्रांतिवादी सौंदर्यशास्त्राचे बीजारोपण केले. त्या सौंदर्यमीमांसकात कुरुंदकर, बेडेकर, मुक्तिबोध, पाटणकर, मनोहर वगैरे नावांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल.

दलित साहित्याचे वेगळे सौंदर्यशास्त्र असू शकते काय ? या वादाचे भोवऱ्यात प्रतिगामी विचारवंत आजवर खितपत पडले आहेत. असे झाल्यास दलितसाहित्याप्रमाणेच दलित सौंदर्य-शास्त्रही आपल्या सौंदर्यमीमांसेची कुरूपता वेशीवर टांगेल ही रास्त भीती तथाकथित उच्चभ्रू सौंदर्यविचारांना भेडसावते आहे. दलित साहित्य हे परिवर्तनवादी, क्रांतिवादी, साहित्य, क्रांतीचे उन्मेष पोटात घेऊन ज्या साहित्याचा जन्म होतो. आणि परिवर्तनाच्या दिशेने गतीचे गीत गात जे साहित्य वाटचाल करते ते सारे क्रांतिकारी साहित्यच असते. त्या साहित्याच्या सौंदर्यमीमांसेचे स्वरूप रूढ पारंपरिक साहित्यविचारांहून सर्वस्वी भिन्न असते. क्रांतिकारी साहित्याचा आणि सौंदर्यमीमांसेचा 'माणूस' हाच केंद्रबिंदू असतो. जीवनातील सत्याला सामोरे जाऊन निर्माण होणाऱ्या साहित्यातून ही सौंदर्यमीमांसा आपले आशय द्रव्य शोधीत असते. सरंजामी सौंदर्य मीमांसेला मूठमाती देऊन वर्णव्यवस्थेला धिक्कारून विषमता, तुच्छता, गुलामगिरी यांचा अव्हेर करून स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय व विज्ञानदृष्टी या प्रकाश मूल्यांचा

स्वीकार क्रांतिवादी साहित्य मीमांसेने करायला हवा. फुले, आंबेडकर, मार्क्स, आगरकर यांच्या नैतिक मूल्यांचा अंगिकार क्रांतिवादी सौंदर्यमीमांसेचे प्राणतत्त्व ठरेल यासाठी डॉ. यशवंत मनोहर म्हणतात, " सौंदर्यशास्त्रातील मार्क्सवादी अलौकिकतावाद किंवा सौंदर्यशास्त्रातील आंबेडकर-वादी अलौकिकतावाद प्रस्थापित करण्यासाठी केवळ बहुसंख्यांकांना गुलाम करणारी उच्चभ्रूंची नैतिकमूल्ये तेवढी नाकारावी लागतात. अलौकिकतावादी सौंदर्यशास्त्राची चौकट कुठेही नाकारावी लागत नाही . हे भांडण सौंदर्यशास्त्रातले नाही. तर भांडण जीवनमूल्याच्या पातळीवरचे आहे. हे उघड आहे. भारतीय अलौकिकतावादी विचाराने जर धर्म, अर्थ, काम, आणि मोक्ष या पुरुषार्थ विचाराऐवजी आंबेडकरी नैतिक मूल्ये अंगिकारली तर साधारणीकरणादी पुढील गोष्टींचाही वाऊ वाटण्याचे काहीच कारण नाही."[१] डॉ. मनोहरांचे हे विचार क्रांतिवादी सौंदर्यशास्त्राला भक्कम पाठबळ देणारे ठरेल, यात शंका नाही. त्यामुळे इहवादापासून दूर जाणाऱ्या व वरवर पुरोगामित्व पत्करून अंतःकरणात अध्यात्म व विषमता पोसणाऱ्या साहित्य विचारांची धुळधाण होण्यास मदत होईल. आणि चिरंतन जीवनमूल्यांवर व मानवतावादी विचारावर अधिष्ठित माणूसप्रेमी साहित्यशास्त्राच्या सौंदर्यबांधणीस हातभार लागेल. परिणामतः दलित, आदिवासी, विमुक्त भटक्यांना त्यात आपलेपणाचा सूर गवसेल. अठरा विश्वे दारिद्र्याने, बेसुमार सामाजिक गुलामगिरीने, अज्ञान व लाचारीने भुईसपाट झालेल्या; पण उत्थानाच्या वाटेने वाटचाल करू इच्छिणाऱ्या मानव समूहास हा एक आशेचा किरण असेल. कारण "दलित साहित्याला. विपन्नतेचा पुरस्कार करणारे सौंदर्यशास्त्र, सौंदर्यशास्त्र असण्याच्या लायकीचे नाही, असे वाटते. सदर साहित्य विचार किंवा कलाविचार जीवनातील कुरूपतेचा पुरस्कार करतो म्हणून या विचाराला 'कौरुप्य शास्त्र' हे नाव अन्वर्थक होईल, असे त्याला वाटते. आणि परिवर्तनशील मूल्यभावाशी बांधिलकी सांगणारा सौंदर्यविचार मग तो अलौकिकता वादातील एक ध्रुव असो वा लौकिकता-वादामधील एक ध्रुव असो दलित सौंदर्यशास्त्राला त्याच्याशी आपले नाते आहे असे वाटते."[१]

क्रांतिवादी सौंदर्यशास्त्राची उज्वल परंपरा जोपासण्याचे महत्त्वपूर्ण कार्य मार्क्सवादी तसेच पुरोगामी सौंदर्यशास्त्रानेही अव्याहतपणे चालविले आहे. विश्वपातळीवरचा शोषित-सर्वहारावर्ग या साहित्याचा विषय असतो. आकृतीवादाच्या भुसभुशीत भूमीत हे साहित्य व त्याचे साहित्य-शास्त्रही कधीच स्थिरावत नाही. शोषित सर्वहारांना क्रांतीप्रवण करून 'नव्या मनूतील गिरीधर पुतळा' ते साकार करीत असतात. ही प्रतिभा 'साम्य मन्वंतराच्या गुलाबी पहाटेचे गीत गात' पुढे जात असते. स्थितीला तुडवीत ते गतीचे मार्गस्थ बनतात. आणि शोषणविरहित समता समाज निर्मितीच्या दिशेने त्यांची वाटचाल चालू असते. गरीब श्रीमंतांच्या विरोधात त्यांना वेगळे लयतत्त्व दिसत असते.

"श्रीमंतांच्या व गरिबांच्या कृतीतील नुसता विरोध न्याहाळण्याचा आनंद रसिक कधीच घेत बसणार नाही. आसन्नमरण भिकाऱ्याच्या उपस्थितीमुळे त्याला जे मानवी मूल्यात्म जाणिवेचे आवाहन मिळाले त्यामुळे व त्यामुळेच फक्त श्रीमंत गरिबाच्या कृतीला अर्थ प्राप्त झाला. व त्यामधील विरोध प्रत्ययाला येऊ शकला. या विरोधातून जीवनाचा एकार्थ प्रतीत होणे ही अटळ गोष्ट आहे."[४]

"माणसाचे प्रत्यक्ष सामाजिक अस्तित्व existence अशा प्रकारे मूल्यविश्वाचे अस्तित्व असते. ही मूल्ये समाजसापेक्ष मूल्ये असतात. कलावंत अशाच प्रकारच्या विश्वात जगतो व कला निर्मिती करतो व रसिक अशाच प्रकारच्या विश्वात जगतो व कलाकृतीचा आस्वाद घेत असतो."[५]

प्रा. शरच्चंद्र मुक्तिबोधांनी मांडलेला समाजसापेक्ष मूल्यांचा हा विचार क्रांतिवादी साहित्य-शास्त्राचा प्रखर मार्गदीप आहे. या जाणिवेतून सदरहू सौंदर्यविचाराचे विकसन व्हावे अशी माझी नम्र अपेक्षा आहे. मुक्तिबोध पुढे म्हणतात, "'मानुषता' हे मानवाचे मुळातले असणे, essence, आहे, व समाजाची परिवर्तनशीलता ही माणसाची होत जाण्याची, becoming, प्रक्रिया आहे. या

प्रक्रियेचे अंतिम उद्दिष्ट मानुषता व प्रत्यक्ष सामाजिकता यामधील द्वैत नष्ट करणे हेच आहे. मानवी अनुभवांमध्ये 'असणे' आणि 'होत जाणे' या दोहोंची एकरसता, एकता साधली गेलेली असते. त्याची जाणीव मात्र कुणाला नसते म्हणून 'असण्याला' ओळखणे हेच परमतत्त्व ठरते."[६]

"'मानुषता' सकलात्म मानुषता हेच ललित कृतीचे संघटक तत्त्व होय. हे तत्त्व मान्य केल्यास ललित कृतीचे सर्व प्रश्न सुटतात. तिचा व्यवच्छेदक निकष सापडतो. त्याच्या आधारे तिच्या श्रेष्ठकनिष्ठतेचा प्रश्न सुटतो. श्रेष्ठ ललितकृती म्हणजे शाश्वत ललित कृती. ललितकृतीच्या शाश्वततेचे मर्मही त्यामुळे उलगडू शकते"[७]

"क्रांतिवादी सौंदर्यशास्त्राला उपयुक्त ठरणारे विचार मुक्तिबोधांप्रमाणेच अनेक विचारवंतांनी मांडले आहेत. त्यातून माणूस, मानवी मूल्ये, समाज आणि त्याचेशी निगडित विविध घटकांचाही त्यांनी परामर्श घेतला आहे. ए. झीस म्हणतो. 'कलेच्या ऐतिहासिक व वर्गीय मूल्यबद्धतेवर भर देताना मार्क्सवाद-लेनिनवाद अखिल मानव जातीला समान असणाऱ्या परिवर्तनीय मूल्यांच्या क्षेत्रापासून कलेची फारकत करीत नाही."[८]

"कलेचे ज्ञानात्मक कार्य आणि वैचारिक व शैक्षणिक क्षेत्रातले कार्य कलेच्या सौंदर्य विज्ञानीय प्रभावामुळेच पार पडते...जीवनाच्या सत्यपूर्ण प्रतिबिंबनाशिवाय कलेला वैचारिक आणि सौंदर्य विज्ञाननिष्ठ कार्य करता येणे शक्य नाही. त्याच बरोबर हेही खरे की, कलेची निर्मिती कलेच्या नियमानुसार झाली नाही आणि कलाकृतीला सौंदर्य विज्ञाननिष्ठ मूल्यांचा दर्जा प्राप्त करून घेता आला नाही तर कलेतील जीवनाचे सत्यपूर्ण प्रतिबिंबनही शक्य नाही."[९]

तर गोर्की म्हणतो "कला हा 'बाजूने' किंवा 'विरुद्ध' असा लढा असतो. निर्विकार अशी कला असत नाही किंवा असू शकत नाही. कारण माणूस हा काही छायाचित्रण यंत्र नसतो. तो वास्तवता 'स्थिर' करीत नाही. तो वस्तुस्थिती सांगतो, बदलतो किंवा नष्ट होतो."[१०]

बदलणे किंवा नष्ट होणे या तत्त्वांचा अंगिकार करणाऱ्या क्रांतिवादी सौंदर्यशास्त्राची आज खऱ्या अर्थाने गरज आहे. या तत्त्वातच बाबासाहेबांच्या शिका, संघटित व्हा व संघर्ष करा या मंत्राचाही प्रत्यय आपणास घडू शकतो फुले, मार्क्स आदींचे पुरोगामित्व त्यातूनच जोपासले जाते. ही तत्त्वे नवसमाजासाठी उपयुक्त ठरणारी असल्याने परस्परांना अत्यंत जवळचा असतात. त्यांचा योग्य तो संगम साधून क्रांतिवादी सौंदर्यमीमांसेने वाटचाल करावी. समता स्वातंत्र्यादी वरील पंच प्रकाश मूल्यांचा स्वीकार करून फुले आंबेडकरवादी नीतिमूल्यांचा, मार्क्सवादी व विश्वपातळीवरील पुरोगामी सौंदर्यविचारांच्या समृद्ध संयोगातून क्रांतिवादी साहित्याचे सौंदर्यशास्त्र साकार व्हावेसे मला वाटते. ■

संदर्भ सूची—

(१) बाळ सीताराम मर्ढेकर 'सौंदर्य आणि साहित्य' मुंबई / ति. आ. १९७५ पृ. ५२

(२) यशवंत मनोहर, 'दलित साहित्य चिंतन' / नागपूर, १९८८ पृ. ३७, ३८

(३) तत्रैव पृ. ०४

(४) शरच्चंद्र मुक्तिबोध, 'सृष्टी सौंदर्य आणि साहित्यमूल्य' / मुंबई, पृ. १३८

(५) तत्रैव पृ. १४७ (६) तत्रैव पृ. १५२ (७) तत्रैव पृ. १६०

(८) ए. झीस., 'मार्क्सवादी लेनिनवादी सौंदर्य विज्ञान आणि जीवन' (अनु. सदा कऱ्हाडे) मुंबई १९८० पृ. ६१

(९) तत्रैव पृ. ७४

(१०) मॅक्झीम गोर्की तत्रैव (वरून उद्धृत) पृ. १३५

ग्रामीण साहित्याची चळवळ आणि ग्रामीण कादंबरी

रवीन्द्र नारायण ठाकूर

१९७५ च्या सुमारास ग्रामीण साहित्य चळवळ सुरू झाली. दलित साहित्यापाठोपाठ झालेला हा आणखी एक सांस्कृतिक उद्रेक होता. ज्या सामाजिक अपरिहार्यतेतून दलित साहित्य चळवळीचा उदय झाला तीच सामाजिक परिस्थिती ग्रामीण साहित्य, जनवादी साहित्य, आदिवासी साहित्य या चळवळींना कारणीभूत ठरली. स्वातंत्र्योत्तर काळात सार्वत्रिक शिक्षणामुळे ग्रामीण बहुजन समाजात सांस्कृतिक चलन-वलनास प्रारंभ झालेला होता. आपणही आपल्या भावनांना शब्दरूप देऊ शकतो हा आत्मविश्वास ग्रामीण नवशिक्षित तरुणाला येऊ लागला होता. उच्चवर्णीयांची मक्तेदारी, शोषणाचे भक्ष्य ठरलेला बहुजन समाज, त्याच्या पुढील वाढत चाललेल्या समस्या आणि दलित समाजात झालेली जाणीव-जागृती या बाबी तो उघडया डोळयांनी पहात होता. येथे त्याची वेगळी मनोभूमिका तयार होऊ लागली.

परिवर्तनवादी चळवळी गतिमान झालेल्या या काळात ग्रामीण साहित्यानेही आपली भूमिका स्पष्ट केली. आणि येथेच ग्रामीण साहित्य चळवळ सुरू झाली. समतावादी मूल्यांच्या प्रेरणेतून विराट ग्रामीण समाजाची सुखदु:खे व्यक्त झाली पाहिजेत या हेतूने आनंद यादव, रा. रं. बोराडे, चंद्रकुमार नलगे, नागनाथ कोत्तापल्ले यांनी या चळवळीला वैचारिक पाठबळ दिले. संमेलने, मेळावे व परिसंवाद यातून चळवळीची भूमिका मांडली जाऊ लागली. यामुळे ग्रामीण नवलेखकांना नवे आत्मभान आले. त्याच्यापुढील कोणासाठी लिहायचे, काय लिहायचे हे प्रश्न स्पष्ट झाले. नव्या ग्रामीण लेखकाने ग्रामीण साहित्याची परंपरा नाकारली मात्र नाही. या जाणीवजागृतीचा ग्रामीण साहित्यनिर्मितीवर सर्वंकष प्रभाव पडला असेही म्हणता येणार नाही. म्हणजे चळवळीच्या काळातली ग्रामीण कादंबरी ही संमिश्र स्वरूपाचीच राहिली. चळवळीच्या काळात लेखन करणाऱ्या काही ठळक लेखकांचा परामर्श येथे घ्यावयाचा आहे.

आनंद पाटील यांच्या 'कागूद', आणि 'सावली' (१९८६) या दोन लघु कादंबऱ्या हा बोराडे-यादव यांच्या नंतरच्या ग्रामीण कादंबरीचा लक्षणीय टप्पा आहे. एखादे शेत खरेदी करतांना आणि त्याचे खरेदी खत करून घेताना शेतकऱ्यांना किती अनंत अडचणींना तोंड द्यावे लागते याचे वास्तवता-पूर्ण चित्र 'कागूद 'मध्ये आले आहे. घटना नित्याची आणि साधीच परंतु ग्रामीण माणसाच्या जीवनाचे अस्सल दर्शन घडवून जाते. शेतखरेदीच्या निमित्ताने भाऊबंदाचे द्वेष-मत्सर उफाळून येतात, सेक्रेटरीसारख्या लोकांनाही पैसे खाण्याची पर्वणीच वाटते. कॉलेजात शिकणाऱ्या बाबूलाही ही बेरकी माणसे सहज फसवून जातात. शहरात कॉलेज शिकणाऱ्या बाबूने ही कथा सांगितली आहे. जीवनानुभव तो आहे तसा मांडतो. भाषेबाबतही प्रमाण किंवा ग्रामीण असा प्रश्न उपस्थित होत नाही. आशयाशी सुसंगत अशी प्रमाण आणि ग्रामीण यांना सहज सामावून घेणारी भाषा तो वापरतो. 'सावली 'मधील जीवनानुभवही अस्सल ग्रामीण आहे. घर बांधून घेण्याच्या व्यापात खेडयातल्या एका गरीब कुटुंबाचे प्राण कसे कंठाशी येतात याचे चित्रण या कादंबरीत आले आहे. धोंडीबा घर बांधण्याचे ठरवितो आणि प्रत्येकजण आपल्या परीने होतील तेवढया अडचणी निर्माण करण्याचा प्रयत्न करतो. घरापायी धोंडीबा कर्जात बुडतो. ग्रामीण वास्तवाचे सशक्त भान दाखवून देणाऱ्या या लेखकाकडून आणखी अपेक्षा बाळगता येण्यासारखी आहे.

ग्रामीण संवेदनशीलतेतून लेखन करणाऱ्या उदयोन्मुख ग्रामीण लेखकात पुरुषोत्तम बोरकर हे एक दमदार नांव आहे. त्यांची 'मेड इन इंडिया' (१९८५) ही पहिलीच कादंबरी तिच्या वेगळेपणा-

मुळे चर्चेचा विषय ठरली. या पहिल्याच कादंबरीत लेखकाने कादंबरीच्या रूपाची, तिच्या सामाजिक आशयसूत्राविषयीची जबरदस्त जाण दाखविली आहे. पंजाबराव पाटील ही या कादंबरीतील मुख्य व्यक्तिरेखा आहे. स्वतःचा परिचय करून देताना तो म्हणतो, 'मी सरपंच ह्या गावाचा. गरसोई खुर्दचा, तांबेरा पळेल लोकाईनं निवळून देयेल सरपंच.' आपल्या भोवतीच्या समाजाकडे, माणसांकडे आणि स्वतःकडेही मिस्किलपणे पहात ग्रामीण भागात जीवनमूल्यांची कशी पडझड होत चालली आहे आणि शहरी करणाऱ्या प्रक्रियेत ग्रामीण जीवन कसे प्रदूषित होत चालले आहे याचे वर्णन पंजाबराव करीत जातो. एकूणच विकृतीकडे वाटचाल करणाऱ्या ग्रामीण जीवनवास्तवाचे भेदक दर्शन घडविणारी ही एक अभिनव कादंबरी आहे.

एका शेतकऱ्याची शोकांतिका चितारणारी यशस्वी कादंबरी म्हणून बाबाराव मुसळे यांच्या 'हाल्या हाल्या दुधू दे'चा (१९८५) विचार करावा लागतो. या कादंबरीच्या प्रस्तावनेत द दि. पुंडे लिहितात, 'ग्रामीण कादंबरीतून व्यक्त होणारा जीवनानुभव हा ग्रामीण जीवनानुभव असावा लागतो. तो पुन्हा ग्रामीणतेशी केवळ संलग्न असून चालत नाही तर, तो ग्रामीण जीवनाचा एक अपरिहार्य भाग असावा लागतो.' या कादंबरीबाबत हा प्रत्यय येतो हे मात्र निश्चित.

'मेलेलं पाणी'– मधून ढोर समाजाचे जीवन शब्दरूप करणाऱ्या अशोक व्हटकरांनी 'वगाड' (१९८४) लिहून ग्रामजीवनाचे एक वेगळेच रूप वाचकासमोर ठेवले आहे. जीवघेण्या धार्मिक परंपरांत जखडलेल्या कुटुंबाचे चित्रण करणारी ही कादंबरी ग्रामीण जीवनाचे सखोल परिमाण घेऊन येते. कुटुंब संस्थेच्या विघटनाचे विष अनिच्छेने पचविणारा हा समाज यांत्रिकीकरणाचे आक्रमण मात्र सहन करू शकत नाही. ज्या शेतासाठी नवस केला होता तेच शेत रेल्वेच्या रूळाखाली जाणार ही कल्पनाच हंबीरला सहन होत नाही. जमीन गेलेली, कुटुंब उद्ध्वस्त असलेले अशा स्थितीतही तो बगाडाचा नवस हैवतीकरवी फेडून घेतो. कारण त्याशिवाय त्याच्या आत्म्याला शांती मिळाली नसती.

नागनाथ कोत्तापल्ले हे ग्रामीण साहित्य चळवळीतील महत्त्वाचे नाव आहे. त्यांच्या 'उलट चालिला प्रवाहो' (१९८५) आणि 'गांधारीचे डोळे' (१९८५) या कादंबऱ्या ग्रामीण भागात शिरलेल्या जातीयवादी राजकारणाचे हिडीस स्वरूप वर्णन करतात.

राजन गवस यांनी 'चौंडकं' (१९८५) आणि 'भंडार भोग' (१९८८) या कादंबऱ्या लिहून जोगतिणी आणि जोगत्या यांच्या जीवनाचे दुःखभोग चित्रित केले आहेत. ग्रामीण भागातील सहकाराचे क्षेत्र आता स्वाहाकार क्षेत्र कसे बनले आहे याचे वास्तवतापूर्ण चित्र म्हणजे वासुदेव मुलाटे यांची 'विषवृक्षाच्या मुळ्या' (१९८९) ही कादंबरी होय ग्रामीण भागाचा कायापालट घडविण्यासाठी ही चळवळ राबविली जात आहे असे आपण म्हणतो परंतु प्रत्यक्षात खरोखरच तसे घडत आहे का हा प्रश्न या कादंबरीने उभा केला आहे. रामचंद्र पठारे यांनी ग्रामीण पुढाऱ्यांच्या ढोंगी पुरोगामित्वाचे पितळ 'पाचर' (१९८९) ही कादंबरी लिहून उघडे पाडले आहे.

याखेरीज विश्वास पाटील यांची 'पांगिरा' (१९९०) ही समकालीन समाजवास्तवाचे वास्तवदर्शी चित्रण करणारी महत्त्वाची कादंबरी म्हणावी लागेल. 'मंधान' (१९८०) ही वंकट पाटील यांची मराठवाड्याचे प्रादेशिक वास्तव चित्रण करणारी कादंबरी आहे.


बा ग केसकर यांची 'वायटूळ' (१९८३), वामन पात्रीकरांची 'जगबुडी', ल. ना. केरकर यांची 'आलेख', गणेश आवटे यांची 'कागूद' (१९८२), पांडुरंग कुंभार यांची 'गावकूस' (१९८३) आणि मोहन पाटील यांच्या 'लिगाड' व 'खांदेपालट' या कादंबऱ्या उल्लेखनीय ठरतात.

या काळात लिहिल्या गेलेल्या माधव कोंडविलकर, उत्तम बंडू तुपे, सदा कऱ्हाडे यांच्या कादंबऱ्यांतूनही ग्रामीण वास्तवाचे दर्शन घडते. कोंडविलकरांच्या 'अजुन उजाडायचं आहे' (१९८१) या कादंबरीत नवशिक्षित दलित तरुणाची व्यथा शब्दरूप घेते. त्यांच्या छंद, झपाटलेला या कादंबऱ्याही याच स्वरुपाच्या आहेत. 'लावला तर झुलवा न्हाय तर कुणीबी हलवा' असे जीवन वाट्याला आलेल्या परंतु त्याविरुद्ध बंड करून उठलेल्या जगन या जोगतिणीची कथा 'झुलवा' (१९८६) या कादंबरीत उत्तम बंडू तुपे यांनी सांगितली आहे. तसेच नवशिक्षित ग्रामीण तरुणाची मानसिक वाताहत 'चिपाड' या कादंबरीत त्यांनी वर्णिली आहे; याखेरीज त्यांनी 'झावळं', 'खाई', 'इमाळं', इत्यादी अनेक कादंबऱ्या लिहिल्या आहेत.

'घराणं तमासगिराचं' (१९८९, शशिकांत तासगावकर), 'कालगर्भ' (१९९०, विजय सिरसट), तीन भिंती (१९९०, वैजनाथ कळसे) 'गावकुसावाहेरची वस्ती' (१९८७, सदा कऱ्हाडे) इत्यादी कादंबऱ्या ग्रामीण भागातले दलित जीवन अभिव्यक्त करतात.

मधुकर वाकोडे (झेल झपाट, १९८८), अनिल सहस्रबुद्धे, (डांगाणी, १९८५), सुरेश द्वादशीवार (हाकुमी, १९९०) यांनी आदिवासी जनजीवनाचे चित्रण केले आहे.

याच काळात एकीकडे वास्तववादी प्रवृत्तीतून ग्रामीण कादंबरी लिहिली जात असतांना दुसरीकडे व. ब. वोधे, रंगराव बापू पाटील यांच्या सारखे काही लेखक लोकप्रिय ग्रामीण कादंबरीचा कित्ता गिरवित राहिले. त्यांच्या कादंबरीचा पूर्वावतार बाबा कदम, देवदत्त पाटील यांच्यात दिसून आला होताच. बोधे यांनी जंगल, कातण, वाघीण, गुंडगी, चांगभलं, गजरी, बिजली, भुंगा इत्यादी अनेक कादंबऱ्या लिहून रुचिपालटाचा आनंद मिळवू पहाणाऱ्या शहरी वाचकाला खूपच खाद्य पुरविले आहे. बोधे यांच्याजवळ अनुभवांचे भांडार आहे परंतु रंजनवादी प्रवृत्तीत वाहवत गेल्याने



त्यांच्या कादंबऱ्यांची गुणवत्ता मारली गेली आहे. 'दंश'मध्ये रंगराव बापू पाटील यांनी बकुळा आणि शिर्पा पैलवान यांची शृंगारकथा वर्णिली आहे

अशा प्रकारे चळवळीच्या काळातल्या ग्रामीण कादंबरीचा स्थूल आढावा आपण घेतला. अनेक प्रवृत्ती-प्रवाहांनी गजबजलेल्या आजच्या वाङ्मयीन संस्कृतीत ग्रामीण कादंबरीचे स्वरूपही समिश्र राहावे हे स्वाभाविकच ठरते. तथापि यात समकालीन समाजवास्तवाला सजगपणे सामोरा जाणारा आधुनिक ग्रामीण कादंबरीचा प्रवाह ठळकपणे उठून दिसतो. ग्रामीण, दलित आणि आदिवासी जनजीवन या तीनही अनुभव क्षेत्रांना हा प्रवाह सामावून घेताना दिसतो. ग्रामीण साहित्याची समृद्ध परंपरा पाठीशी असलेली ही कादंबरी भविष्यातही विविध अनुभवक्षेत्रे आत्मविश्वासाने पादाक्रांत करील असे वाटल्याशिवाय राहात नाही. ■

आम्रपाली, ४२, रंकाळा पार्क, कोल्हापूर.

आंतवर्तुळातील साहित्य : साहित्य विचाराची भूमितीय परिभाषा

डॉ. मदन कुलकर्णी

साहित्य क्षेत्राचा विचार भूमितीतील वर्तुळाच्या परिभाषेत देखील मांडता येऊ शकतो. त्या करिता सपूर्ण साहित्य व्यवहार तीन वर्तुळांमध्ये कल्पिता येतो. साहित्याचे जर एक अतिभव्य वर्तुळ कल्पिले तर त्या वर्तुळाच्या मध्यबिंदूपासून त्या वर्तुळाच्या त्रिजेच्या मध्यभागी एक दुसरे वर्तुळ कल्पिता येते. त्याला आपण मध्यवर्तुळ असे नाव देऊ शकू. या मध्य वर्तुळाच्या पोटात केन्द्र बिंदूपासून लगतच असे एक अतिलघु वर्तुळ कल्पून आपण त्याला आंतर-वर्तुळ म्हणून संबोधू शकतो या अतिलघु अशा आंतर-वर्तुळाचा व्यास अन्य दोन वर्तुळांच्या तुलनेत फारच लहान असणार हे उघड आहे.

साहित्यातील हे जे अतिलघु-वर्तुळ (यापुढे आपण त्याला आंतर-वर्तुळ म्हणून संबोधणार आहोत) असते ते साहित्यातील अभिजन वर्गाचे (Elite Class) वर्तुळ असते. या वर्तुळातील वाचक वर्ग वेगळा तसा लेखकवर्गही वेगळा असतो. वाचक वर्गाबद्दल सांगायचे तर आंतर-वर्तुळातील हा साहित्य-वाचक चोखंदळ, रसिक आणि समीक्षक वृत्तीचा असतो. त्यामुळे एकूणच साहित्याच्या भवितव्याचा विचार करणाराही हा वर्ग असतो. तसेच एकूण वाङमयीन व्यवहाराकडे हा वाचक गांभीर्याने पाहणारा असतो. या वाचक वर्गात समीक्षक, चिंतक, साहित्य शिकविणारे आणि वाचणारे प्राध्यापक आणि अन्य जाणते वाचक यांचा अंतर्भाव होतो; वाचकांप्रमाणेच या आंतर-वर्तुळातील लेखकवर्गही वेगळा असतो. मराठीपुरते बोलायचे तर कादंबरीच्या क्षेत्रात भालचंद्र नेमाडे, भाऊ पाध्ये, चि. त्र्यं. खानोलकर, पु. शि. रेगे, कमल देसाई; कथेच्या क्षेत्रात गंगाधर गाडगीळ, जी. ए. कुळकर्णी, श्री. दा. पानवलकर; कवितेच्या क्षेत्रात मर्ढेकर, मुक्तिबोध, पु. शि. रेगे, ग्रेस, आरती प्रभु, श्रीधर शनवारे; नाटकाच्या क्षेत्रात विजय तेंडूलकर, रत्नाकर मतकरी, महेश एलकुंचवार, सतीश आळेकर इत्यादी साहित्य-प्रवाहाला नवा जोम देणाऱ्या लेखकांचा समावेश करता येतो. (यापैकी काही लेखक तर अनेक वाङमयप्रकार समर्थपणे हाताळीत आहेत. येथे केवळ उदाहरणा दाखल काही नावे नोंदविली आहेत) या आंतरवर्तुळातील साहित्यिकांचे साहित्य अन्य वाचकांना आकलनाबाहेरचे वाटते. त्यामुळे अशा साहित्यापासून अन्य वर्तुळातील वाचक वर्ग बहुतेक दूर असतो. याचा अर्थ अन्य वाचक हे साहित्य वाचत नाहीत असे नाही. ते वाचतात पण या साहित्याचे एकूण स्वरूप पाहून ते एकतर नाकारले जाते किंवा बाजूला तरी

सारले जाते. मात्र या गोष्टीची दखल येथे घेतली पाहिजे की या आंतरवर्तुळातील साहित्यिकांनी सहजगम्य होईल किंवा सहजगम्य वाटणारेही असे काही साहित्य लिहिलेले असते किंवा मधून-मधून ते तसे लिहीतही असतात. (यासंबंधी थोडी विस्ताराने चर्चा पुढे करावयाची आहे.)

मध्यवर्तुळाची आपण जी कल्पना केलेली आहे त्या वर्तुळांतर्गत येणारा वाचक वर्ग म्हणजे विद्यार्थी-वर्ग, शिक्षक आणि शिक्षितांची वर्ग तसेच अल्प शिक्षित पण साहित्याची आवड असणारा नोकरपेशा वा कामकरी वर्ग असतो. यांच्यासाठी लेखन करणारा एक लेखक वर्गही असतो. तसे पाहता या वर्तुळातील लेखक किंवा वाचक म्हणजे साहित्य-प्रांतातील सीमारेषेवरचा वर्ग असतो. नामवंत साहित्यिक या वर्गासाठी दर्जेदार पण सहजगम्य पारंपरिक साहित्य-प्रकारांना धरून लेखन करीत असतात. या वर्तुळातील वाचकांची अभिरुची संपन्न करीत असतात. या वर्तुळातील वाचक वर्गाचे साहित्यिक, साहित्यकृती, आणि एकूण वाङ्मय व्यवहाराकडे बारकाईने लक्ष असते. हे वाचक सहजगम्य आणि अगम्य असे वाङमय वाचतात. त्यावर 'आवडले', 'आवडले नाही,' 'दुर्बोध' अशा प्रकारचे अभिप्राय देऊन बाजूला सारतात. क्वचित एखाद्या गाजलेल्या कला-कृतीसंबंधी थोडे चिंतनही करतात. या प्रयत्नात या मध्य-वर्तुळातील काही वाचकांचा प्रवेश हळूहळू साहित्यातील अभिजन वर्गात म्हणजे आंतरवर्तुळातील वाचकात होत असतो. होतोच असे नाही. परंतु होऊ शकतो.

या दोन वर्तुळांच्या पलिकडे तिसरे जे सर्व समावेशक असे तिसरे व्यापक वर्तुळ आपण कल्पिले आहे त्यात सामान्य वाचक, ज्यांना हलके-फुलके, रंजक अशा प्रकारचे साहित्य हवे असते, अशा वाचकांचा वर्ग येतो. या वाचक वर्गासाठी लिहिणारी लेखक मंडळीही भरपूर असतात. या वाचकां-पैकी काही वाचक अभिरूचीसंपन्न होत होत मध्यवर्तुळातील आणि त्यांच्यापैकीही काही आंतर-वर्तुळातील साहित्याकडे वळत असतात. हा वाचकांचा प्रवास असा बाह्य विशाल वर्तुळाकडून आंतर वर्तुळाकडे सतत सुरू असतो. क्वचित लेखकांच्या बाबतीतही असा प्रवास संभवनीय असतो. पण अशी शक्यता फारच कमी असते. लेखकांच्या बाबतीत हा प्रवास विरुद्ध दिशेने अधिक संभवनीय असतो.

उपरोक्त तीन वर्तुळांपैकी आंतर-वर्तुळातील साहित्याचे वेगळेपण वादातीत असते. असे साहित्य काही विशिष्ट हेतू मनाशी धरून केलेले असते काय ? असा एक प्रश्न उपस्थित होऊ शकतो. कदाचित असे साहित्य कळत नकळतही लिहिलेले असू शकते. परंतु हे लक्षात घेतले पाहिजे की अशा आंतर-वर्तुळातील साहित्याचा एक अहंभाव असतो. या साहित्याची एक व्याजोक्त जबाब-दारी, त्यातून व्यक्त होणारे ज्ञान, समकालीनत्वाच्या, युगभान सांभाळणाऱ्या प्रवृत्ती या एकूण साहित्याला एक पाऊल पुढे टाकायला लावतात. यामुळेच साहित्यात काही नवे घडू लागते. साहित्यातील आवर्त नाहीसे करायला असे आंतर-वर्तुळातील साहित्य मदत करीत असते त्यामुळे साहित्य प्रवाहाला एक नवेपण प्राप्त होते. त्याच बरोबर अशा साहित्यासंबंधी काही गैरसमजुतीही निर्माण होतात. [तर काही कलाकृती आनंदही निर्माण करण्यास कारणीभूत ठरतात.] उदाहरणेच द्यायची झाली तर काही अशी उदाहरणे देता येतात. जसे ग्रेस यांच्या कविता आणि ललित-निबंध, गंगाधर गाडगीळांची 'बिनचेहऱ्याची संध्याकाळ' सारख्या काही कथा, जी. ए. चे बहुतांश कथासाहित्य, कमल देसाईंची 'काळासूर्य' सारखी कादंबरी या बाबतीत वाचक-समीक्षकाच्या समजुती-गैरसमजुती प्रसिद्धच आहेत. अशा साहित्यातील दुर्बोधता, वाचकांना जाणवणारी अनाकलनीयता हे या साहित्य संदर्भातील गैर समजुतींचे कारण असू शकते. दुसरे कारण असे की आंतर-वर्तुळातील साहित्य अनेक बाबतीत वाचकांच्या साहित्य-विषय जाणिवांना धक्का देणारे असते. आशय आणि अनुभूतीच्या पातळीवरील नावीन्य त्यांच्या पूर्वानुभवाला छेद देणारे असल्याने आणि कथा, कादंबरी, नाटक आणि कविता या साहित्य-प्रकारांच्या रूपबंधाचे जे पारंपरिक संस्कार वाचकांवर असतात त्यात न बसणारे असे हे साहित्य असल्याने या साहित्यासंबंधीच्या


गैरसमजुती प्रचलित होतात. (सामान्य वाचकांपासून असे साहित्य याच कारणांनी दूर दूर राहात असावे का ?) त्यातून मग काही जुजबी आणि सुमार निष्कर्ष काढले जातात. जसे कादंबरी मृतप्राय झाली आहे. कविता आवर्तात सापडलो आहे. कथा प्रवाह कुंठित झालेला आहे. एवढेच नव्हे. तर 'अमूक एक साहित्य साहित्यच नव्हे इथपर्यंत निष्कर्ष काढले जातात. याचे महत्त्वाचे कारण या आंतर-वर्तुळातील साहित्याच्या आकलनाला तत्सदृश्य पूर्ववर्ती वाङ्मयासंबंधीच्या वाचकांच्या धारणाही कारणीभूत असतात हेच आहे. दुसरे म्हणजे जीवनार्थ-संपृक्त अशा आंतर-वर्तुळातील साहित्यामध्ये लेखकाने जे आदिभौतिक आणि अतिभौतिकीय प्रश्न उपस्थित केलेले असतात, त्याची चिकित्सा केलेली असते. त्या प्रश्नांना कलावंताच्या आणि कलाकृतीच्या पातळीवर समजून घेणे वाचकांना शक्य होत नाही. अन् आकलन झालेच तर ते त्रुटीत स्वरूपाचे असते. म्हणूनच सामान्यतः मध्यवर्तुळातील वाचक आंतर-वर्तुळामधील साहित्याकडे आपुलकीने आणि कुतूहलाने पाहात असला तरी हे आपल्यासाठी नाही अशी भावना अशा वाचकांमध्ये निर्माण होत असावी. असे असले तरी साहित्याचा जो मर्मज्ञ वाचक असतो त्याला मात्र हे आंतर-वर्तुळातील साहित्य आनंद देणारे वाटते. त्या साहित्यकृतींचे मोठेपण त्यांना जाणवते. नावीन्याची हमी मिळते आणि या नावीन्याला मूल्ययुक्ततेची जोड मिळालेली आहे, हेही जाणवू लागते. असे साहित्य एकूण साहित्याच्या प्रगतीची दिशा दर्शविणारे आहे असे वाटू लागते. अशा साहित्यातून नावीन्याबरोबरच ओळखीच्या खुणाही त्यांना दिसत असतात. या साहित्यातून काही उच्चतेचा आणि परिपूर्णतेचा भाव जाणवत असतो. एकदंरीत या आंतर-वर्तुळातील साहित्यामागे निवडक वर्गासाठी साहित्य-निर्मिती हा गर्विष्ठ-पणाचा भाव असतो असे म्हणता येईल. असे आंतर-वर्तुळातील साहित्य, जाणकारांसाठी असलेले साहित्य, नेहमीच साहित्य क्षेत्रात राहणार आणि त्याचे वेगळेपण सुद्धा वादातीतच राहणार. कदाचित वादग्रस्त सुद्धा !

साहित्यातील ज्या तीन वर्तुळांची आपण कल्पना केली आहे अशी साहित्याची-वाचकांची वर्गवारी अनेकांना न पटण्याचीच शक्यता अधिक आहे. याचे कारण साहित्य आणि करमणूकप्रधान वाङ्मय अशी विभागणी मराठी साहित्यात आढळत नाही. (खरे म्हणजे तशी ती आहे पण या विभागणीला मान्यता दिली जात नाही. जाणार नाही.) वर्गविहीन समाजरचना अपेक्षिणाऱ्या मार्क्स-वादी मंडळींना तसेच सामाजिक बांधिलकी मानणाऱ्या मंडळींना अशी विभागणी मुळीच पटणार नाही. 'साहित्याचे सामाजिकरण' हा तर आज परवलीचा शब्द आहे. साहित्याने बहुसंख्यांकांपर्यंत पोहचले पाहिजे ही मागणी लक्षात घेतली तर आंतरवर्तुळातील साहित्याला काही तडजोडी कराव्या लागतील. सर्वप्रथम म्हणजे 'निवडक वर्गासाठी साहित्यनिर्मिती' या गर्विष्ठपणाचा त्याग करावा लागेल. दुसरे म्हणजे संभाव्य वाचकांशी संबंध प्रस्थापित करण्यासाठी बहुसंख्य वाचकांना समजेल अशी भाषा वापरावी लागेल तरच समाजाच्या मोठ्या वर्गापर्यंत हे साहित्य पोहचू शकेल. परंतु या तडजोडीतूनच काही वाङ्मयीन-प्रगतीसंदर्भात महत्त्वाचे प्रश्न उपस्थित होतात. उदा. अशा स्थितीत साहित्याने आपला कलात्मक दर्जा सोडावा काय ? भाषा सुबोध असावी म्हणजे किती सुबोध असावी ? वास्तववादी स्वरूप किती आणि कशाप्रकारचे असावे ? या प्रश्नांची काही उत्तरे शोधण्याचा प्रयत्न टाळता येणार नाही.

खरे म्हणजे आपला कलात्मक दर्जा सोडावा असे कोणीच म्हणणार नाही. कलात्मकतेचे अंग गमावून बसलेले लेखन साहित्य म्हणण्याच्या लायकीचे तरी राहील काय ? तेव्हा कलात्मता ही कलाकृतीचे अपरिहार्य अंग आहे. दुसरा प्रश्न भाषेचा ! सुबोधतेलाही काही मर्यादा असाव्यात की नाही ? साहित्याचे माध्यम भाषा आहे हे खरे तरी ललित साहित्याची भाषा म्हणून तिला स्वतंत्र अस्तित्व असते ही गोष्ट अमान्य कशी करता येईल ? याचाच अर्थ असा की साहित्याच्या भाषेचे काही वेगळेपण आपल्याला मान्य करावेच लागेल. आज साहित्य क्षेत्रात वक्तृत्व आणि भाषा-समृद्धी

यांनी वातावरण गजबजलेले आहे. आशयाला पायदळी तुडवून शब्दांचे नर्तन साहित्यात चाललेले आहे. जोपर्यंत या शब्दांना, भाषेला साहित्यकृतीच्या विषयातून रंगरूप मिळणार नाही तोपर्यंत ती भाषा श्रेष्ठ साहित्य-निर्मितीला उपयुक्त ठरणार नाही. सामाजिक बांधिलकीच्या पुरस्कर्त्यांकडून बरेचदा वाङ्मयीन वास्तववादाची भाबडी मागणी केली जाते. परंतु त्या पलिकडे वास्तवाला योग्य पातळीवर आणणे ही वाङ्मयीन कलाकृतीची आवश्यकता असते हे लक्षात घ्यावे लागेल. सामाजिक बांधिलकी आणि सामाजिक परिवर्तनाच्या पुरस्कर्त्यांनी हे लक्षात घ्यावे लागेल की साहित्य हे मुळातच समाजोत्पन्न असल्यामुळे त्या त्या कलाकृतीची स्वतःची काही बांधिलकी असतेच. मानव-जीवनार्थ-अभिमुखता हे जर साहित्याचे वैशिष्टच आपण मानत असू तर पुन्हा वेगळचा बांधिलकीची गरज आता निरर्थक ठरते याचाही विचार करावा लागेल. असो.

कोणताही साहित्यिक जेव्हा लेखन-प्रवृत्त होतो तेव्हा त्याच्या समोर कोणतीही वाचकांची वर्गवारी नसते किंवा अमूक वाचकांसाठी आपणास लिहावयाचे आहे अशी भूमिकाही नसते. मात्र कलाकृतीच्या प्रसिद्धीनंतर तिची जडण-घडण, वाचकांचा प्रतिसाद, तिचे बहु-आयामीत्व तिच्या



भाषेची अर्थवत्ता, तिच्यातील आशयाचे स्वरूप ह्या आणि अशा अनेक घटकांवर त्या साहित्यकृतीचे स्थान निश्चित होत असते. याच कारणांनी साहित्यात वाचक आणि लेखकांची वर्तुळे कल्पिणे शक्य होते. म्हणूनच साहित्याच्या विस्तारीत वर्तुळात आंतर्वर्तुळातील साहित्याचे आणि अशा साहित्याच्या वाचकांचेही अस्तित्व अटळ ठरते. एकंदरीत वाङ्मयीन प्रगतीसाठी. उच्च अभिरुचीच्या तृप्तीसाठी, आनंदनिर्मितीसाठी, प्रतिभेचे नर्तन दर्शविण्यासाठी असे आंतरवर्तुळातील साहित्य महत्त्वपूर्ण ठरते. कारण साहित्याचे विभ्रम आणि नवोन्मेष हे या आंतरवर्तुळातील साहित्यामुळेच पहायला मिळत असतात आणि साहित्यातील प्रवाहांना गतिशीलता लाभत असते. साहित्य समृद्धतेकडे वाटचाल करीत असते. ■

ग्रेसच्या कवितेतील दुर्बोधता : एक विवेचन

सौ. मृदुला करंदीकर

ग्रेसची कविता ही दुर्बोधतेच्या पातळीवर कां उतरते ? हा सर्वत्र चर्चिल्या गेलेला प्रश्न आहे, परंतु या कवितेशी संवाद साधण्यासाठी लागणारा वेळ आपण देत नाही म्हणून ही आणखीच गूढ वाटते असे थोडा विचार केल्यास आढळून येईल वारंवार वाचनाने तिचे एक एक दालन उघडत जाते आणि मग तिची ओळख अंतर्बाह्य पटते.

आत्मा हा शब्दच मुळात वादग्रस्त. म्हणून आत्म्याशी संवाद साधणाऱ्या सगळ्याच गोष्टी कठीण, जसे-तो आहे; नाही, अमर आहे, दिसतो, दिसत नाही. आत्म्याला दुःख होते, होत नाही. असा हा दुर्बोध आत्मा. ह्या आत्म्याशीच या कवितेचे जवळचे नाते आहे. अनेक कवितात ओळी ओळीतून आत्म्याचा उल्लेख कवी ग्रेस करतात. या आत्म्याच्या उल्लेखात नेमके त्यांना काय साधायचे आहे हे शोधण्यासाठी ही कविता वारंवार वाचावी लागते. शरीर हे नष्ट होणारे आहे परंतु आत्मा हा नष्ट होत नाही असा त्यांचा विश्वास ! प्रेम, भय, राग आदि भावना व तना-मनाचे निर्माण होणारे प्रश्न हे ज्या आत्म्यातून निर्माण होतात त्याची ओळख पटावी म्हणजेच आपल्या मनाला नव्हे तर आत्म्याला कोणत्या गोष्टीचा मोह आहे ह्याची ओळख पटण्याचा सतत हव्यास असावा व ही ओळख पटताच ही ओळख आपल्या जन्माआधी निघून गेलेल्या अनेक थोर लोकांच्या कुळात कुठेतरी आहे काय ? किंवा आपल्या सोबत असणाऱ्या, वावरणाऱ्या माणसात आहे काय याचा शोध घ्यावा व ही ओळख चटकन न पटणारी असल्याने त्यासाठी ईश्वराची करुणा भाकणे. प्राण कंठाशी आणून त्याला विनवणे. ईश्वराची कृपा, आपला कमीपणा, देहधर्माचे छंद, मनाचा वेडेपणा, परिस्थितीची प्रतिकूलता व न सोडविल्या गेलेले आपले प्रश्न यातूनच ह्या कवितांचा जन्म होतो.

सागर तंद्रीतून नसावे कुठे चुळाभर पाणी
तुझ्या कृपेच्या दुःखामागे, येईन मी अनवाणी

परमेश्वराची कृपा ही गोष्ट या जगात तुमच्या आमच्या हातात नसलेली जादूची कांडी आहे. या कृपेमागे हा कवी अनवाणी जायला तयार आहे. ईश्वराची कृपा व्हावी म्हणून उदासपणे प्रार्थना करीत एखाद्या फकीराने वसून रहावे असा ह्या कवितेचा मूळ स्वभाव आहे. म्हणून कितीही

आवेगाने हृदयाचा ठाव ही घेत असली तरी ती उच्छृंखल होत नाही. ती गंभीर होते व पोक्त सुजाण स्त्रीप्रमाणे अबोल होते म्हणूनच ती चटकन मोहवू शकत नाही. सहवासाने तिचे माधुर्य सर्वांगाला जागे करते.

मृत्यू हा सर्वांनाच येणार. त्याला टाळता येत नाही हे सत्य ! पण ते स्वीकारण्याचा कणखर-पणा नाही तर मग ईश्वराजवळ विनवणी करीत बसणे हाही एक मार्ग या कवितेचा आहे.

प्रेम, शरीराचे व मनाचे ह्या दोन्हीही गोष्टी डोळसपणाने म्हणजेच आंधळेपणा न ठेवता ही कविता कबूल करते. शरीराचे हव्यास, हट्ट, गरज ही कविता कबूल करते, परंतु देहापलिकडचे प्रेमही हिला मान्य आहे उलट त्याचाच हट्ट अधिक आहे. 'राखण' या कवितेत हा कवी 'जीव राखता राखता तुला हाताशी घेईन' म्हणजे सरळच मृत्यू जवळ आला असतानाही तुला जवळ घेईन म्हणतो. हे लक्षात येताच पुढे कविता सरळ सरळ उकलतच जाते. शेवटपर्यंत असे प्रेम करीत राहता राहता देखील मोठेपणा घेऊन या प्रेयसीच्या पुढे जाण्याची त्याची तयारी नाही. शेवटच्या कडव्यात 'नाही दुःखाचा आडोसा, नको सुखाची चाहूल, झाड वाढता वाढता, त्याने होऊ नये फूल' तर ज्या फुलावर प्रेम करायचे ते फूलच आपण व्हायचे नाही. तर मी माझ्या जागेवरूनच तुझा मोठेपणा जपेन ही त्याची तयारी आहे.

गांभीर्य हा या कवितेचा जणु गाभाच आहे. कारण जीवनातली दुःखे पचवीत जाण्याची ह्या कवितेची सवय. त्यामुळे ही गंभीरता आली आहे. माणसाचा स्वभाव भोळा, भावडा वा कितीही साधा असला तरीही दुःख आपला पाठलाग सोडत नाही. जीवनात येणाऱ्या दुःखाचे उत्तर देणारे कोण आहे ? आपले भोग भोगण्यासाठी कोण तयार आहे ? कोणीही नाही. म्हणून हा कवी उदास होतो व

'नाहीच कुणी रे अपुले प्राणावर नभ धरणारे
दिक्काल धुक्याच्या काठी हृदयाला स्पंदविणारे

ह्या ओळी खरोखरच कासावीस करतात व प्रत्येकाच्या आयुष्यात अशी वेळ येतेही व अशा प्रश्नांनी माणूस व्याकूळ होतोही.

जीवनातले न सुटणारे कोडे म्हणजे आपल्या वाटयाला आलेले भोग ! ते कोणते तर वैधव्य, निपुत्रिकता अशा प्रकारचे प्रश्न या कवितेचे आहे, वैधव्याला सामोरे जाणे हे न पेलवणारे आहे. तशात तरुण वयात वैधव्य आले तर उरलेले जीवन कंठताना कुणाचा मोह झाला तर त्याला उत्तर देण्याचा धीटपणा नाही व प्रेमावाचून राहणेही शक्य नाही. अशावेळी आपल्या प्रेमाची रडत रडत कबूली देणे परंतु अटळ असलेल्या प्राप्त परिस्थितीची जाणीव प्रियकराला देणे हे त्या विधवेचे मनोगत 'कहाणी' कवितेत आले आहे. 'वारा' हा शब्द अनेक ठिकाणी प्रियकर या अर्थाने आला आहे. झऱ्यावरून पाणी नेणारी ही विधवा प्रेयसी पाहून प्रियकराने तिला छेडताच तिने व्यक्त केलेली दुर्बल भावना ह्या कवितेत आहे व शेवटी ती इतकी करुण होते की नाती गळून पडतात व प्राक्तनाचे भोग घेऊन उभी असलेली करुण दूर्बल स्त्रीच हा कवी उभी करतो.

नको उडवू रे वाऱ्या रानझऱ्याची कहाणी
थोडे भरून घेऊ दे माझ्या घागरीत पाणी
रांडीमुंडी मी अवस माझा मलाच शहारा
बोंब माराया वेशीला माझ्या नावाचा पुकारा
राघु उडाला आंभ्यात माझी पिंजऱ्यात मैना
डाळ भिजवायासाठी थोडे पाणी घेऊ दे ना

अर्थातच राघु म्हणजे तिचा पती उडाला म्हणजेच मेला व घरात लहान मुलगी आहे तिच्या

उदरपोषणाची जबाबदारी अंगावर पडली आहे. किती अटळ आहे हे सर्व आणि शरीराचे निर्माण होणारे प्रश्न हेच प्राक्तनाचे भोग !

शरीराला सोलून आत्म्यापर्यंत जाणे, (देहावरची त्वचा आंधळी, छिलून घ्यावी कोणी) मेंदूला जागे करणे (सुनसान मंदिराची मेंदूत एक घंटा) या ओळी किंवा, 'बुबुळामधला उलतो पारा' 'झीमझीमले अंगागाला रक्ताच्या मागुन कोणी', या सर्व ओळीतून आपल्या आत्म्याला कशाचे वेड आहे किंवा ज्या सीमारेषांवर आम्ही आपल्या भावना पडताळून पाहतो त्याचे पलिकडे जाऊन स्वतःची परिक्षा घेणे हे या कवितेचे अंग आहे असे दिसून येते त्यामुळे रक्त, मांस, मेंदू, आत्मा, हात, डोळे या सर्व अवयवांचे पलिकडे जाण्याचे स्वप्न ही कविता पाहते. त्यामुळे ती अधिक कठीण होते यातील एकेक कविता म्हणजे एकेका भावनेची साक्ष देणारी तरल संवेदनाच आहे. हळूहळू ती माणसाचे मनापर्यंत पोहचते परंतु तिची पूर्णपणे ओळख पटणारा परिपक्व माणूस जन्माला येत नाही तोपर्यंत सर्व परीक्षा देत जाणे हेच तिचे सध्याचे अटळ प्राक्तन आहे. ■

'युगवाणी' मिळत नाही ?

युगवाणीचा अंक पोस्टाने पाठविल्यानंतर तो मिळत नसल्याच्या अनेक तक्रारी येतात. तसेच अपुऱ्या पत्त्यामुळे / पत्ता बदलल्यामुळेही अंक परत येत असतात. परिणामी बराच डाकव्यय वाया जाऊन संस्थेला भुर्दंड सोसावा लागतो. सर्व सभासदांना / वर्गणीदारांना युगवाणीचा अंक नियमित पाठविला जात आहे, याची विशेष काळजी आम्ही आमच्याकडून घेत आहोच. आपणाकडून कृपया पुढील सहकार्य मिळावे.

- ज्या महिन्याचा अंक असतो त्याच्या पुढील महिन्याच्या पंधरा तारखेपर्यंत तो आपल्याला मिळावा ही अपेक्षा असते. तरीही अनेकदा पोस्टाच्या दिरंगाईमुळे तो आपल्यापर्यंत पोहोचण्यास बराच वेळ लागतो तेव्हा त्या महिन्याच्या पंधरा तारखेपर्यंत थांबूनही आपल्याला अंक न मिळाल्यास, **प्रथम** आपल्या गावच्या / विभागाच्या पोस्टात चौकशी करा—लेखी तक्रार द्या व तिची एक प्रत पुढील कार्यवाहीसाठी आम्हाला पाठवा.
- अंक शिल्लक असल्यास आपल्याला तो आवर्जून पाठविण्यात येईल.
- आपण आपला पत्ता पूर्ण व अचूक नोंदला आहे काय ? पत्त्यात झालेला बदल, कार्यालयाला त्वरित कळविण्याची आपण कृपया काळजी घ्यावी, शक्यतोवर घरचाच पत्ता द्यावा, संस्थेचा / कार्यालयाचा देऊ नये.
- आपली वर्गणी संपलेली नाही ना ? आपले नाव नियमित सभासदांच्या / वर्गणीदारांच्या यादीत आहे याची खात्री करून घ्यावी.
- पत्ता बदलल्यामुळे परत आलेला व पुढील अंक सभासद / वर्गणीदारांकडून कार्यालयाला नवीन पत्त्यांची रीतसर सूचना मिळेपर्यंत पुन्हा पाठविले जात नाहीत.

मनोहर म्हैसाळकर
सरचिटणीस
विदर्भ साहित्य संघ

कुणाचे ओझे ?

प्रा. डॉ. विश्वास पाटील

हे सारे एकट्या प्रेमलाला ठाऊक होते. माझ्या माहितीप्रमाणे आणखी कुणालाही हे माहित नव्हते कसे माहित असणार ? प्रेमलानेच तर मला सांगितले. म्हणजे या घटनेची माहिती आम्हा दोघांनाच. मी आणि प्रेमला-आम्हीच या घटनेचे साक्षीदार. नव्हे ती साक्षीदार मी केवळ माहितगार. पण आता कुठं ध्यानी येतंय की हे अनेकांना ठाऊक झालं आहे. हे आता काही लपून राहणार नाही. अशा गोष्टी लपून राहतही नाहीत म्हणा! हे आता 'ओपन सिक्रेट' झालं आहे. म्हणजे आम्हा दोघांसोबत हे आणखी कुणालातरी कळले असले पाहिजे.

बरे, कळू नये असे त्यात काही नाहीए ! जगात अनेक गोष्टी घडत असतात. जशा भल्या तशा बुऱ्या, काही कळतात, काही कळत नाहीत. म्हणजे कळू दिल्या जात नाहीत. कळू नये अशी व्यवस्था केली जाते. काळाचा पडदा अभेद्य असतो. तो लोहपडदा ठरतो. त्याच्या आड काही झाकले जाते. पण सारेच झाकले जाते असे नाही. म्हणूनच तर अशा घटना जगजाहीर होतात आणि सुचित्रा अडचणीत सापडते.

आता, खरे म्हणजे सारे काही आरंभापासूनच सांगायला हवे, सांगायला काही हरकत नाही. प्रेमलानेच तर सारा गौप्यस्फोट केलाय. सुचित्राचं मत कुणी विचारात घेतलं नाही. तिला मान्य-अमान्य असण्याचा सवाल येतोच कुठे ? बरे, तिची खरी प्रतिक्रिया कळावी कशी ? ज्यांनी कदाचित हे सांगू दिले नसते ते माझे परममित्र श्री. मृत्युंजय चट्टोपाध्याय. पण जाऊ द्या...आणि ते अनाम लेखक ? हुंदका दाटून येतो, काही म्हणता काही सुचत नाही. प्रचंड घुसमट होते.

आम्हा सर्वांनाच मृत्युंजयबद्दल असूया वाटायची. धगधगत्या सुप्त ज्वालामुखीसारखी. हे आता तरी प्रामाणिकपणे कबूल करायला हवे. तसे आम्ही सारे चोवीस होतो. पण आमच्या ग्रुपमध्ये मृत्युंजय ही असामीच. पुणे विद्यापीठात पदव्युत्तर अध्ययन करतांना आम्ही पाच वेगळेच होतो. महादेवम्, कु. नावडीकर, देवरे, मी आणि मृत्युंजय चट्टोपाध्याय.

कथा

मृत्युंजय सर्वात पुढे गेला मुंबई गाठली. मॅनेजिंग डायरेक्टर झाला. बडे पद. मानाची नोकरी. मारुती कार, एअर कंडिशंड बंगला. मुबलक नोकर-चाकर, मोठा लवाजमा. आम्ही तसे सर्वांपासूनच सर्व दूर दूर गेलो. स्मृतिशेष राहिलो. नाही म्हणायला पत्रांमधून भेटत रहायचो.

परवा मुंबईला जाणे झाले, अचानकपणे मृत्युंजय भेटला. गाडी थांबवली. 'गाडीत बैस' असे खुणेनेच सांगितले. मी खांद्यावरची शबनम सावरली, गाडीत बसलो. मृत्युंजय स्वतःच गाडी हाकत होता. माझ्याकडे बघून छान हसला. नेहमीच्या खोडसाळ पद्धतीचे.

मृत्युंजय चट्टोपाध्याय. सुशिक्षित परिवारातला मुलगा. एकुलता एक, वडिल तहसिलदार, काका न्यायाधीश आई हेडमिस्ट्रेस. सारंच वळणदार. आखून-रेखून. मृत्युंजय तर विलक्षण तेजस्वी युवक. कुरळे केस, लांबोळका सावळा चेहरा. डोळ्यांवर बाय-फोकल. त्या चष्म्यातून झिरपणारी कमालीची नितळ नजर. ओठांवर मिशी.

एवढ्या मोठ्या पदावर गेला पण मृत्युंजय होता तसाच होता. मिस्कील. खोडसाळ, वात्रट, अंतर्यामी नांदणारी एक बेफिकीर वृत्ती. आम्हा सर्वांना त्याचा हेवा वाटायचा. तो मॅनेजिंग डायरेक्टर बनला. याचा आम्हाला आनंद होता. त्याने असिस्टंट कमिश्नरची पोरगी गटकवली हा खरा विषादाचा विषय होता.

गाडी धावत होती. मी त्याला वहिनींबद्दल विचारलं. अतिशय बेफिकीरपणे तो बोलला-'शी लेफ्ट मी !'

मला वाटले की हा आपला नेहमीसारखाच गंमत करतोय, मी म्हटले, 'तू आधी घरी तर

चल. वहिनींच्या समोर तुझ्या घरातच तुला अहेर देतो.'

तो शांतपणे म्हणाला, 'बिलिव्ह मी ! अरे, खरे तेच सांगतोय.'

मी काहीही बोललो नाही. पळती दृश्ये बघत राहिलो. त्या मौन घटिका असह्य होत्या.

'आता कुठे चाललोत आपण ? घरी ना ?'

या माझ्या प्रश्नावर अत्यंत क्रूरपणे हसत तो म्हणाला, 'हॉटेल. बाबू, मला आता घर कुठं उरलंय ?'

त्या हसण्यातल्या कुटिलतेने मला आरपार छेद दिला. घायाळ झालो मी. त्या हसण्यात वैफल्य, व्यंग, कटुता आणि पराभवाचे अनेक रंग उसळत होते. मी पुन्हा धीर करून बोललो– 'हे बघ, तू शहाण्यासारखं काही बोलणार आहेस की नाही ?'

हे एकून मात्र त्याचे हसू थांबले. पण त्याच्या डोळ्यात ओल काही जाणवली नाही. कासाविशी नाही. गहिवर नाही त्रास नाही. तक्रार नाही.

गाडी थांबली. आम्ही खरोखरच एका भव्य हॉटेलच्या अंगणात उभे होतो.

'चलो, बंधु ! हे आमचं घर.'

मी हताशपणे हॉटेलच्या संगमरवरी पायऱ्या चढत राहिलो. एका अज्ञात गुहेत शिरताना वाटावी अशी अकल्पनीय भीती माझ्या मनात साकळत चालली होती. उजेडाच्या भगभगीत प्रकाशझोतात न्हाऊन निघालेलं ते हॉटेल मला एखाद्या अंधाऱ्या ग्रहाप्रमाणे परकं, अपरिचित आणि भयावह वाटत होतं.

जणू काही घडलंच नाही अशा थाटात त्याने सर्वांची माहिती विचारली. आस्थेने. प्रेमाने. कळवळ्याने. आपल्या उत्तुंग प्रगतीचा आलेख सांगितला. गेल्या महिन्यातच तो अमेरिकेहून परतला होता. तिथल्या 'जॉन एंड वर्टन' कंपनीचे त्याला निमंत्रण होते. तिथल्या नाना गमती आपल्या खास शैलीनं तो मला ऐकवत राहिला. त्या माणसांचे गुण-दोष, त्यांच्या स्वभावच्छटा अगदी बारीक-सारीक तपशिलासह त्याने सांगितल्या. त्या लोकांचा फेसाळता उत्साह. उन्मुक्त कामजीवन. नोकरीतील वेटर चान्सेस. सारं-सारं त्याने इत्थंभूत सांगितले. मी दंग होऊन ऐकत राहिलो. या देशाचाच त्याला एकूण वीट आला होता, 'टॅलेंटची कदर अमेरिकेतच' आपले प्रिय पालुपद तो ऐकवत होता. न थकता मी माझ्यापरीने स्वदेश-महात्म्य त्याला पटवून देत राहिलो.

आता आम्ही हॉटेलच्या पायऱ्या उतरत होतो. 'कुठे सोडू तुला ?' त्याने कमालीच्या थंडपणे मला विचारले.

'मी जाईन बापडा. तू नकोस काळजी करू माझी !'

मी गहिवरलोय हे त्याच्या चाणाक्ष नजरेतून सुटणे शक्यच नव्हते. त्याने अभिवादन केले.

मला दुसरी वाट कुठे होती ? मी टॅक्सी थांबवली, माझ्या मुक्कामावर येऊन थांबलो. मला मृत्युंजय पहिल्यांदा भेटला होता मुंबईत. अजून सारं आठवतंय. कोण उल्लास त्याच्या स्वागतात होता. आता इकडे यायच्या पंधरवड्यापूर्वीच तर त्याचं पत्र होतं.

"...तझ्या कथेला प्रथम पारितोषिक लाभल्याबद्दल मनःपूर्वक अभिनंदन ! आम्हा उभयतांतर्फे.

कालच तुझी कथा बाचली, सुचित्राला तर ती फारच आवडली. मला तर आवडलीच...

तुझेच,

मृत्युंजय चट्टोपाध्याय,

सौ. सुचित्रा चट्टोपाध्याय"

पत्राखाली दोघांच्या सह्या होत्या. या पत्रामुळे तर सुचित्रा वहिनींना भेटण्याची उत्सुकता अधिकच वाढली होती. मी पत्ता शोधत घरी पोचलो होतो. ती संध्याकाळ अविस्मरणीय ठरली. खास बंगाली स्वागत झाले. संदेश, गुलाबजाम आणि काय-काय ?

मृत्युंजयच्या प्रशस्त दिवाणखान्यात आम्ही तिघं होतो. भरपूर उंचीच्या सुचित्रावहिनी-केस कुरळे. मोकळे, लांबसडक. घनदाट. अत्यंत आकर्षक वाटोळा चेहरा. चेहऱ्यावरचं धारदार नाक. पुष्ट भुवया, मोठे टपोरे डोळे, मधाळ दृष्टी, कपाळावर ठसठशीत कुंकू. बदामी रंगाची सिल्कची साडी, स्लिव्हलेस ब्लाऊज वाणीत आर्जव अन् माधुर्य. त्या बोलायला लागल्या म्हणजे छोटया-छोटया घंटा किणकिणताहेत असे वाटायचे. हॉलमध्ये चंदनी अत्तराचा मंद सुगंध. छताला

टांगलेलं आरस्पानी झुंबर. कलात्मक वॉलहँगिंग्ज्. एकूणच थाटमाट.

खूप आनंद वाटला होता. सुचित्रा वहिनींची साहित्यविषयक जाण खोल, नेटकी आणि समृद्ध वाटली होती. त्या बैठकीत किती गप्पा झाल्या होत्या. आणि त्याचं ते मुक्त खळाळतं हास्य कसं विसरू शकेन? पर्वत-प्रदेशातल्या कलंदर झऱ्यासारखं ते खळाळणं होतं. आमच्या गप्पांमध्ये मृत्युंजय तटस्थ होता. नाही म्हणायला इन्कम-टॅक्सची कागदपत्रं चाळत होता. अधून-मधून येणारे फोन्स घेत होता. आपल्याही पुढयात कॉफी आहे याचे भान होताच कॉफीचे घुटकेही घेणे त्याचे सुरू होते.

...ती संध्याकाळ आठवते. आज तो स्वप्नसंदर्भ वाटतो. आणि आजची ही संध्याकाळ. अशुभ. करंटी. अपशकूनी. मळभभरली, काहीही कळत नव्हतं. काही विचारायची सोय नव्हती. बरं विचारावं तरी कुणाला? हा प्रश्नही होताच ना?

सुचित्रा वहिनी असिस्टंट कमिशनरच्या, सुकन्या. अत्यंत मनस्वी. कमालीच्या बुद्धिमान. अनेक विषयांवर त्यांची स्वतंत्र मते होती. नाना प्रश्नांवरचे त्यांचे वैविध्यपूर्ण वाचन केवळ थक्क करून सोडील असेच होते. रूसोच्या 'कन्फेशन' पासून ते थेट रामकृष्णवचनामृतापर्यंत त्यांच्या वाचनाची रेंज होती. अतिशय सूपर सेन्स होता त्यांना! पण त्यांच्याशी संवाद करण्याची सवड मृत्युंजयला नव्हती, एवढ्या प्रशस्त बंगल्यात त्या एकट्याच. सोबत अशी नाहीच. सर्वत्र व्याप्त वांझपणा. रितेपणा.

...आणि आज वाटतं. सुचित्रा वहिनींनी असे काय साहस आरंभिले आहे? कुठल्या अज्ञात विश्वाच्या निरर्थक प्रवासाला त्या निघून गेल्यात? मृत्युंजयशी बोलणे काय शक्य आहे? मनाला प्रश्नांचे दंश होत राहिलेत. काहीही विचार करण्याच्या पलिकडची अवस्था झाली. केव्हा यातून सुटता येईल अशी काकूळती जीवाला लागून राहिली. प्रश्नाचा गुंता न उलगडणाऱ्या पायवाटेप्रमाणे थकवून टाकत राहिलाय.

त्या सोडून गेल्यात म्हणजे नेमकं काय?

कुठे गेल्या असतील सुचित्रावहिनी?

त्यांनी नवा जोडीदार निवडला असेल?

आत्महत्या केली असेल का त्यांनी?

मला हे कळणे शक्य नव्हते. कळते ही कसे म्हणा? एकच एक आधार होता मृत्युंजयचा. पण तो तर काही केल्या बोलायलाच तयार नव्हता.

काळाचा अश्व दौडत राहिला. मला प्रेमला भेटली. एका प्रशस्त हॉटेलात. प्रेमला बॅनर्जी. दुःखाचा महासागर प्रेमला. प्रताडिता. वंचिता. ठोकरली गेलेली प्रेमला. जीविताचे आणि प्रीतीचे साफल्य तिला लाभले नाही. चिर उपेक्षिता प्रेमला. तिने लग्न केले. स्वतःचा संसार थाटला. पण तो विस्कटला. इतरांच्या संसारात तिने अधिक लक्ष घातले. अधिक वेळ दिला. असे व्हायला नको होते. पण झाले असेच. तिचे पती निवर्तले होते. मिलिट्रीत होते ते. त्यांना युद्धभूमीवरच वीरगती प्राप्त झाली. त्यानंतर प्रेमलाने पुनश्च विवाह केला. खरे म्हणजे विवाह केलाच नाही. विवाहित स्त्रीने रहावे तशी ती एका पुरुषासोबत राहिली. सवंगडयाला ते मानवलं नाही. तो होता भुकेला. अशी माणसं थांबत नसतात. वाट बघत नसतात. भूक हरतऱ्हेने भागवित असतात. अखेर व्हायचे तेच झाले. त्याची भूक भागली व्यवहार संपला. प्रेम असे नव्हतेच जोडीदार उडून गेला. प्रेमला एकटी राहिली. संसार गमावून बसली. मग तिने मॉडेलिंगचा व्यवसाय आरंभिला. पण जम बसला नाही. सिनेमातही वर्णी लावण्याच्या दिशेने कमी प्रयत्न नाही केलेत. पण सारे काही फोल ठरले.

'सुचित्राने मृत्युंजय चट्टोपाध्यांचा आसरा सोडल्याचे आपणास माहित असेलच!'

मी डाव हारल्याप्रमाणे होकारार्थी मान हलवली. माझ्या पुढयातल्या खुर्चीवर ती बसली होती. हिरव्या वस्त्रप्रावर्णातील प्रेमला. हिरव्या रंगाचा जणू सर्वांगसुंदर आविष्कार, रसरशीत हिरव्या वृक्षासारखी पुष्ट प्रेमला.

'हे कृपा करून कुणाला सांगू नकोस!'

असं मला बजावून माझ्या होकारा-नकाराची चिंता न करताच तिने सांगायला सुरुवात देखील केली.

"सुचित्रा अतिशय बुद्धिमान युवती होती. मृत्युंजयही होता म्हणा ! सुचित्रा मृत्युंजयला सर्वस्व मानत होती आणि मृत्युंजय पैशाला सर्वस्व मानत होता. घराच त्याचे लक्ष होतेच कुठे ? घरची कुठलीही जबाबदारी त्याने स्वीकारली नाही. घरात तसे म्हटले तर दोघांचे बेडरूम एकच होते. पण दोन पलंग म्हणजे दोन द्विपं. पृथ्वी आणि चंद्राएवढं अंतर, ना संवाद ना विवाद. गप्पा नावाचा टॉपिक कधी नाहीच. फार झाले तर ते शॉपिंगला जात, नाईट शो. उची हॉटेल्स-मधून महागडं जेवणं. शरीर जिथं जुळली नाही तिथं मनांची बातच कशाला ? बरे, सुचित्रा कमालीची मनस्वी मुलगी. ठरवील ते करील. करील ती पूर्व. हट्टी बापाची हट्टी मुलगी."


"अखेर अशाप्रसंगी व्हायचं तेच झालं. एका संध्याकाळी मृत्युंजय परतला. दारावर त्याच्या स्वागतार्थ कुणीही नव्हतं. घरातली मोलकरीण धावत गेली. मृत्युंजयला सुचित्रा घरात नसल्याचं कळलं. तो बेचैन झाला. शोध सुरू झाला. पोलिसात कशी खबर देणार ? अब्रू आड आली. पेपरातून काय छापावं ? प्रतिष्ठा आड येत राहिली. मित्र-परिजन विचारत सुचित्राबद्दल. त्याचे उत्तर ठरलेले होते. –'शी लेफ्ट मी !' बस, याचा तुम्ही काहीही अर्थ लावा. यावर आणखी काही विचारायची कुणाची हिंमत नव्हती."

बोलताना ती थांबली. घामेजून गेली होती. चेहऱ्यावर घाम साकळला होता. आपल्या पर्स-मधून रुमाल काढून तिने घाम टिपला. चेहरा पुसला. 'आपली हरकत नसेल तर परवानगी असावी.' असे म्हणत तिने बर्फ मागवला. कोका-कोल्याची ऑर्डर दिली. तिने इशारा केला आणि अठरा औंसांची ब्रँडीची मोठी बाटली आमच्या पुढयात घेऊन ठाकली. मी आळीपाळीने त्या बाटलीकडे आणि प्रेमलाकडे बघत राहिलो. ती म्हणत होती.

"आपल्याला ड्रिंक चालत नाही. हे मला ठाऊक आहे. सुचित्रानं सारं सांगितलंय मला. म्हणूनच तर कोकाकोला मागवलाय अरे हो, तर ! सुचित्रा मृत्युंजयला सोडून गेली. आणि मग मृत्युंजय हसेना ! बोलेना !! कुणात मिसळत नव्हता. संध्याकाळी ऑफिस सुटलं की घरी परत. क्लबमधून जाणं थांबलं. पार्टी नाही. बैठकी नाहीत. रमी नाही. शॉपिंग नाही. मोलकरणीने जे जसे दिले ते तसे गिळावे. काम करावं. कामं करावीत. कामात बुडून जावं. नव्या योजना आखाव्यात."

"पुष्कळ महिलांनी त्यांना घेरलं. पण आता कुठे मृत्युंजयने सुचित्राची लायब्ररी वाचायला सुरुवात केली होती. मीही त्यांना म्हटले होते मी देखील स्त्री आहे. तुमच्या उपयोगी पडू शकेन. तुम्ही काय परवड मांडली आहे स्वतःची ? पण ते ऐकायला तयार नव्हते. तसा माझा त्यांच्यावर हक्क होता माझी धाकटी वहिणच ना सुचित्रा. आम्ही सख्ख्या बहिणी."

असे म्हणत तिने फोटोंचा एक अल्बम पर्समधून काढून माझ्या हाती दिला. त्यातले काही फोटो बघणे शक्यच नव्हते. पण एका फोटोत ती सुचित्रा भाभीसोबत उभी होती. काही बाळपणीचे फोटो होते. आणि मुख्य म्हणजे आमच्या साहित्यिक गप्पांची ती संध्याकाळही त्या अल्बममध्ये होती. आणखी एक फोटो होता. तोच फोटो. त्या फोटो-मुळेच तर ही कथा आकाराला आली. तो फोटो मी बघितला नसता तर ? बालिकेचा, निरागस, अश्राप.



"... अखेर मन घट्ट करून मला ते कटु सत्य मृत्युंजयना सांगावे लागले. त्यांनी माझे आभार मानले. तश्शा रात्रीच गाडी काढली. माझा निरोप न घेता, मला निरोप न देताच. मी दिलेल्या पत्त्यावर जाऊन पोचले. त्यांचा विश्वास बसत नव्हता. पाच वर्षांचा कालावधी लोटला होता ना ! हॉटेल पर्लमध्ये ते जाऊन उभे राहिले. मला ते हॉटेल माहित होते तिथे काही बर्मी मुली होत्या. काही चीनी, तिबेटच्याही काही, दार्जीलिंगच्या पहाडपट्टीतल्या. क्वचित् एंग्लो–इंडियन्स. तिथेच... क्षमा करा. तिथेच माझी प्रिय बहीण आणि आपल्या आदरणीय भाभीजी होत्या."


मी तियून उठून जाण्याचा प्रयत्न करू लागलो. तिने मला थोपवून धरलं. ती आता नशेच्या पूर्ण आहारी गेली होती. तिच्या हसण्यामुळे सारे हॉटेल घुसळले गेले.

"थोडं आणखी थांबा... तर असं झालं. मृत्युंजय हॉटेलात गेले. तिथला वुड्ढा लियाकतअली दात विचकत त्यांच्या पुढ्यात उभा होता. 'क्या मंगता साब ?' असे त्याने विचारले; आणि मृत्युंजयच्या इशाऱ्याने त्याच्या पुढ्यात उभी राहिली सुचित्रा. मृत्युंजयने तिचा हात धरला. शांतपणे हॉटेलच्या पायऱ्या उतरत ते गाडीजवळ आले. त्यांनी तिला गाडीत बसवलं."

पण त्या छोटचा शिशुच्या फोटोचं काय ? या माझ्या बोलण्याकडे दुर्लक्ष करत घसरणारा पदर सतत सारखा करीत ती बोलत राहिली.

"काळ कठिण असतो. पाच महिन्यानंतर सुचित्राने एका बालिकेला जन्म दिला. ४ डिसेंबरच्या रात्री नऊ वाजता. ५ डिसेंबरच्या सकाळी मृत्युंजय झोपेतून उठू शकले नाहीत. आता मृत्युंजय चट्टोपाध्याय नाहीत. 'ही लेफ्ट हर !' आणि आज सुचित्राही नाही. आहे ती तिची मुलगी. अल्बममधल्या फोटोतली. माझ्या घरी आहे ती. आणि आता तिच्या दूध पिण्याची वेळ झाली आहे आपला खूप वेळ घेतला. उठू या का आता ? आभार मानते !" ■

प्राध्यापक, हिंदी विभाग
शहादा महाविद्यालय
शहादा (धुलिया)



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

नवलेखक अनुदान योजना

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या वतीने नवलेखकांना उत्तेजन मिळावे म्हणून त्यांच्या प्रथम व द्वितीय पुस्तकाच्या प्रकाशनार्थ अनुदान देण्याच्या नवलेखक अनुदान योजनेखाली नवलेखक / कवींकडून साहित्य मागविण्यात येत आहे. नवलेखक / कवी या संज्ञेत ज्याचे एकही पुस्तक प्रकाशित झालेले नाही किंवा ज्याचे पहिले पुस्तक मंडळाच्या या योजनेतील अनुदानाने प्रकाशित झाले आहे अशाच नवलेखक / कवींचा समावेश करण्यात येतो. या योजनेत नवलेखक/कवींनी त्यांची पुस्तके स्वत: पाठविताना किंवा नवलेखक/कवींची पुस्तके प्रकाशकांनी पाठविताना पुढील गोष्टी कृपया लक्षात घ्याव्यात--

(१) या योजनेखाली वर उल्लेखिलेल्या नवलेखक / कवींच्या प्रथम व द्वितीय पुस्तकांच्या प्रकाशनार्थ अनुदान देण्यात येते.

(२) काव्य, नाटक, एकांकिका संग्रह, कादंबरी, लघुकथा, ललित गद्य, बाल-कुमारसाहित्य या कोणत्याही प्रकारातील वाङमय असावे आणि ते १ ऑक्टोबरपर्यंत मंडळाकडे पाठवावे. त्यानंतर पाठवलेले हस्तलिखित पुढील वर्षात विचारात घेतले जाईल. वैचारिक स्वरूपाचे हस्तलिखित विचारात घेतले जाणार नाही.

(३) लेखक / कवीने मंडळाकडे हस्तलिखित पाठवताना त्यात आपले नाव, पत्ता किंवा अन्य तऱ्हेने त्यांची ओळख पटेल असा मजकूर लिहू नये. तज्ज्ञपरीक्षकाकडे हस्तलिखित अभिप्रायासाठी पाठवताना लेखकाचे नाव, पत्ता वगैरेबद्दल मंडळ गोपनीयता राखते. मात्र मंडळास हस्तलिखित सादर करताना लेखक / कवीने आपले नाव, पत्ता, हस्त-लिखिताचे शीर्षक, वाङमय प्रकार यावद्दलचा तपशील एका वेगळ्या कागदावर लिहून तो हस्तलिखितासोबत पाठवावा. लेखक /कवीचे एक पुस्तक मंडळाच्या अनुदानातून आधी प्रकाशित झाले असल्यास त्याचा तपशील कळवावा.

(४) पुस्तकाची मुद्रणप्रत हस्तलिखित स्वरूपात असल्यास ती पानाच्या एकाच बाजूस व सुवाच्य अक्षरात लिहिलेली असावी. मुद्रणप्रत टंकलिखित, चक्रमुद्रित किंवा झेरॉक्स केलेली असल्यास, पानाच्या एकाच बाजूस व स्पष्ट असावी. तसेच कात्रणे असल्यास, ती कागदावर एकाच बाजूस क्रमाने व्यवस्थित चिकटविलेली असावीत. हस्तलिखित अशुद्ध असल्यास व त्यातील मजकूर वाचता येण्याजोगा नसल्यास हस्तलिखिताचा विचार केला जाणार नाही.

(५) मुद्रणप्रत मंडळास मिळाल्यानंतर त्याची पोच दिली जाईल व त्यानंतर योग्यवेळी अनुदानाबद्दल निर्णय कळविला जाईल. मंडळाकडे आलेली हस्तलिखिते तज्ज्ञ-परीक्षकांकडे पाठवली जातात. त्यांचा अभिप्राय अनुकूल असला तरच हस्तलिखितास अनुदान देण्याबाबत मंडळ निर्णय घेते. त्याबाबत निर्णय कळवला जाईपर्यंत निष्कारण पत्रव्यवहार करू नये. हस्तलिखिताबद्दलचा निर्णय एप्रिल अखेरपर्यंत कळवला जाईल.

(६) अनुदानास पात्र ठरलेल्या साहित्यात तज्ज्ञांच्या अभिप्रायानुसार काही फेरफार आवश्यक वाटल्यास ते करून, स्वच्छ मुद्रणप्रत तयार करून देण्याची जबाबदारी लेखकाची राहील. ही सुधारित प्रत मंडळाच्या हाती आल्यानंतरच अनुदानासंबंधीचा अंतिम निर्णय घेण्यात येईल.

(७) अनुदानास पात्र न ठरलेली मुद्रणप्रत लेखक/कवीस परत हवी असल्यास तीन महिन्याच्या मुदतीत मंडळाच्या कार्यालयातून न्यावी लागेल. लेखक/कवींना मुद्रणप्रत रजिस्टर पोस्टाने हवी असल्यास आवश्यक त्या रकमेची पोस्टाची तिकिटे आधीच पाठवावी लागतील

(८) स्वीकृत साहित्याच्या संपादनाचे व पहिल्या आवृत्तीच्या प्रकाशनाचे सर्व अधिकार मंडळाकडे राहतील.

(९) मुद्रणप्रत दोन प्रतीत असावी व तिची एक प्रत खालील पत्त्यावर पाठवावी व दुसरी प्रत नवलेखक/कवीने स्वतःकडे ठेवावी. मुद्रणप्रत गहाळ झाल्यास त्याची जबाबदारी मंडळावर राहणार नाही.

अनुदानासाठी अर्जाचा नमुना व माहितीपत्रक मागविण्याचा व हस्तलिखित पाठविण्याचा पत्ता खालीलप्रमाणे--

सचिव,

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,

एल्सा हटमेंट "डी" ब्लॉक, आझाद मैदान,

महापालिका मार्ग, मुंबई – ४०० ००१

मनात उठती तरंग...

मनात उठती तरंग
तरीही न उमटे बिंब

मी शोधतोय्
सुखी माणसाचा सदरा घालून
हळव्या, अस्वस्थ मनाची दुखरी नस.
दिवस असा सरतो
जसे शिशिरात झाड मुंडे व्हावे
रात्र अशी फुलते
जसे आभाळ चांदण्यांनी प्यावे.

लालस शुभ्र सकाळ.
कुठे हवीशी हिरवी सळसळ
कुठे उजेडास भ्यालेले चेहरे.
घड्याळाच्या काट्यांचे पाय लावून सारी गर्दी
पळापळ जिकडे तिकडे
जिकडे तिकडे पळापळ.
विटलेल्या मनांवरती
बेतलेले फसवे रंग
मनात उठती तरंग
तरीही न उमटे बिंब

मानेवरती प्रत्येकाच्या
सूर्याचे ओझे असते
एक सावली झाडाखाली
पचकन थुंकत छद्मी हसते
विखुरलेल्या संध्याकाळी
आभाळाचा जातो तोल
घराघरात मचूळ प्रकाश, नात्यांची दरी खोल

रात्र येते अंगावरती
मी हरवतो प्रणयामध्ये
पुरते मजला 'मीपण' माझे
तिला सुखाचा स्वर्ग गवसतो
गळून पडतो थकवा सारा
फुलते श्वासांमधुनी गाणे
अनाम साऱ्या क्षणाक्षणांचा सरतो भोग
निपचित पडतो मिटून कमळे
असते जागे मनात अमुच्या
तलावातले स्निग्ध चांदणे

... दुसऱ्या दिवशी धूसर होते सारे जगणे.
जिकडे तिकडे व्यर्थ पळापळ.
सारी अनोळख.
चरकातील या दृश्य बघून
अदृष्टाचे फुटते भिंग
मनात उठती तरंग
तरीही न उमटे बिंब !

□

खळाळ जीवन आरस्पानी

रखरखत्या पात्रातील वाळू
चमकचमकुनि मनास छळते
थरकबिथरल्या नजरेला मग
ललाटव्यापी लाटही कळते

पैलपालवी हिरमुसलेली
फुंडावत तिज भणाण वारा
झनकझोंबऱ्या पहाटपारी
चंद्रमुखाची अमृतधारा

मोहरतो भवताल मनोहर
मनामनातील मंजुगीतांनी
शुष्क अनामिक वाळू विरते
खळाळ जीवन आरस्पानी !

□

कसे फेडू धनवंता

अनोळखी होई सांज
एकांताची पडे भूल
अंधारता आसमंत
क्षीण तुझी ये चाहूल

चंद्रकोर शुक्लातली
मनातले गीत गाते
तुला काही सांगायचे
मनातच हरवते

दूरस्थाच्या नजरेने
बघतो मी तुझ्याकडे
तुलाही न कळलेल्या
जगताचे मला कोडे

शब्द शब्द तुझा खरा
जगण्याचा मंत्र बरा
वेदनांच्या ओलाव्याने
फुललेला तू मोगरा

तुझ्यासाठी माझ्यापाशी
लेखणीचे बळ उणे
कसे फेडू धनवंता
तुझे नक्षत्रांचे देणे !

सुनील शिनखेडे

कविता झाकोळवेळेच्या

आला सांजेचा पाहुणा
त्याचे नाव गे अंधार
तुझ्या हातीच्या दिव्याने
त्याचे उजळ अंतर...

□

पुनश्च सारे जळ जांभुळले
जड झाली अन् हृद्‌गाथा
कळस तमाचा चढत चालला
गहन तळी पण मम माथा

हलके हलके उजळत आली
भूताची अद्‌भुता लेणी
सूर लागले संथ जमू पण
विसरुन गेलो मी वाणी...

फुले शहाणी गेली गडदुन
उरि पानांच्या रिति मरणे
प्रकाश अंधारू लागे की
तेजाळुन ये दु:खि जिणे ?

झाकोळुन ये अनंग अंतर
मन अस्मानी होइ मुके
डोळयांच्या पिंडींवर अमृत–
घटातुनी तम अभिषेके !...

□

अशा श्रांत समयाला कोणी
गात चालला विकल विराणी
नीरवतेतिल घनरव त्याचे
जाति जागवत ध्वस्त घराणी...

विझू विझू डोळयांच्या डोही
अवकाशुन ये तमार्त अंबर
उजळे तरि, अंतरी तयाच्या
लक्ष ग्रहांचे सडौल झुंबर !

कुणी म्हणावे जोगी, वेडा...
कुणि शोधावे त्याचे कूळ !
वैराग्याने जळत जगावे
तेजोगर्भी रूजवत मूळ...

असा जोगवा देत तमाला
वेडा झाला स्वत: अभंग
अश्रूंतुन ओघळता मृत्यू
अवघा देहचि होइ मृदंग—

श्याम माधव धोण्ड

अनुक्रमणिका

मराठी वाङ्मयेतिहास : स्वरूप आणि अपेक्षा

डॉ. सुशीला पाटील

मराठीतील वाङ्मयेतिहास लेखन हा नेहमीच वादाचाच प्रांत राहिलेला आहे. वाङ्मयेतिहासाला सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, भाषिक अशा कितीतरी कक्षा असाव्या व त्या दृष्टीने मराठीचे वाङ्मयेतिहास लेखन व्हावे अशी प्रस्तुत लेखिकेची अपेक्षा आहे. हे काम एका व्यक्तीला करणे कठीण आहे. विदर्भ साहित्य संघाने या दृष्टीने संघटित प्रयत्न केले तर अपेक्षित वाङ्मयेतिहास लिहिता येईल असेही प्रस्तुत लेखिकेस वाटते असे त्यांनी प्रस्तुतच्या लेखासोबत संपादकांना पाठविलेल्या पत्रात म्हटलेले आहे.

त्या दृष्टीने सध्याच्या वाङ्मयेतिहासाचे स्वरूप स्पष्ट करणारा हा लेख त्यांनी लिहिलेला असून तो येथे प्रकाशित करीत आहोत. या संबंधातील प्रतिक्रिया वा इतर स्वतंत्र लेखनही कोणी पाठविल्यास युगवाणीतून ते प्रकाशित होऊ शकेल.

मराठीत वाङमयेतिहासविषयक ग्रंथ विपुल आहेत. कुणी 'विवेचक' तर कुणी 'चिकित्सक' वाङमयेतिहास लिहिले. कुणी वाङमयाचा 'परामर्ष' घेतला तर कुणी साहित्य-सृष्टीला 'प्रदक्षिणा' घातली. कुणी वाङमयाचे 'विहंगमावलोकन' केले. तर कुणी केवळ वाङमयाचे 'स्वरूप' न्याहाळण्याचा प्रयत्न केला. पण तरीही या सर्व लेखनातून साहित्येतिहासा-विषयीची अपेक्षा परिपूर्ण होत नाही. अभ्यासकांना समाधान लाभत नाही. वाङमय सर्वांगांनी उलगडले जात नाही. साहित्येतिहासविषयक आपली जाणीवच परिपक्व झाली नाही की काय असे मग वाटू लागते.

मराठीतील बहुतेक साहित्येतिहास ग्रंथ साहित्यिकांचा आणि साहित्यकृतींचा कालक्रमानुसार परिचय करून देणारे आहेत. अशी परिचयपर माहिती प्राथमिक पातळीवर फक्त उपयोगाची असते हे ग्रंथ साहित्येतिहासाचे समाधान अभ्यासकांना देऊ शकत नाहीत. इति+ह+आस म्हणजे 'असे असे झाले' या 'इतिहास' शब्दाच्या मूळ अर्थानुसार आपण इतिहासाकडे बघत असतो. अलीकडे तर इतिहासाचे हे क्षेत्रही लवचिक झाले आहे. कारण प्रतिदिनी नवे नवे पुरावे उपलब्ध होतात. प्रचलित माहितीपेक्षा वेगळी माहिती पुढे येते. आणि प्रस्थापित ऐतिहासिक घटना पुसून टाकते. त्याद्वारा इतिहासाचा चेहराच बदलतो. पण अशा इतिहासापेक्षाही साहित्येतिहासाचे स्वरूप मूलतःच वेगळे असते. इतिहासात जशी व्यक्तींची व घटनांची कालानुसार नोंद असते तशी साहित्येतिहासात लेखकाची व त्यांच्या लेखनकर्तृत्वाची निव्वळ नोंद अपेक्षित नसते. ती ती साहित्यकृती कशी साकार झाली ते पाहणे महत्त्वाचे असते. आणि साहित्यकृती अशी अशी घडली हे सांगणे कठीण असते. कारण वाङमयनिर्मिती ही एक सचेतन प्रक्रिया असते. तिचा जिवंतपणा अनुभवता येतो पण तो उलगडून दाखवणे अवघड असते. वाङमयकृतीला अनेक आयाम असतात. तिला तिच्या काळाची पार्श्वभूमी असते. आणि तिच्या निर्मात्याचे, त्याच्या चेतनामय मनाचे अधिष्ठानही असते वाङमयकृतीचा काळ व तिचा निर्माता या दोहोंच्या एकसंध विचाराशिवाय तिचे परिपूर्ण आकलन होणे कठीण ठरते. केवळ काळाचा विचार केला तरी त्याला कितीतरी

परिमाण असतात. त्या त्या काळाची सामाजिक सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय अशी कित्येक वैशिष्टचे असतात. अन् निर्मात्याचा विचार केला तरी त्याची आवडनावड त्यानुसार त्याच्या मनाचा कल, त्याची अभिरुची, त्याची संस्कृती, त्याचे शिक्षण, त्याचा सामाजिक स्तर या साऱ्यांचा साहित्यनिर्मितीत सहभाग असतो. साहित्येतिहासात साहित्यकृतीचा काळ अन् निर्माता यांच्या संदर्भातील सर्व बाबींचा मागोवा तर अपेक्षित असतोच पण त्याशिवाय वाङमयकृतीवर ज्या क्रिया प्रतिक्रिया व्यक्त होतात त्यांचीही नोंद साहित्येतिहासाने घ्यावी अशीही अपेक्षा असते. वाङमय निर्माण झाल्यानंतर जाणकारांकडून त्याचे मूल्यमापन होते. तत्पूर्वीच्या वाङमयाच्या पार्श्व-भूमीवर त्याचे स्थान जोखले जाते. आजूबाजूच्या वर्तमानकालीन साहित्याच्या संदर्भात त्याचे विशेष लक्षात घेतले जातात. त्या विशेषांचा समाजावर वा वाङमयावर पडणारा प्रभाव या साऱ्यांची दखल साहित्येतिहासाने घ्यावी अशी अपेक्षा असते.

या अपेक्षेला पूर्ण करणारा साहित्येतिहास आढळत नाही. दर्जेदार साहित्येतिहासाची गरज लक्षात घेऊन महाराष्ट्र साहित्य परिषदेने वाङमयेतिहासाची योजना हाती घेतली. जाण-कारांची मते मागवली. दि. के. बेडेकर आणि गं. बा. सरदार यांनीही एक पर्यायी योजना आखली त्याचप्रमाणे महाराष्ट्र साहित्य परिषदेने १९८१ मध्ये 'वाङमयेतिहासाची संकल्पना' यावर आणि १९८२ मध्ये 'आधुनिक मराठी वाङमयाच्या इतिहासाची मांडणी' यावर चर्चासत्र आयोजित केले. त्यात साहित्येतिहासासंबंधी परिसंवाद ठेवले. त्यानिमित्ताने साहित्येतिहासावर बरेच विचारमंथन झाले. त्यातून सुटे सुटे मौलिक विचारही पुढे आले. पण त्या साऱ्यांचा एकत्रित विचार करून एकात्म अन् एकसंध असा सर्व अपेक्षा पूर्ण करणारा समाधानकारक साहित्ये-तिहास मात्र अजून अभ्यासकांपुढे आला नाही.

डॉ. दत्तात्रय पुंडे 'वाङमयेतिहासाची संक-ल्पना सिद्ध होण्यास आधारभूमीच तयार झाली नाही'[१] अशी तक्रार करतात ही संकल्पना तयार व्हावी या दृष्टीने महाराष्ट्र साहित्य परि-षदेच्या चर्चासत्रात वाचल्या गेलेल्या निबंधांचे 'वाङमयेतिहासाची संकल्पना' या नावाने डॉ. पुंडे यांनी संपादन केले आहे. हा ग्रंथ वाङमयाचा इतिहास लिहिणारांना मार्गदर्शक ठरणारा आहे. 'महाराष्ट्रातील प्राकृतिक भाषांचा व वाङमयाचा इतिहास'-या लेखात वि. का. राजवाडे- 'सार-स्वताचा इतिहास हा वाङमयेतिहासाचा एक अंश आहे'[१] असे सांगतात. वाङमयेतिहासाची व्याप्ती स्पष्ट करताना ते म्हणतात- 'गणन, कार्यकारणसंबंधदर्शन व वर्गीकरण या दृष्टीने वाङमयाची स्थित्यंतरे सांगणे म्हणजे वाङमयाचा शास्त्रीय इतिहास रचणे.'[२] राजवाड्यांची ही दृष्टी महत्त्वाची आहे वाङमयेतिहासाचे स्वरूप, त्याच्याशी संबंधित असणाऱ्या विविध समस्या आणि वाङमयेतिहासात समाविष्ट होणाऱ्या विविध प्रक्रिया यांचा साकल्याने विचार करून 'वाङ-मयाचा इतिहास हे वाङमयीन विद्वत्तेचे अत्यंत महत्त्वाचे परिक्षेत्र आहे'[३] असे दु. का. संत म्हणतात. श्री. ना. बनहट्टी तर विस्तृत भौगोलिक पार्श्वभूमीवरून वाङमयेतिहासाकडे पाहतात. 'भारतातील भिन्न भिन्न भाषांचे वाङमय आणि एकं-दर भारतातील वाङमयीन वातावरण यांचा चांगला व्यासंग करून आणि परस्पर संस्कारांचे धागेदोरे समजून घेऊन मगच मराठी वाङमयाचा इतिहास लिहावा.'[४] असे त्यांचे मत आहे. मा. गो. देशमुख यांना तपशीलाच्या दृष्टीने मराठीचे वाङमयेतिहास अपूर्ण वाटतात. 'महाराष्ट्राबाहेर निर्माण झालेल्या मराठी वाङमयाचा इतिहासविषयक लेख-नात समावेश झाला नाही'[५] अशी खंत ते बोलून दाखवतात. डॉ. यू. म. पठाण यांना प्राचीन वाङमयेतिहास वेगळाच अर्थाने अपुरे वाटतात. 'वारकरी, समर्थ, नाथ, महानुभाव आदी सांप्र-दायिकांच्या साहित्याबरोबरच जैन, लिंगायत, नागेश, आनंद आदि इतर सांप्रदायिकांच्या साहित्याचाही विचार करावा व वाङमयेतिहासाला परिपूर्णता आणावी'[६] असे त्यांना वाटते. तर 'प्राचीन मराठी वाङमयाचा वाङमयीन दृष्टि-कोनातून समग्र इतिहास लिहिण्याचे अद्याप राहूनच गेले आहे'[७] असे म्हणून व. दि. कुळकर्णी वाङमये-तिहासाच्या एका उणीवेवर बोट ठेवतात. 'ग्रंथा-वर झालेल्या अनेक टीकांचा, समीक्षालेखांचा

उल्लेख वाङमयेतिहासात असावा काय ?'[८] असा प्रश्न प्रल्हाद वडेर यांना पडला आहे. वाङमय ही एक कला आहे. कला क्रमशः विकसित होत असते. अन् कधी कधी अस्तंगतही होते साहित्येतिहासात वाङ्मयकलेची ही प्रगती वा परागती टिपली जावी या अर्थाने पु. य. देशपांडे म्हणतात. 'वाङमयाचा विकास म्हणजे कलात्मक अभिव्यक्तीला चालना देणाऱ्या प्रेरणांचा, प्रवृत्तींचा व प्रकारांचा विकास होय. या विकासाचे क्रमशः साकल्यात्मक दिग्दर्शन म्हणजेच वाङमयेतिहास !'[९]

विचारवंतांच्या या विविध मतांवरून वाङमयेतिहासाच्या प्रचंड आवाक्याची कल्पना येऊ शकते. वाङमयेतिहास संज्ञेचा नेमका अर्थ, त्यातील वाङमय या शब्दाची निश्चिती, वाङमयेतिहाससंबद्ध ग्रंथ, वाङमयेतिहासाचा दृष्टिकोण, वाङमयेतिहासाची व्याप्ती इत्यादी समस्यांबाबत मूलगामी विचार होणे आवश्यक आहे. एवढा सर्वांगीण विचार करून आणि सर्व बाबींचे अवधान सांभाळून वाङमयेतिहास लिहिणे अतिशय जिकिरीचे आणि चिकाटीचे काम आहे.

वाङमयाचे स्वरूप काय आणि वाङमयाचे कार्य काय यासंबंधी जी भूमिका घेतली जाईल त्यानुसार वाङमयाचा इतिहास वेगवेगळ्या पद्धतींनी लिहिला जाऊ शकतो.

अशा वेगवेगळ्या संकल्पित वाङमयेतिहासाचा विचार करता करताच डब्ल्यू पी. कर यांचे उद्‌गारही आठवतात. ते म्हणतात—'We do not need literary history. as its objects are always present, are always eternal and thus have no proper history at all.'[१०] कर्‍याच्या या मताचाच अनुवाद प्रा. सीताराम रायकर करतात– 'प्रत्येक वाङमयकृती सुटी, स्वायत्त अशी भाषिक संघटना असते. तिची निर्मिती कार्यकारण भावनापासून मुक्त असते. आणि म्हणूनच तिचा आस्वाद आपण केवळ ती कृती वाचून घेऊ शकतो.'[११]

(अपूर्ण)

संदर्भ—

(१) पुंडे दत्तात्रय, 'वाङमयेतिहासाची संकल्पना' / प्रतिमा प्रकाशन / पुणे ३०, / प्रस्तावना.

(२) राजवाडे लेखसंग्रह / संपा–लक्ष्मणशास्त्री जोशी, / साहित्य-अकादमी / नवी दिल्ली १९५८–' महाराष्ट्रातील प्राकृतिक भाषांचा व वाङ्मयाचा इतिहास

(३) संत दु. का. / 'वाङ्मयेतिहास स्वरूप, समस्या, पद्धती' / वाङ्मयीन विद्वत्ता / पुणे विद्यापीठ / पुणे / १९७६

(४) बनहट्टी श्री. ना. / 'अखिल भारतीय पार्श्वभूमी आणि भारतीय भाषांशी संबंध' / म. सा. पत्रिका जानेवारी–मार्च १९५४

(५) देशमुख मा. गो. / 'मराठी वाङ्मयाचा इतिहास' / म. सा. पत्रिका, जुलै–सप्टेंबर १९५४

(६) पठाण यू. म. / 'प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास काही प्रश्न'–शोधणी / मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, १९७५

(७) कुलकर्णी व. दि. / संपा–'साहित्यचिंतन' मुंबई विद्यापीठ / मुंबई, १९८३ / लेखः– प्राचीन मराठी वाङ्मयीन रूपे आणि त्यांचे विहंगमावलोकन.

(८) वडेर प्रल्हाद / 'मराठी वाङ्मयाचा इतिहास आणि त्याचे अध्यापन' एक चर्चासत्र 'अनुभव व आकार' मेहता पब्लिशिंग, पुणे १९७९

(९) देशपांडे पु. य. / 'मराठी वाङ्मयाचा इतिहास कसा लिहावा ? कालखंड कसे असावे ? / म. सा. पत्रिका जाने–मार्च १९५४

(१०) Ker W. P. / 'Literary Scholarship' University of North carolina Press.

(११) रायकर सीताराम / वाङ्मयेतिहासाची संकल्पना. प्रतिमा प्रकाशन पुणे.

॥ सर्वेक्षण ॥

"अराजक" : वाचकांच्या दृष्टिकोनातून

डॉ. अरुण कुळकर्णी

साहित्य वाचनाच्या अनुभवाचे स्वरूप, त्याचे जीवनानुभवाशी असलेले संबंध, प्रतिमांचा अर्थबोध, त्यावरील प्रतिक्रिया हा सारा प्रांतच तसा 'मानस' प्रांत असून त्याची उकल अथवा आकलन करून घेणे-देणे हे निव्वळ साहित्य शास्त्राच्या प्रांतातच तेवढे मावत नाही.

प्रस्तुत लेखात वाचकाच्या, लिखाणाबदलच्या प्रतिक्रियांचे सर्वेक्षणात्मक पद्धतीने मानसशास्त्रीय अध्ययन केल्या गेले असून या अध्ययनाचे उद्दिष्ट, अध्ययनाची पद्धती व प्रतिक्रियांचे विश्लेषण मांडून डॉ. अरुण कुळकर्णी यांनी मराठी प्रकाशक, लेखक व वाचक यांना त्यांचेशी संबधित अशा एका प्रयोगाचा परिचय घडविलेला आहे. मराठीत बहुधा पहिलाच. या प्रयोगाबाबत, त्याच्या प्रयोगमूल्याबाबत तसेच त्यात निर्दिष्ट पद्धती, तिची उपयोजितता व उद्दिष्ट इ. संदर्भात विविध मते संभवतात. 'युगवाणी 'कडे या प्रयोगावरील अशी मते, प्रतिक्रिया वाचकांनी आवर्जून पाठवाव्यात. निवडक प्रतिक्रिया युगवाणीच्या पुढील अंकात प्रकाशित करण्यात येतील.

कथा किंवा कादंबरी वाचनाचा अनुभव हा "बौद्धिक" स्वरूपाचा नसतो. तर तो प्रत्यक्ष जीवनातल्या अनुभवासारखा असतो. म्हणजे असे की, कथा किंवा कादंबरी वाचत असताना त्यातील वाक्ये व शब्दप्रतिमा यांचे द्वारे एक विशिष्ट असा अर्थबोध आपल्याला होत असतो आणि काहीतरी घडते आहे असे आपल्याला सारखे जाणवत राहते. निरनिराळ्या वाक्यांच्याद्वारे एक विशिष्ट अशी 'लय' साधली जात असल्याने जणू आपल्यासमोर कोणी चालते आहे, बोलते आहे किंवा हातवारे करते आहे असे प्रत्यक्ष जीवनसदृश्य अनुभव आपल्याला येत असतात.

म्हणूनच साहित्यातील जीवनसृष्टी जरी काल्पनिक असली तरी त्या सृष्टीतील व्यक्तींशी वाचक एकरूप होऊ शकतो हे लक्षात घेणे अतिशय महत्त्वाचे आहे. अर्थात एखाद्या कथेशी किंवा कादंबरीशी वाचक कितपत समरस होईल हे त्या कथेत किंवा कादंबरीत आपले स्वतःचे जीवन चरित्र किती प्रमाणात प्रतिबिंबित झाल्याचे तो पाहतो यावर अवलंबून राहील. साहजिकच एखाद्या कादंबरीचा विषय जर चित्तस्पर्शी वास्तवावर आधारित असेल तर अशा कादंबरीत त्याला स्वतःचेच जीवन चरित्र रेखाटले गेले असल्याचे प्रकर्षाने जाणवेल. परिणामतः अशा कादंबरीतील महत्त्वाच्या व्यक्तिरेखांशी त्याचे 'आयडेंटिफिकेशन' झाल्याने ती वाचत असताना तो त्यात खूप 'इन्व्हॉल्व्ह' झालेला दिसेल व ती कलाकृती त्याला आवडल्यावाचून राहणार नाही. सारांश,

कथाकादंबरीसारख्या एखाद्या साहित्यिक कलाकृतीचे यश इष्ट तो भावात्मक परिणाम वाचकांवर कितपत साधल्या गेला आहे यावर अवलंबून असते असे म्हटल्यास ते वावगे होणार नाही.

कोणतीही कथा किंवा कादंबरी वाचत असताना वाचकाला येणारा कलानुभव हा अमूर्त किंवा संकल्पनात्मक नसून तो जीवनाभुवासारखाच असतो याचे प्रमाण खुद्द वाचकांकडून प्राप्त करता आले तरच कलानुभवाच्या स्वरूपाविषयीची ही उपपत्ती ग्राह्य ठरू शकेल. अन्यथा कलानुभव हा जीवनानुभवासारखाच असतो हे विधान कोणा एखाद्याचे वैयक्तिक मत आहे असेच त्याबाबत म्हणावे लागेल अर्थात वाचकांकडून असे प्रमाण प्राप्त करण्याचा एक उत्तम मार्ग म्हणजे एखादी कादंबरी किंवा कथा त्यांना वाचावयास देऊन, ती वाचत असताना त्यांना कोणता अनुभव आला व त्यातून कलाकृतीविषयी त्यांची प्रतिक्रिया काय हे जाणून घेणे. निराळ्या शब्दात सांगावयाचे झाल्यास. वाचकांच्या एखाद्या प्रातिनिधिक समूहाला एक कादंबरी वाचावयास देऊन नंतर काही विधानांच्या सहाय्याने त्या कादंबरीच्या संदर्भात त्यांच्या प्रतिक्रिया कशा प्रकारच्या बनल्या आहेत हे जाणून घेता येईल. यालाच त्या कादंबरीच्या संदर्भात वाचकांच्या प्रतिक्रियांचे 'सर्वेक्षण' करणे असे येथे म्हटले आहे.

प्रस्तुत लेखकाने नुकतेच 'अराजक' या प्रा. बा. ह. कल्याणकर यांच्या देशमुख आणि कंपनी, पुणे यांनी प्रकाशित केलेल्या कादंबरीबाबत असे एक सर्वेक्षण पूर्ण केले आहे. या सर्वेक्षणाचा विस्तृत वृत्तांत सादर करणे हा या लेखाचा मुख्य उद्देश आहे.

वाचकांच्या प्रतिक्रिया / सर्वेक्षण पद्धति

'अराजक' या कादंबरीच्या संदर्भातील प्रतिक्रियांच्या सर्वेक्षणात वाचकांच्या ज्या प्रतिनिधिक समूहाचा सहभाग प्राप्त झाला त्यात महाविद्यालयीन व विद्यापीठांमधील ३२ विद्यार्थी, १३ महाविद्यालयीन प्राध्यापक, ३ शालेय शिक्षक, ९ विविध कार्यालयांमधील विविध पदांवर काम करणारे कर्मचारी, ५ स्वतंत्र व्यवसायी आणि १ गृहिणी अशा एकूण ६३ जणांचा समावेश होता. त्यातील १७ सहभागी नागपूरचे असून उरलेले ४६ सहभागी कोल्हापूर व सांगली जिल्ह्यांमधील आहेत.

ज्या कादंबरीबद्दलच्या प्रतिक्रियांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे ती 'अराजक' कादंबरी बरीच मोठी म्हणजे ४१० पृष्ठांची आहे. एवढी मोठी कादंबरी आधी वाचायला लावून नंतर त्याबद्दल या एकूण ६३ वाचकांकडून काही विधाने त्यांना उपलब्ध करून देण्यात आली. या विधानांच्या सहाय्याने त्यांच्या प्रतिक्रिया जाणून घेण हे कार्य तसे अवघडच होते. कारण, संपूर्ण कादं- बरी वाचण्यास खूपच वेळ लागणार होता. शिवाय एकाच बैठकीत त्यांच्याकडून वाचन पूर्ण रकवून घेणं शक्य नव्हते. अशाप्रकारे एका ठराविक वेळेच्या आत वाचकांना कादबरी वाचावयास लावून नंतर त्यांच्या प्रतिक्रिया नोंदवून घेणे ही बाब सर्वेक्षणकर्त्यांच्या आवाक्याबाहेरची होती. परंतु सर्वेक्षणाचा हा प्रयोग करून बघायचाच ही जिद्द होतीच. यावर उपाय म्हणून संपूर्ण कादंबरी वाचावयास लावण्याऐवजी त्यातील 'सार' असलेला कादंबरीचा गोषवारा तयार करून तो सहभागी वाचकांना वाचावयास द्यावा असे ठरविले. हा गोषवारा वाचून झाल्यावर ज्यातून वेगवेगळ्या प्रतिक्रिया व्यक्त झाल्या आहेत अशी सात विधाने त्यांना वाचावयास द्यावयाची व प्रत्येक विधा- नाशी संबंधित आपली प्रतिक्रिया नोंदविण्यास सांगायचे असे ठरविण्यात आले. प्रत्येक विधानात कादंबरीविषयी जे म्हटले होते त्याचेशी ते कितपत 'सहमत' किंवा 'असहमत' आहेत हे व्यक्त करणे त्यांचे काम होते. या शिवाय 'अराजक' या शब्दाचा त्यांनी लावलेला अर्थ कोणता व या कलाकृतीबद्दल त्यांना आणखी काही म्हणावयाचे आहे काय असेही दोन प्रश्न त्यांना विचारण्यात आले. अर्थात कादंबरीचा गोषवारा, त्याविषयी प्रतिक्रिया नोंदविण्यासाठी उपयोगात आणावी

लागणारी विधाने व प्रत्येक विधानाशी वाचक कितपत सहमत किंवा असहमत आहे हे दर्शविण्यासाठी सुचविण्यात आलेले पाच पर्यायी वाक्यांश इत्यादींचा समावेश असलेली एक पुस्तिकाच तयार करण्यात आली. या पुस्तिकेसोबत एक विनतीपत्र देखील जोडण्यात आले. कादंबरीचा सारांश अशा प्रकारे तयार केला होता की, त्यातील महत्वाच्या व्यक्ती व त्यांच्या बाबतीत घडलेल्या मुख्य घटना व प्रसंग या संबंधीचे एक धावते वर्णन सर्वेक्षणात सहभागी झालेल्या वाचकांना वाचावयास मिळावे.

प्रतिक्रियांचे विश्लेषण :

'अराजक' बद्दल आपल्या प्रतिक्रिया नोंदविताना विशिष्ट नमुन्यात जी सात विधाने नमूद केली होती त्यांचा सहभागी वाचकांना उपयोग करावयाचा होता. प्रत्येक विधान वाचून झाल्यावर त्यात जे काही म्हटलेले आहे त्याच्याशी ते कितपत 'सहमत' किंवा 'असहमत' आहेत हे त्यांना सांगावयाचे होते. यासाठी प्रत्येक विधानासोबत दिलेल्या ५ पर्यायी वाक्यांशापैकी कोणत्याही एकाची निवड ते करू शकत होते. हे पर्यायी वाक्यांश खाली दिलेल्या प्रमाणे आहेत.

संपूर्णपणे सहमत / सहमत / अनिर्णित / असहमत / संपूर्णपणे असहमत

जर वाचक दिलेल्या विधानाशी सहमत आहे असे त्याला वाटले असते तर डावीकडील दोन विधानांपैकी कोणत्याही एकाची निवड तो करू शकत होता. याउलट दिलेल्या विधानाशी वाचक असहमत आहे असे त्याला वाटले असते तर तो उजवीकडील दोनपैकी कोणत्याही एका पर्यायाची निवड करू शकत होता. सहमत किंवा असहमत यापैकी कोणतीच प्रतिक्रिया आपण व्यक्त करू शकत नाही असे जर वाचकाला वाटले असते तर तो 'अनिर्णित' या पर्यायाची निवड करू शकत होता.

'संपूर्णपण सहमत' व 'सहमत' या दोहोतून व्यक्त होणाऱ्या प्रतिक्रियांमधील फरक 'गुणात्मक' नसून तो 'अंशात्मक' आहे. कारण या दोघांपैकी कोणताही पर्याय निवडला तरी दिलेले विधान वाचकाला मान्य आहे हेच त्याच्यातून व्यक्त होत असते. फरक एवढाच की, संपूर्णपणे सहमत या प्रतिक्रियेतून व्यक्त झालेली मान्यता अधिक तीव्र स्वरुपाची असते. असाच फरक 'संपूर्णपणे असहमत' या दोन प्रतिक्रियांमध्ये अभिप्रत आहे.

वाचकांच्या प्रतिक्रियांचे विश्लेषण करताना प्रत्येक विधानासाठी प्रत्येक वाचकाने कोणता पर्याय निवडला याची नोंद घेण्यात आली एकाच पर्याय अनेकांनी निवडलेला असण्याची शक्यता होती. म्हणूनच प्रत्येक विधानासाठी प्रत्येक वाक्यांश ६३ पैकी किती जणांनी निवडला आहे याची नोंद घेतली. नतर, 'संपूर्णपणे सहमत' आणि 'सहमत' या दोन वाक्यांशांची निवड करणाऱ्यांची 'एकूण' संख्या किती हे बघितले. याच पद्धतीने 'असहमत' व 'संपूर्णपणे असहमत' या दोन वाक्यांशांना निवडणाऱ्यांची एकत्र संख्या किती निघते तेही बघितले याच बरोबर 'अनिर्णित' हा वाक्यांश निवड करणाऱ्यांची संख्या किती हे बघितले. पुढे वाक्यांश निवडीच्या संख्यांवरून वाचकांची शेकडेवारी काढली. यामुळे प्रत्यक विधानाच्या संदर्भात वाचकांची प्रतिक्रिया कितपत अनुकूल किंवा प्रतिकूल आहे हे स्पष्ट झाले. अशा तऱ्हेचे विश्लेषण केल्यानंतर कादंबरीबद्दल प्रतिक्रियांचे जे चित्र निर्माण झाले त्याचा तपशील खाली दिल्याप्रमाणे आहे. एकूण ६३ वाचकाच्या प्रत्येक प्रतिक्रियेचे शेकडा प्रमाण तर त्यात आहेच, शिवाय १३ महाविद्यालयीन प्राध्यापकांच्या प्रतिक्रियांचे शेकडा प्रमाण देखील त्यात नोंदविले आहे.

'अराजक' या कादंबरीतील मध्यवर्ती व्यक्तिरेखा प्रा. जयवत देशमुख हे एका ग्रामीण महाविद्यालयात प्राध्यापक आहेत व म्हणून प्राध्यापक असलेल्या वाचकांच्या प्रतिक्रियांची मुद्दाम

वेगळी शेकडेवारी काढली. संपूर्ण समूहाच्या तुलनेत ती किती निघते हे बघण्याचा यामागे उद्देश होता. एकूण तपशील खाली दर्शविल्याप्रमाणे आहे.

विविध प्रतिक्रिया व्यक्त करणारी विधाने	प्रत्येक विधानाला मिळालेल्या प्रतिक्रियांच्या अनुकूलतेची, प्रतिकूलतेची व तटस्थतेची शेकडेवारी संपूर्णपणे सहमत / सहमत	संपूर्णपणे असहमत / असहमत	अनिर्णित
१. प्रा. देशमुखांचे विचार करणे, बोलणे, चालणे व हातवारे करणे हे सर्व आपण पाहत आहोत असे या व्यक्तीचे वर्णन वाचताना जाणवते.	प्राध्यापक : ८४.६ संपूर्ण समूह : ७३.०	१५.४ ९.५	०.० १७.५
२. प्रा. देशमुख ही व्यक्ती आपल्याचपैकी कोणीतरी एक आहे असे या व्यक्तीचे वर्णन वाचताना जाणवते.	प्राध्यापक : ९२.३ संपूर्ण समूह : ७१.४	७.७ २२.२	०.० ६.६
३. आज आपल्या सभोवताली जे घडते आहे तेच नेमके 'अराजक'मध्ये वाचावयास मिळते	प्राध्यापक : ६९.२ संपूर्ण समूह : ८७.३	७.७ ६.३	२३.१ ६.४
४. आपले आदर्श व मूल्ये आणि प्रत्यक्ष जीवनातील आपले अनुभव यातील विसंगती प्रा. देशमुखांप्रमाणे बऱ्याच जणांना जाणवत असावी असे वाटते.	प्राध्यापक : ७६.९ संपूर्ण समूह : ७१.४	१५.४ १९.१	७.७ ९.५
५. 'अराजक'मध्ये प्रा. देशमुखांना वाटते त्याप्रमाणे सारा समाज दंगलीसारखा झाला आहे असे म्हणता येणार नाही.	प्राध्यापक : ५३.८ संपूर्ण समूह : ४६.०	४६.२ ४१.३	०.० १२.७
६. 'अराजक'चे सार वाचल्यावर मूळ कादंबरी पूर्णपणे वाचावी अशी उत्सुकता निर्माण होते.	प्राध्यापक : ८४.६ संपूर्ण समूह : ६६.७	७.७ २३.८	७.७ ९.५
७. आपल्या सभोवतालच्या परिस्थितीत आज काय चालले आहे याचे रोखठोक वर्णन असल्यामुळे 'अराजक' ही कादंबरी कोणालाही आवडण्यासारखी आहे	प्राध्यापक : ७६.९ संपूर्ण समूह : ६६.७	१५.४ २३.८	७.७ ९.५

प्रत्येक विधानाला मिळालेल्या प्रतिक्रियांचे जे विश्लेषण वर नमूद केलेले आहे त्यावर नजर टाकल्यास असे दिसून येईल की, प्रा. देशमुखांबद्दलचे वर्णन वाचत असताना त्या व्यक्तीला जणू 'आपण बोलताना व चालतांना पाहत आहोत' व ही व्यक्ती 'आपल्याचपैकी कोणीतरी एक

आहे' असे एकूण वाचकांपैकी ७१ ते ७३ टक्के वाचकांना जाणवलेले आहे (विधान क्र. २ व १ ला मिळालेल्या अनुकूल प्रतिक्रियांचे प्रतिशत प्रमाण). एकूण ६३ वाचकांपैकी जे १३ वाचक महाविद्यालयीन प्राध्यापक आहेत त्यांच्या बाबतीत हेच प्रमाण पहिल्या दोन विधानांसाठी अनुक्रमे ८४.६ आणि ९२.३ इतके आहे. वाचकांच्या प्रतिक्रिया हा जर एक महत्त्वाचा मानदंड मानल्या जात असेल तर कादंबरीसारख्या साहित्यिक कलाकृतीचा आस्वाद घेताना येणारा अनुभव हा अमूर्त किंवा संकल्पनात्मक नसून तो प्रत्यक्ष जीवनातील अनुभवासारखाच असतो या सिद्धांताला प्रस्तुत सर्वेक्षणात पुष्टी मिळते. जे वाचक महाविद्यालयीन प्राध्यापक आहेत त्यांचे या संदर्भातील अनुकूल प्रतिक्रियांचे प्रतिशत प्रमाण किती तरी जास्त आहे (उदाहरणार्थ, पहिल्या विधानाशी सहमत असणाऱ्या प्राध्यापकांचे एकूण शेकडा प्रमाण ८४% इतके आहे). कादंबरीची मध्यवर्ती व्यक्तिरेखा जयवंत देशमुख हे स्वतः एक प्राध्यापक असल्यामुळे कदाचित हा परिणाम घडून आलेला असावा. ते काहीही असले तरी प्रत्यक्ष जीवनात जसा एखादा प्राध्यापक वागत असतो तसाच तो वागत असल्याचे बहुसंख्य वाचकांना वाटलेले आहे असे या सर्वेक्षणात आढळून आले आहे. अर्थात हा परिणाम घडून येण्यास लेखकाचे कसब हे प्रमुख कारण.

'आज आपल्या सभोवताली जे घडते आहे तेच नेमके 'अराजक'मध्ये वाचावयास मिळते' या तिसऱ्या विधानाला मिळालेल्या अनुकूल प्रतिक्रियांचे प्रतिशत प्रमाणही खूपच जास्त आहे (संपूर्ण समूह : ८७.३ व प्राध्यापक : ६९.२). तिसऱ्या प्रमाणेच चवथ्या विधानाला देखील अनुकूल प्रतिक्रियांचे प्रतिशत प्रमाण बरेच जास्त म्हणजेच ७६.९ (प्राध्यापक) आणि ७१.४ (संपूर्ण समूह) इतके आहे. तिसऱ्या व चवथ्या विधानांना इतक्या बहुसंख्येने मिळालेल्या अनुकूल प्रतिक्रियांवरून हे अगदी स्पष्ट होते की, वास्तवाचे जे वर्णन कादंबरीत आलेले आहे ते एकदम चित्तस्पर्शी असे ठरले आहे. कोणत्याही साहित्यिक कलाकृतीचा आस्वाद घेताना येणारा अनुभव हा बौद्धिक नसून तो भावात्मक असतो म्हणूनच असे चित्तस्पर्शी वर्णन वाचकांना भावते. म्हणूनच असे वर्णन ज्या कादंबरीत असेल ती वाचकांना आवडल्याशिवाय राहणार नाही. या दृष्टिकोनातून विचार केल्यास 'अराजक' ही कादंबरी चित्तस्पर्शी ठरलेली आहे असेच म्हणावे लागेल.

तथापि, अराजकमधील प्रा. देशमुखांना वाटते त्याप्रमाणे 'सारा समाज दंगलीसारखा झाला नाही' असे बऱ्याच वाचकांना म्हणजेच ५३.८ टक्के प्राध्यापक व संपूर्ण समूहातील ४६ टक्के वाचक, यांना वाटत असल्याचे पाचव्या विधानाला आलेल्या प्रतिक्रियांवरून दिसते.

'अराजक'चे सार वाचल्यावर मूळ कादंबरी पूर्णपणे वाचावी अशी उत्सुकता निर्माण होते हे ८४.६ टक्के प्राध्यापक व संपूर्ण समूहातील ६६.७ टक्के वाचक यांना वाटत असल्याचे सहाव्या विधानावर मिळालेल्या प्रतिक्रियांवरून स्पष्ट होते. ही टक्केवारी बरीच जास्त असल्याने अराजक ही कादंबरी जर वाचकांनी हाती घेतली तर ती वाचून पूर्ण करण्याइतकी उत्सुकता त्यांच्यात निर्माण होईल असे या कादंबरीचे वर्णन करता येईल. अर्थात अशी उत्सुकता सर्वांमध्येच निर्माण होईल असे मात्र म्हणता यायचे नाही. कारण, २३.८ टक्के वाचकांनी ते सहाव्या विधानाशी 'असहमत' असल्याचे, तर ९.५ टक्के वाचकांनी ते याबाबत अनिर्णित असल्याचे म्हटले आहे.

शेवटी, "आपल्या सभोवतालच्या परिस्थितीत आज काय चालले आहे याचे रोखठोक वर्णन असल्यामुळे अराजक ही कादंबरी कोणालाही आवडण्यासारखी आहे" असे ७६.९ टक्के प्राध्यापकांनी व्यक्त केले आहे. संपूर्ण समूहातील ६६.७ टक्के वाचकांनी हीच प्रतिक्रिया व्यक्त केलेली आहे. ही शेकडेवारी थोडीथोडकी नसल्यामुळे 'अराजक' ही कादंबरी बहुसंख्य वाचकांना आवडण्यासारखी आहे' असेच म्हणावे लागेल. अर्थात १५.४ टक्के प्राध्यापक 'ही कादंबरी आवडण्यासारखी आहे' या विधानाशी सहमत नसून ७.७ टक्के प्राध्यापक याबाबत अनिर्णित आहेत. वाचकांच्या संपूर्ण समूहात हीच टक्केवारी अनुक्रमे २३.८ आणि ९.५ इतकी आहे.

वाचकांच्या या सर्वेक्षणात वाचकांना 'अराजक' या कादंबरीविषयी काही म्हणावयाचे आहे काय व असल्यास नेमके काय ? असाही एक प्रश्न विचारण्यात आला होता. या संदर्भातील विश्लेषणावरून असे आढळले की, ६३ वाचकांपैकी केवळ १६ वाचकांनीच आपला अभिप्राय व्यक्त केला होता. या १६ पैकी ८ जणांनी 'अराजक' या कादंबरीत वास्तवाचे किंवा सत्य परिस्थितीचे यशस्वी चित्रण लेखकाने केले आहे असे म्हटले, तर ५ जणांनी ही कादंबरी वाचकांची उत्सुकता वाढविणारी आहे असे म्हटले आहे. उरलेल्या तीन जणांपैकी एकाने 'दंगलीचा राष्ट्रीय जीवनावर, विशेषतः लोकशाहीवर, कसा परिणाम होऊ शकतो' याचे चित्रण या कादंबरीत केल्या गेले असल्याचे म्हटले आहे. दुसऱ्याने आपल्या अभिप्रायात "भौतिक सुख पुरेसे नसल्याने असंतोष निर्माण होऊन तो हळुहळू कसा वाढत जातो" यासंबंधीचे चित्रण या कादंबरीत आले असल्याचे म्हटले आहे. तिसऱ्या वाचकाच्या मते, "आज जरी कादंबरीत वर्णन केल्याप्रमाणे संपूर्ण समाज अराजकाच्या भोवऱ्यात सापडलेला असला तरी काळाच्या ओघात ही स्थिती लुप्त होऊन जीवनक्रम पूर्ववत सुरू झालेला दिसेल" अशी आशा व्यक्त केली आहे.

जरी ८ वाचकांनी वास्तवाचे यथोचित वर्णन अराजकमध्ये वाचावयास मिळते असे म्हटले असते तरी, त्यांच्यापैकी एका अभिप्रायात नित्याचे हे जीवन सर्वांनीच अनुभवलेले असल्यामुळे त्यात 'नाविन्य' नाही असे म्हटले आहे. आणखी एका अभिप्रायात आजच्या राजकीय, सामाजिक व जातीय गोंधळावर मात करता येण्यासाठी एखादा तोडगा लेखकाने सुचवावयास हवा होता असेही व्यक्त करण्यात आले आहे. यावरून अराजक या कादंबरीचा विषय जरी चित्तस्पर्शी वास्तवावर आधारित असला तरी ही कादंबरी अपूर्ण राहिल्यासारखी वाटते असे काही वाचकांना वाटत असल्याचे दिसते.

'अराजक या शब्दाचा तुम्हाला जाणवलेला अर्थ काय ?' या प्रश्नाला ६३ वाचकांपैकी २३ वाचकांना तो स्पष्ट करता आलेला नाही. कारण, त्यांनी या प्रश्नाला कोणतेही उत्तर दिलेले नाही. उरलेल्या ४० जणांनी अराजक या शब्दाचा जो अर्थ व्यक्त केलेला आहे त्यात विविधता असल्याचे स्पष्टपणे दिसून आले आहे. ही विविधता हेच दर्शविते की, अराजक या शब्दाचा एक समान असा अर्थ सगळ्यांना जाणवलेला नाही. अर्थात ही विविधता किती प्रकारची आहे व एकेक प्रकारचा अर्थ लावणाऱ्यांची संख्या किती आहे हे बघणे आवश्यक ठरेल. यासंबंधीचे जे विवरण तयार करण्यात आले आहे ते खाली दर्शविल्याप्रमाणे आहे.

'अराजक' या शब्दांचा वाचकांना जाणवलेला अर्थ	वाचकांची संख्या
१. सामाजिक अस्थिरता	९
२. समाजाची विस्कटलेली स्थिती	२
३. अनियंत्रित समाज व्यवस्था / गोंधळ	९
४. भ्रष्टाचार	७
५. मूल्यांचा ऱ्हास	२
६. सामाजिक संघर्ष	७
७. स्वतःची असहायता	१
८. मानसिक असतोष	२
९. अतिरेकी वृत्तीतून घडलेला विनाश	१
१०. वाढत जाणारा ताण	१
एकूण–	४०

जरी दहा निरनिराळे अर्थ 'अराजक' या शब्दातून ४० वाचकांना जाणवले असल्याचे वरील विवरणावरून दिसत असले, तरी त्यापैकी काहींमध्ये काही प्रमाणात समानता असल्याचेही दिसून येईल. उदाहरणार्थ 'अनियंत्रित समाजव्यवस्था' या अर्थातून न्याय व नीतीव्यवस्थेचा अभाव सूचित होत असेल तर 'मूल्यांचा ऱ्हास' या अर्थातूनही नैतिक मूल्यांचा अभाव सूचित होतो असे म्हणता येईल. परिणामत: हे वरवर दोन वेगळे वाटणारे अर्थ बऱ्याच प्रमाणात समानता देखील सुचविणारे आहेत असे दिसून येईल. तरीही 'अराजक' या शब्दाच्या वाचकांना जाणवलेल्या अर्थामधील विविधता हेच दर्शविते की, त्यांना या शब्दाचा एक निश्चित किंवा नि:संदिग्ध असा अर्थ जाणवलेला नाही.

२३ वाचकांनी अराजक या शब्दाच्या अर्थाबद्दल काहीच म्हटलेले नसल्याचे यापूर्वीच म्हटलेले आहे. कदाचित त्यांना कोणता ना कोणता तरी अर्थ जाणवलेला असेलही. पण तो निश्चितपणे व्यक्त करणे त्यांना जमले नसावे. म्हणूनच त्यांनी त्याबद्दल कोणतीच प्रतिक्रिया व्यक्त केली नसावी. ते काहीही असले तरी, ४० वाचकांनी आपल्यापरीने अराजक या शब्दाचा अर्थ लावलेला असून २३ जणांनी मात्र त्याबद्दल काही म्हटले नाही हे निश्चित. मग प्रश्न असा उद्भवतो की, ज्यांनी या शब्दाचा अर्थ व्यक्त केलेला नाही ते २३ वाचक, आणि ज्यांनी तो व्यक्त केलेला आहे असे ४० वाचक यांच्या कादंबरीबद्दलच्या प्रतिक्रियांमध्ये काही फरक पडला असू शकतो का ?

ज्या सात विधानांचा उपयोग करून वाचकांना आपल्या प्रतिक्रिया व्यक्त करावयाच्या होत्या. त्यापैकी सातव्या विधानाला ज्या प्रतिक्रिया आलेल्या आहेत त्या प्रतिक्रियांच्या संदर्भात वरील प्रश्नाला कोणते उत्तर मिळते हे बघणे औचित्याचे ठरेल. सातव्या विधानात 'अराजक' ही कादंबरी कोणालाही आवडण्यासारखी आहे' असे व्यक्त करण्यात आलेले आहे. या विधानाशी वाचक कितपत 'सहमत' किंवा 'असहमत' होते हे त्यांना सांगावयाचे होते. हे व्यक्त करण्यासाठी त्यांना संपूर्णपणे सहमत, सहमत, अनिर्णित, असहमत आणि संपूर्णपणे असहमत अशा पाच पर्यायांपैकी कोणताही एक निवडावयाचा होता. या पाच पर्यायांसाठी अनुक्रमे ५, ४, ३, २, व १ असे गुणांक निश्चित केले. याचा अर्थ एखाद्या वाचकाची प्रतिक्रिया 'सहमत' अशी असती तर त्या बद्दल ४ गुणांक देण्यात आले असते. प्रत्येक वाचकाच्या सातव्या विधानाला त्याने दिलेल्या प्रतिक्रियेवरून अशा प्रकारे गुणांक देऊन २३ आणि ४० वाचकांच्या दोन समूहांसाठी सरासरी गुणांक काढता आला असता. याच पद्धतीचा अवलंब करून ज्यांनी 'अराजक' शब्दाचा अर्थ स्पष्ट केला नव्हता असे २३ वाचक, व ज्यांनी या शब्दाचा जो काही अर्थ व्यक्त केला होता असे ४० वाचक अशा दोन समूहांकरिता सातव्या विधानासाठी त्यांच्या प्रतिक्रियांचे सरासरी गुणांक काढले. ते अनुक्रमे ३.४३ व ३.७३ इतके असल्याचे आढळून आले. या दोन सरासरी मूल्यांमधील फरक इतका कमी आहे की, पहिल्या समूहाने 'प्रतिकूल' आणि दुसऱ्या समूहाने 'अनुकूल' प्रतिक्रिया व्यक्त केलेली आहे असे समजण्याचे काहीच कारण नाही. यावरून असे म्हणता येईल की, 'अराजक' या शब्दाचा अर्थ कोणाला व्यक्त करता येवो की न येवो, पण 'अराजक' हे शीर्षक असलेल्या कादंबरीचा वाचकांवर इष्ट तो भावात्मक परिणाम साधण्यात मात्र लेखक यशस्वी झालेला आहे.

अराजक कादंबरीविषयक सर्वेक्षणात वाचकांच्या प्रतिक्रियांचे जे विश्लेषण आतापर्यंत सादर करण्यात आलेले आहे त्यावरून जी माहिती प्राप्त होते ती अशी :

(१) कादंबरीसारख्या कलाकृतींचा आस्वाद घेताना येणारा कलानुभव हा अमूर्त किंवा बौद्धिक स्वरूपाचा नसून तो प्रत्यक्ष जीवनानुभवासारखा असतो.

(२) आजच्या सामाजिक स्थितीचे 'अराजक'मध्ये आलेले वर्णन चित्तस्पर्शी असे असल्याने ही कादंबरी बहुसंख्य वाचकांच्या मनाला भावेल असा कौल वाचकांनी दिलेला आहे.

(३) तथापि, अराजकाच्या विरुद्ध पाहिजे तेवढा आवाज उठवला गेला नसल्याचे जाणवत असल्याने व अशा परिस्थितीवर मात करण्यासाठी तोडगा सुचविला गेला नसल्यामुळे ही कादंबरी अपूर्ण राहते असाही अभिप्राय व्यक्त झालेला आहे.

(४) बहुसंख्य वाचकांची कादंबरीविषयक एकूण प्रतिक्रिया मात्र अनुकूल अशीच आहे व म्हणून सर्वसामान्य वाचकाला ती आवडेल हे उघड आहे.

अर्थात प्रस्तुत सर्वेक्षणाच्या आधारावर कोणताही निष्कर्ष काढण्यापूर्वी जी एक मर्यादा सर्वेक्षणाला पडलेली आहे तिचा उल्लेख करणे अतिशय आवश्यक आहे. वाचकांना प्रत्यक्ष मूळ कादंबरी जशीच्या तशी वाचावयास देण्याऐवजी त्यातील महत्त्वाच्या व्यक्तिरेखा व त्यांच्याशी संबंधित घटनांचे एक संक्षिप्त धावते वर्णन वाचावयास देण्यात आले होते ही ती मर्यादा होय. अर्थात एका ठराविक वेळेच्या आत प्रत्येकाला संपूर्ण कादंबरी वाचावयास लावून प्रतिक्रिया नोंदवावयास लावणे व सर्वेक्षण पूर्ण करणे हे किती अवघड होते हे यापूर्वीच नमूद केलेले आहे. शिवाय कादंबरीच्या स्वरूपाची पूर्ण कल्पना मिळावी अशी खबरदारी घेऊनच सारांशरूपी मजकूर तयार केला होता. एवढेच नव्हे तर 'अराजक या कादंबरीचे सार वाचल्यावर मूळ कादंबरी पूर्णपणे वाचावी अशी उत्सुकता निर्माण होते' हे विधान वाचकांच्या प्रतिक्रिया जाणून घेताना मुद्दाम त्यांना देण्यात येणाऱ्या प्रश्नावलीत समाविष्ट करण्यात आले होते. त्यांना वाचावयास देण्यात आलेला सारांश व मूळ कादंबरी यांच्यात जो संबंध आहे याची जाणीव त्यांना पुन: एकदा करून देणे हाही या विधानामागील उद्देश होता. त्यांनीही याची जाणीव ठेवून आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या आणि महत्त्वाचे असे की, 'मूळ कादंबरी आम्हाला वाचायला न मिळाल्याने आम्ही प्रतिक्रिया व्यक्त करू शकणार नाही' असे कोणीही म्हटलेले नाही. हे लक्षात घेता, प्रस्तुत सर्वेक्षणातून जी माहिती प्राप्त झालेली आहे ती वाचकांचा कलानुभव व कादंबरीविषयीच्या भावात्मक प्रतिक्रिया या संदर्भात महत्त्वपूर्ण ठरावी असा विश्वास वाटतो. ■

– मानसशास्त्र विभाग
नागपूर विद्यापीठ, कॅंपस्,
नागपूर

वाचकांनो,

युगवाणीचा अंक वाचल्यानंतर त्यातल्या आपणास बऱ्या–वाईट वाटलेल्या बाबींवर नि:संकोचपणे आपल्या प्रतिक्रिया संपादकास कळवा. संपादकास आपल्या प्रतिक्रिया तोंडी कळविण्याकरिता कृपया राखून ठेवू नका. त्या मुक्तपणे इतरांकरताही वाटून द्या. युगवाणीस कळवा.

त्या प्रकाशित करणे युगवाणीस आवडेल. लक्षात घ्या की आपल्या या प्रतिक्रिया वर्तमान वाङ्मयीन संस्कृतीचे स्पंदन आहेत.


॥ संशोधन ॥

दोन शिलाक्षरपट्ट


श्रीपाद केशव चितळे

अकोला जिल्ह्याच्या अभ्यास दौऱ्यावर असताना वार्शी टाकळी येथील एका मध्ययुगीन मंदिरात (स्तंभावर) मला काही प्राचीन शिलाक्षरे आढळली. प्रथमदृष्टीतच हे अक्षर यादवकालीन आहे हे लक्षात आले. येथे अशी काही शिलाक्षरे असल्याचे माझ्यातरी ऐकिवात नव्हते, काही ज्येष्ठ तज्ज्ञांशीही चर्चा केल्यानंतर असे लक्षात आले, की ही अक्षरे अप्रसिद्धच असावीत. तथापी हेही शक्य आहे, की कुणा पूर्वसुरींच्या नोंदीत ही असतीलही, तरी विदर्भाच्या मध्ययुगीन इतिहासावर ही अक्षरे नक्कीच अधिक प्रकाश टाकू शकतात. तज्ज्ञ मंडळीचे इकडे त्वरीत लक्ष जावे हाच ह्या लघुलेखाचा हेतू आहे.

अकोला जिल्ह्यातील वार्शी–टाकळी मंदिराबद्दल खूप ऐकले होते, म्हणून ती अभ्यासण्यासाठी तेथे गेलो. तेथील दोन अतीव सुंदर व रेखीव मंदिराबद्दल काही लिहायचे म्हटले तरी तो एक स्वतंत्र लेख होईल. ह्या हेमाडपंथी मंदिरांबद्दल बरीच माहिती प्रसिद्ध झालेली असल्याने प्रस्तुत लेखात त्याचे प्रयोजनच नाही. शिलालेखासंबंधीची माहिती मात्र नवीनच वाटल्याने ती देण्याचा मी प्रयत्न केला आहे. ह्या दोन मंदिरांपैकी कालिका मंदिरातील प्रसिद्ध शिलालेख (Epigraph) म. म. कै. डॉ. वा वि. मिराशींनी संपादित केला व प्रसिद्धही केला. (पहा – वार्शी–टाकळी शिलालेख शक. १९०८ हिरालाल सूची क्र. १५१ मिराशी Epi–Ind–XXI 127 ग्रंथ / मध्यप्रदेश पुरातत्व की रूपरेखा– डॉ. मो. गं. दीक्षित / पृष्ठ क्र. ८६) मात्रह्याच देवळाच्या मागे असलेल्या खोलेश्वर शिव–मंदिराच्या दर्शनीय स्तंभावर अगदी समोरच्या बाजूला, जमिनीपासून केवळ ५ फुटांवर मला काही शिलाक्षरे कोरली असल्याचे लक्षात आले. स्तंभाच्या चारीही दर्शनी बाजूवर रेखांकित चौकोन आखल्याचे स्पष्ट दिसते, याचाच अर्थ असा की चारीही बाजूंवर काही तरी शिलाक्षरे होती, पण आजमितीस मात्र फक्त समोरच्याच बाजूंवर ती अवशिष्ट आहेत.



[देवालयाच्या स्तंभावरील शिलाक्षरे]



[प्रवेश द्वारावरील फरशीवरील शिलाक्षरे]

देवनागरी लिपीतील ही ७ अक्षरे असून त्याचे वाचन मी, अ नं त ध ज यो गी किंवा अ च्यू त ध ज यो गी (जोगी) असे केले आहे. धनुष्याचा 'ध' हे अक्षर चक्क यादवकालीन दिसते व रामटेकच्या केवलनृसिंह मंदिरातील द्वाराच्या चौकटीवरील शिलालेखातील "ध" शी साम्य दाखविते. (माझाच लेख – युगवाणी, ए–मे–जू–९० पहावा) शिलाक्षरातील पहिले अक्षर मात्र


"अ" हे असून आजच्या हिंदी भाषेतील अ वर्णाप्रमाणे ते (लिपी – नागरीच) दिसते. यातील अक्षरवटिकेवरून (style of scripts) हा शिलालेख यादवकालीन असावा. विशेषनामाचा वैशिष्टयपूर्ण उल्लेख असलेला तो आहे. आता "धजयोगी" हे नाव नाथसंप्रदायाशी जवळीक दर्शविते. ही अक्षरे अशांतधजयोगी, अलिप्त धजयोगी, अतृष्ट धजयोगी अशी असावीत का ? पण अशी निंदाजनक किंवा मर्मदर्शनीय, विशेषणयुक्त ती असूच शकत नाही, उलट अशा योग्यांची नावे गौरवास्पद अशीच असतात म्हणून हे वाचन 'अनंतधजयोगी' किंवा 'अच्यूतधजयोगी' असेच असणे संभवनीय वाटते. पण दुसऱ्या अक्षरावर अनुस्वार अस्पष्ट दिसत असल्याने शब्द अनंत च असावा अच्यूत नव्हे ! असाच "धज" शब्द चंद्रपूर जिल्ह्यातील मार्कण्डाच्या प्रसिद्ध देवालयात आढळतो तो "मगरध्वज–जोगी ७००" असा शुद्ध स्वरूपात आला आहे. कै. डॉ. मिराशी म्हणतात की ७०० हा आकडा संवत्सराचा (कालोल्लेख) द्योतक नसून हा योगी आपल्या ७०० शिष्यासह विविध पवित्र ठिकाणांना भेट देत असे, ह्या संख्यात्मक संदर्भात आहे (पहा : विदर्भ संशोधन मंडळ, वार्षिक – १९७३ –'मार्कंडी येथील देवळाचा काळ') असे कोरीव लेख मध्यप्रदेशात छत्तीसगडात वस्तर– पोरेनार, कवर्धा-बोरमदेव, जवलपूर–बिल्हरी, नेमाड–मांधाता, मंडला–अमरकंटक व खजूराहो येथेही आढळतात. म्हणजेच त्या काळात (इ. स. चे ११ वे शतक / डॉ. शां. भा. देव) ह्या क्षेत्रात हा नाथसंप्रदाय व त्याचे पाईक यांचा प्रभाव दिसतो; व 'ध' हे अक्षरही त्याला उपोद्बलक पुरावाच ठरते. डॉ. मिराशींच्या मताने मात्र ही मार्कण्डीची देवळे इ. स. च्या आठव्या शतकातील आहेत. त्या वादात शिरण्याचे येथे कारण नाही, फक्त एक संदर्भ एवढाच त्याचा हेतू ! आपला अनंतधजयोगी (शब्द थोडा अशुद्ध वाटतो. तो ध्वजयोगी असा असायला हवा) मात्र कुणीतरी नाथसंप्रदायी साधूपुरुष असून साधारण इ. स. च्या ११–१२ व्या शतकात तो येथे निवासाला असावा असे दिसते. हे नाव केवळ तज्ञांच्या नजरेत यावे व अधिक अभ्यास त्यावर व्हावा हीच इच्छा.

तसेच प्रवेशद्वारावर एका अर्धवट गाडलेल्या शिळेवरही दोन नावे अस्पष्ट व वाचनीय आहेत त्याचेही वाचन मी "अनंतयोधीराणा गोपालयो धीराणा !" असे केले आहे, पण हे गुरुशिष्य होते, की गुरूबंधू किंवा कसे ? हे मात्र आज सांगता येत नाही. बरे योगी हा शब्द येथे मात्र अशुद्ध स्वरुपात "योधी" असा आला आहे, अर्थातच ही उभय नावे नंतरच्या कालखंडातील असावीत. पण त्यांचा संबंध मात्र उपरनिर्दिष्ट "अनंतधजयोग्याशी" दिसतो हे उघड आहे. पण शेवटची अक्षरे "राणा" अशी नृपसदृश नसून "योधीराज" अशी असावीत. राणा हा शब्द आकारान्त पुल्लिंगी असून योग्यांना तो जुळत नाही. तेव्हा तो शब्द "ज्ञानराज" सारखा योधी (योगी) "राज" असा असावा व ते योग्यांच्या गौरवाचे विशेषणच वाटते. एकूणच ही शिलाक्षरे विदर्भाच्या मध्ययुगीन इतिहासावर अधिक प्रकाश टाकू शकतात. तज्ज्ञांनी येथे भेट देऊन, या अक्षरांचा अधिक अभ्यास, करणे क्रमप्राप्त आहे. या शिलाक्षरांच्या अभ्यासात मला गुरुवर्य प्रा. म. शं. वाबगावकर सरांचे सहकार्य मिळाले, त्यांचा मी अतिशय आभारी आहे.

: २ :

असाच एक दुसरा संदर्भ अकोला जिल्ह्यातच "डव्हा" ह्या गावी आढळला. मालेगाव तालुक्यातील ह्या नाथसंप्रदायी स्थानाबद्दलची माहिती सर्वश्रुतच आहे. येथील श्री नंगेनाथ महाराजांचा मठ, अर्वाचीन, देवालय, धर्मशाळा, विश्वमंदिर, महाराजांची समाधी, देवतांच्या अर्वाचीन प्रतिमा, १२ ज्योतिर्लिंगांचे समाधी प्रदक्षिणा मार्गावरचे देवकोषे आदीबद्दलची माहिती येथे देण्याचे कारण नाही. पण शाबरी लिपीतील अत्यंत महत्त्वपूर्ण गुप्त संदेशाची चर्चा मात्र अवास्तव ठरणार नाही असे वाटते. ते नाथसंप्रदायाशी संबंधीतही आहे. म्हणून अभ्यासकांसाठी येथे देत आहे. डव्हा हे गाव संशोधकांना विशेषतः पुराभिलेख विद्या

तज्ज्ञांना (Epigraphist's) एक आव्हानच आहे. किंबहुना हे मंदिर ह्या गुप्त संदेशासाठीच (शावरी लिपी) प्रसिद्ध आहे. ह्या ठिकाणी नगेनाथ महाराजांचा एक गुप्त संदेश आढळतो. एका ठिकाणी तर तो काचेत फ्रेम करूनही ठेवला आहे, इतकेच नव्हे तर मुख्य गर्भगृहाच्या प्रवेशद्वारावर व प्रत्यक्ष ब्रह्मदेवाच्या अर्वाचीन संगमरवरी प्रतिमेवरही (भालप्रदेशी) ह्या गुप्त लिपीत काहीतरी लिहिलेले आहे. हे लिखाण जरी तुलनेत नवीन असले तरी लिखित परंपरा मात्र प्राचीन वाटते. संदेशात एकूण ७ ओळी असून, २ ओळी लहान आहेत तर ५ ओळी किंचित दीर्घ आहेत. प्रत्येक शब्दानंतर मध्यभागी पूर्णविराम सादृश लहान एक चिन्ह दिसते (सोबतचे चित्र पहावे) पण शेवटी मात्र देवनागरी लिपीत ' मछींद्रनाथ " असा स्पष्ट उल्लेख आहे. बऱ्याच वर्षापूर्वी हा संदेश कुणीतरी वाचावा, त्यातील गुप्त अर्थ उलगडावा म्हणून या संस्थानाने एक मोठे बक्षिस जाहीर केल्याचे समजले.



डव्हाच्या (जि. अकोला, ता. मालेगाव) नाथसंप्रदाय मंदिरातील हाच तो शावरी लिपीतील दिव्यसंदेश.

हा संदेश शावरी लिपीत असून अशा लिपीत गुप्त संदेश देण्याची प्रथा होती असे दिसते. वरच्या ओळीत काहीतरी शुभ-संदेशात्मक असे वचन असावे (जसे श्रीगणेशायनमः किंवा ॐ नमःशिवाय असे) या शावर, मंत्रावर प्रा. डॉ. वि. वा. करंबेळकरांनी (पहा-विदर्भ संशोधन मंडळ-वार्षिक–१९५९) एक दीर्घ लेख लिहिलेला आहे, हा मंत्र अत्यंत प्रभावशाली असून त्याचे वाचन करण्यासाठी गुरु–शिष्य परंपरा ज्ञात असलेल्या भारतातील इतर नाथ संप्रदायी संस्थानात ह्या लिपीचा शोध घेतला पाहिजे. ज्या अर्थी शेवटी " मछींद्रनाथ " असा स्पष्ट उल्लेख आहे, त्या अर्थी हा मंत्र त्यांनीच सिद्ध केला असला पाहिजे असे मी तरी समजतो व परंपरेने तो आजतागायत अखंडपणे चालत आला असावा. त्याचा शोध परंपरेने तिबेटमध्ये किंवा (त्रिविष्टप) हिमालयातील काही आश्रमात घ्यायला हवा. कारण मछीन्द्रनाथ म्हणजे तिबेटी लूईपा होते हे सर्वश्रुतच आहे, व शबरीपा यांचे आधी ते होऊन गेलेत असे दिसते. शवरीपा हे सिद्ध नागार्जुनाचे शिष्य असल्याचे सर्वश्रुत व सर्वमान्य आहेच. म्हणजेच ही लिपी केवळ गुरु–शिष्य परंपरेनेच वाचता येईल तथापी काही शब्द कृपाछत्र–कृपाछाया, कृपावंत असे असावेत. डव्हाच्या शाबरी मंत्रावर माझा अभ्यास व संशोधन सुरू आहेच. एकदा या संदेशाचे वाचन व्हायला हवे व इतर अभ्यासकांचेही लक्ष याकडे वेधले जावे म्हणून हा लेखन प्रपंच ! ■

कोठी रोड / महाल / नागपूर

ग्रं थि की

'अग्निपुष्प' : एक अनोखा अनुभव

विश्वेश्वर सावदेकर

रेखा वैजल यांच्या नावावर एकूण पाच पुस्तके जमा असली, आणि त्यातल्या 'स्वप्नस्थ 'ला ८९ ' चा मोकाशी पुरस्कार प्राप्त झालेला असला, तरी माझ्या माहितीप्रमाणे 'अग्निपुष्प ' ही त्यांची पहिलीच विज्ञानकादंबरी आहे. या कादंबरीला मराठवाडा साहित्य परिषदेचा नरहर कुरूंदकर पुरस्कार (१९९०) मिळाल्याचे वाचनात आल्यामुळे मनात एक उत्सुकता होती. 'अग्निपुष्प ' वाचून झाल्यावर एक वेगळ्या प्रकारचे, वेगळ्या विषयावरचे चांगले कथानक वाचल्याचा आनंद झाला. त्या आनंदाच्या भरात मी लेखिकेला अगदी मनःपूर्वक अभिनंदनाचे पत्र-देखील पाठवून दिले.

'अग्निपुष्प 'ही अणुयुद्धाच्या पार्श्वभूमीवरील एक छोटेखानी कादंबरी आहे. या कादंबरीला 'विज्ञान कादंबरी ' म्हणायचे का, या प्रश्नाला माझे उत्तर होकारार्थी आहे, कारण विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्यामुळे घडून येणाऱ्या बदलांना मिळणाऱ्या मानवी प्रतिसादांचे चित्रण करणारी कथा–कादंबरी ही माझ्या मते 'ललित विज्ञान ' अथवा सायन्स फिक्शन या सदरात येते. या कथानकात अणुबॉम्बने बेचिराख झालेले जग ही वैज्ञानिक प्रगतीच्या आणि राक्षसी महत्त्वाकांक्षेच्या अतिरेकाची अपरिहार्य परिणती आहे. या उद्‌ध्वस्त जगात आशेचा किरण घेऊन जगणारी, ध्येयवाद जोपासणारी वीरेनजींसारखी माणसे आहेत, त्याच प्रमाणे विदारक सत्याची भयाणता असह्य झाल्याने प्रत्येक गोष्टीला जास्तीत जास्त विरोध करणारा निखिल आहे. यांच्या-बरोबरच जॅकसन, योगिनी, मेरी यांच्या प्रतिसादांचे चित्रण वैज्ञानिक पार्श्वभूमीवर मांडणारे 'अग्निपुष्प 'चे कथानक आहे. म्हणून ही ललित विज्ञानकादंबरी आहे. अर्थात लेखिकेचा असा दावा नाही.

प्रस्तुत कादंबरीचा काळ हा अणुयुद्ध होऊन गेल्यानंतरचा काळ आहे. या काळात सर्वत्र बेचिराख झालेली शहरे आहेत. निसर्ग आपला धर्म विसरलेला आहे. सगळीकडे हाहाःकार माजला आहे. पृथ्वीवरील सर्व नकाशे बदलले आहेत. देशांच्या सीमारेषा पुसल्या गेल्या आहेत, या भयंकर संहारात वीरेनजी, निखिल, योगिनी, मेरी यांच्यासारखी काही माणसे शिल्लक आहेत. प्राणी, पक्षी, देश, वनस्पती यांच्यातले भेद संपून फक्त पृथ्वीवरचे सजीव एवढेच त्यांचे अस्तित्व शिल्लक आहे.

प्रस्तुत कथानकातील विरेनजी हे एक आशावादी, स्वप्न जपणारे, परिस्थितीशी झगडणारे व्यक्तिमत्त्व आहे. अणुयुद्धात वातावरणात पसरलेल्या अणूधुळीमुळे सूर्य अंधूक झाला आहे. त्याच्या मळकट, भुरकट प्रकाशात विरेनजींची आपल्या निवडक सहकाऱ्यांसह जगण्यासाठी आणि जगवण्या-साठी धडपड सुरू आहे. सुरक्षिततेसाठी त्यांनी एक 'सेफ बेल्ट ' शोधून काढला आहे. जॅक्सन हा वैमानिक आपल्या विमानातून सगळीकडे शोध घेऊन जीवंत राहिलेल्या जखमींना या सुरक्षित पट्ट्यात घेऊन येतो आहे. विरेनजी, आपली पत्नी योगिनी आणि मेरी यांच्या मदतीने या जखमींवर

शक्य ते उपचार करीत आहेत. त्यांच्या स्वतःच्याच फुफ्फुसांवर अणुकिरणांचा परिणाम झालेला आहे. रेडिएशनची शिकार झालेल्या या विरेनजींचे एक स्वप्न आहे. इतक्या भयानक विध्वंसानंतरही त्यांना या पृथ्वीवर एक निरोगी मूल जन्माला आलेले बघायचे आहे.

निखिल हा या 'सेफ बेल्ट' मधला निराशावादी आणि उग्र तरुण आहे. विरेनचे स्वप्न म्हणजे निव्वळ मूर्खपणा आहे असे याचे मत आहे. जखमींमधल्या रॉड्रिक या अमेरिकन माणसाची कहाणी फार विदारक आहे. अणुयुद्धाच्या परिणामांची कथानकातील सर्वच वर्णने विलक्षण परिणामकारक आहेत. अनिकेत हा संशोधक, जेम्स नावाचा कवी, मोलोडेव्ह, वगैरे बरीच मंडळी विरेनजींबरोबर आहेत.

अणुयुद्धानंतर आलेला पहिला पाउस, या पावसामुळे उद्भवणारे संभाव्य धोके, ते टाळण्यासाठी विरेनजी, रॉड्रिक यांनी केलेली धावपळ, पहिल्या पावसाने अणूधूळ खाली बसून स्वच्छ झालेला सूर्य, त्याचे गायत्री मंत्राने स्वागत, विरेनजींच्या स्वप्नपूर्तीसाठी निखिल आणि मेरी यांचा साजरा होणारा विवाह, छोटचा बालिकेचे सेफबेल्टमध्ये आगमन यासारखे अनेक प्रसंग कथानकात आहेत.

'अग्निपुष्प'चे कथानक ही विरेनजी या धीरोदात्त पुरुषाने अगदी प्रतिकूल परिस्थितीवर मात करून जोपासलेल्या स्वप्नाची कहाणी आहे. प्रतिकूल निसर्गाविरूद्ध असलेल्या या लढाईत वीरेनजी एकटे नाहीत. एका कृषीशास्त्रज्ञाने जीवापाड सांभाळून ठेवलेली बी-बियाण्यांची पुरचुंडी मरताना वीरेनजींच्या स्वाधीन केली आहे. या बीजांपासून पुन्हा निरोगी रोपांना सुरुवात झाली आहे.

अगदी अनपेक्षितपणे अवकाशातून उतरलेल्या हेलेना आणि केटी या दोन तरुणींनी वीरेनजींच्या स्वप्नाला आणि एकूण कथानकाला एक वेगळी दिशा दिली आहे. अनुक्रमे रसायनशास्त्रज्ञ आणि डॉक्टर असलेल्या या दोन निरोगी तरुण स्त्रिया अव्यंग मानवाला जन्म देऊ शकतील कां ? पण त्यासाठी त्यांचा पिताही निरोगी हवा. या ठिकाणी 'अग्निपुष्प'चे कथानक आणखी एक वळण घेते. निरोगी बालकाच्या निर्मितीसाठी आवश्यक असलेल्या स्पर्म बँकेचा शोध घेतला जातो, हेलेना आणि केटी यांच्यात कृत्रिम गर्भधारणा केली जाते.

प्रत्यक्ष बालकाचा जन्म आणि वीरेनजींची ढासळणारी प्रकृती यांच्यात संघर्ष सुरू होतो. शेवटी वीरेनजींचे स्वप्न पूर्ण होते की नाही ? निरोगी बालक जन्माला येते की नाही. हे कळण्यासाठी 'अग्निपुष्प' प्रत्यक्ष वाचणेच अधिक श्रेयस्कर आहे. मनावर कायमचा ठसा उमटविणारे हे कथानक विलक्षण प्रभावी आहे. लेखिकेची भाषा अतिशय समृद्ध आहे. निराश झालेल्या लोकांचे संवाद. धर्माची परिभाषा, वीरेनजींच्या चरित्राची एकूण निर्मिती यातून लेखिकेचे भाषा-सामर्थ्य जाणवते.

देखणे मुखपृष्ठ ही 'अग्निपुष्प'ची जमेची बाजू आहे. अणुयुद्धाच्या पार्श्वभूमीवर मराठीत विज्ञानकथा नगण्य आहेत. अरुण साधू, सुबोध जावडेकर आदिच्या कथांचा या संदर्भात उल्लेख करता येईल. या पार्श्वभूमीवर एक वेगळ्या विषयावरील प्रभावी विज्ञानकादंबरी मराठी वाचकांना सादर केल्याबद्दल मी लेखिकेचे मनापासून अभिनंदन करतो. त्यांच्याबद्दल वाढलेल्या अपेक्षांची पूर्ती होण्यासाठी त्यांना शुभेच्छा देतो आणि 'अग्निपुष्प ला देखण्या स्वरूपात प्रकाशात आणल्याबद्दल 'साकेत'चे आभार मानतो.

'अग्निपुष्प'
लेखिका / रेखा बैजल
प्रकाशक / साकेत प्रकान, औरंगाबाद
(प. आ./जाने. ८९,) मूल्य-४० रु./पृ. सं. १३१

झेलझपाट : रसिक मनाचा झेल घेऊन त्याला झपाटून टाकणारी कादंबरी

मनोहर तल्हार

डॉ. मधुकर वाकोडे हे एक लोकवाङ्मयाचे गाढे अभ्यासक आहेत. कवी आहेत – कथाकारही आहेत. आता 'झेल झपाट' ही कादंबरी लिहून ते कादंबरीकार म्हणून नावारूपास आले आहेत. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या १९८८ सालच्या ह. ना. आपटे पारितोषिकाने तर या कादंबरीच्या यशावर शिक्कामोर्तबही केले आहे; ही विदर्भाकरिता अत्यंत गौरवाची बाब आहे. गेल्या चोवीस-पंचवीस वर्षांच्या दीर्घ कालावधीत विदर्भात एकही लक्षवेधी कादंबरी निर्माण झाली नव्हती. विदर्भातल्या कादंबरीलेखनाची ही कोंडी फोडली ती बाबाराव मुसळे यांच्या 'हल्या हल्या दुदू दे' या कादंबरीने. नंतर श्री. पुरुषोत्तम बोरकरांची 'मेड इन इंडिया' डॉ. मधुकर वाकोडे यांची 'झेलझपाट' आणि डॉ. रवीन्द्र शोभणे यांची 'रक्तध्रुव' या कादंबऱ्या लक्षवेधी ठरल्यात. या चारही नव्या दमाच्या कादंबऱ्या विषय, शैली आणि रूपबंधाच्या दृष्टीने आगळ्या वेगळ्या आहेत हे त्यांचे वैशिष्टय.

डॉ. मधुकर वाकोडे यांची 'झेलझपाट' एका अस्पर्शीत जीवनाचे-आदिवासी कोरकू–जमातीचे अगदी समरसून दर्शन घडविते. आदिवासी कोरकूंचे दरिद्री जीवन, त्यांच्या भोळ्या भावड्या–शहरवासीयातील चतऱ्या व लबाड लोकांच्या व्यवहाराचा त्यांच्या स्वभावात न उतरलेला अंश म्हणून अनाडी असलेल्या या कोरकूंचा पुरेपूर फायदा घेणारे ! आधीच फाटक्या संसाराची फाटकी लक्तरे अंगावर असलेल्यांना ते पुरेपूर नागवतात. त्यांच्या जवळ असलेले जे पोटापुरतेही नसते ते लुबाडतात. आणि हे कष्टाळू कोरकू अंगात पुरेशी रग असूनही गरिबीमुळे–अज्ञानामुळे भित्रे ठरतात... लाचार होतात. त्यांच्या जीवनाचे करुण भीषणनाटय अतिशय समरसून, लालित्यपूर्ण कलात्मक–काव्यात्मक शैलीतून डॉ. मधुकर वाकोडे 'झेलझपाट' या छोटेखानी कादंबरीत देखण्या रूपबंधात बंदिस्त करतात. लोकवाङ्मयाच्या अभ्यासामुळे उपजत लाभलेली अभ्यासकाची बारीक नजर, लोकसंगीताची जाण जेव्हा हे जीवनदर्शन घडविते ते लालित्यपूर्ण–काव्यात्मकतेचे लेणे लेवून सौंदर्यपूर्ण होते...एखाद्या रूपगर्वितेसारखे, थोर रशियन कादंबरीकार इवान तुर्गेनेव याच्या 'आश्या', 'पहिले प्रेम' व इतर कादंबऱ्यांच्या मालिकेत ही कादंबरी शोभून दिसावी इतकी 'देखणी' झालेली आहे.

'झेलझपाट' ही फुलय आणि केरू यांची केवळ प्रेमकथा नाही. आदिवासी कोरकूंच्या जीवनाचे वास्तव दर्शन आहे. स्वार्थापोटी या गरीब–कष्टाळू पण अनाडी लोकांना नागविणारे हलकट जांगडी-त्यांच्या निर्दय कारवायांना उत येतो तो कोरकूंचे उत्थान होण्याच्या सद्‌भावनेने स्थापन झालेल्या सोसायटयातून सरकारी धोरणाचा बट्टाबोळ करणाऱ्यांच्या...स्वार्थी लोकांच्या कारवायांमुळे. परतवाडयाचा रहिमसेठ, मण्यारीवाला कासम, वल्लभदास खंडेलवाल, बी. डी. ओ. कॅफो आदी या कान असून बहिरे असणाऱ्या, डोळे असून आंधळे असणाऱ्या, अतोनात कष्ट उपसूनही उपाशी राहणाऱ्या आदिवासींना नागवितात. त्यांच्या अंगावरल्या उरल्यासुरल्या चिंध्याही उतरवून ठेवून उरलेल्या स्त्री शरीराचेही लचके तोडतात. कासम मण्यारीवाला फुलयवर टपून असतो तर ज्ञानदानासाठी आलेली रूपसुंदर शिक्षिका सरकारी अधिकाऱ्यांचे खाद्य होते. देवीदर्शनाच्या पवित्र समारंभात 'बोकड बळी जाणार होते कोरकूंच्या हातून...आणि कोरकू जाणार होते जांगडींच्या हातून.' बळी जाणाऱ्या बोकडाला मरणाची कल्पना नसते तर या कोरकूंना बळी देणाऱ्या या

जांयडयांची-त्यांच्या स्वार्थाची कोरकूंना कल्पना नसते. सरळ साधे कष्टाळू जीवन जगणारे कोरकू तसे आपल्या दरिद्री जीवनात लुबाडणूक होऊनही सुखी राहतात. सुखी राहण्याचा प्रयत्न करतात. मोह फुलाच्या पाण्यात पोहणारी मासोळी म्हणजे कोरकू. अशा जमातीत जन्माला आलेली तेज:पुंज रूपवती फुलय आणि मॅट्रीक पर्यंत शिकून आलेला तिचा मंतर केरू यांची ही भावकथा मनाला मोहून टाकते. फुलयचा बाप मोपा, आई चंतू, तिची मैत्रिण मालाय, केरू, केरूचा बाप तुमला पटेल, उत्तम तलाठी, त्याचा भाऊ विठू, संपत चौकीदार, डॉ. टिकेकर, अंगणवाडीची शिक्षिका, डॉ. टिकेकरांचा सहाय्यक नानू, रहिमसेठ, कासम मण्यारीवाला, वल्लभदास खंडेलवाल, बी. डी. ओ. सभापती आणि स्त्रीसुखासाठी वखवखलेले त्यांचे साथीदार, सैल वागणारी जासो, तिच्या शरीराला... स्तनांना झोंबणारे गवंडी, शंकर गवळी, कोरकू असूनही कोरकूंना नागविणाऱ्यांना मदत करणारा वुईके, सज्जन असणारा टेमरेकाका या पात्राशिवाय आणखी एक पात्र आहे आणि ते म्हणजे निसर्ग. बदलल्या ऋतुमानाप्रमाणे काव्यात्म शैलीतले निसर्गाचे बहारदार वर्णन या कादंबरीचा एक अविभाज्य भाग झाला आहे.

कोरकू आदिवासींच्या जीवनाचं यथार्थ चित्रण करणारी ही कादंबरी आकाराने लहान असली तरी आशयाने फार मोठी आहे. तारुवादा, सिपना नदी, गौलखंडचा बाजार, गवळी ढाणा आणि कोरकू ढाणा, त्यांची वैशिष्ट्ये, परिसरातला निसर्ग, ऋतुमानाप्रमाणे बदलणाऱ्या ऋतूंची लालित्य-पूर्ण शैलीतील वर्णने, केरू, फुलय, जासो, मालाय, रहिमसेठ, कासम, संपत इत्यादी पात्रांची स्वभाव वैशिष्ट्ये व त्यांच्या रंगरूपातून व्यक्त होणारी मनोहारी वर्णने अचूक आणि मोजक्या शब्दातून साकार करण्याची हातोटी, फुलय-केरू यांच्यातील भावबंध व्यक्त करणारे प्रसंग...सारेच कलात्मक...काव्यपूर्ण. एखाद्या वेलीखाली वेलीवरली लगडलेली फुले, त्यांचा सडा पडावा तसा पानापानावर प्रतिमांचा...अचूक प्रतिमांचा सडा ! क्वचित काही प्रतिमा दोनदोनदा वापरल्याने थोडे खटकते इतकेच. कोरकू जीवनातील सारे बारकावे...त्यांचे कोरकू भाषेतील संवाद त्या संवादाच्या मराठी अर्थासह आल्याने एक नवीनच आयाम या कादंबरीला लाभलेला आहे.

प्रस्तुत कादंबरीतील एक उपकथानक-अंगणवाडीची शिक्षिका व डॉ. टिकेकरांचे प्रकरण वरवर उपरे व तुकडा जोडल्यासारखे वाटत असले तरी केरूकेचा फुलय यांच्या शोकात्मिक ताण कमी करण्यासाठीच त्याचे प्रयोजन नाही. तर अशा आडगावच्या शिक्षिकेचा अधिकारी वर्ग कसा वापर करतात याचे दिग्दर्शनही करणारे आहे. म्हाताऱ्या गाईवरून शिक्षिकेत झालेला बदल पटणारा नाही. आपला 'वापर' तिने या पूर्वी का करू द्यावा ? हा प्रश्न उभा राहतो.

'झेल झपाट' ही अंतर्बाह्य देखणी आहे हे मात्र निर्विवाद. ■

झेलझपाट / मधुकर वाकोडे
मूल्य ४० रु./ पृष्ठे १००
देशमुख आणि कंपनी / पुणे-३०

लेखकांना विनंती

साहित्य पाठविताना त्यावर संपूर्ण नाव व संपूर्ण पत्ता लिहिणे आवश्यक आहे. नाव व पत्ता लिहिलेले आणि पुरेसे पोस्टेज लावलेले पाकीट लेखनासोबत असेल तरच साहित्य परत पाठविणे शक्य होईल.

वा | च | की | य

मा. श्रीपाद भालचंद्र जोशी
स. न. वि. वि.

युगवाणी जुलै '९१ चा अंक मिळाला. भरगच्च अंकात वाङ्‌मयीन नियतकालिक विकास परिषद निरीक्षण व लेख विस्तृत छापल्याबद्दल हार्दिक अभिनंदन. हा अंक वाङ्‌मयीन नियतकालिकांच्या इतिहासात संग्राह्य ठरणार आहे. शासनाने नियतकालिकांना मदत देण्यासाठी समिती नेमण्याची घोषणा करून एका दृष्टीने आपल्या परिषदेची दखल घेतली आहे हे सिद्ध झाले आहे. आता याचा पाठपुरावा होणे गरजेचे आहे.

डॉ. भा. व्यं. गिरधारी
प्राचार्य, कला व वाणिज्य महाविद्यालय, जव्हार (जि. ठाणे)

स. न. वि. वि.

"युगवाणी"चा जुलै १९९१ चा अंक मिळाला. अगत्यपूर्वक पाठविल्याबद्दल मी आपल्या अत्यंत आभारी आहे.

जुलै '९१ चा अंक भरघोस आहे. आपल्या यशस्वी संपादनाबद्दल अभिनंदन आणि भावी वाटचालीसाठी शुभेच्छा.

डॉ. वसंत स. जोशी
१७३०, ई. सहावी गल्ली, राजारामपुरी, कोल्हापूर

स. न. वि. वि.

आपण अगत्यपूर्वक पाठविलेल्या "युगवाणी"चा जुलै '९१ अंक पोहचला. अत्यंत आभारी आहे. प्रस्तुत अक "युगवाणी"च्या परंपरेला साजेसा आहे. संग्राह्य व वाचनीय आहे. अभिनदन !

आपल्या व आपल्या सहकाऱ्यांच्या धडपडीला माझ्या हार्दिक शुभेच्छा.

माधव कोंडविलकर
मु. पो. देवरुख, जि. रत्नागिरी

स. न. वि. वि.

'युगवाणी'चा जुलै १९९१ चा अंक मिळाला. सुबक अंक काढल्याबद्दल मन:पूर्वक धन्यवाद !

ज. बा. कुळकर्णी
१५, हरिदास निवास, रामनगर, डोंबिवली (पूर्व)

स. न. वि. वि.

माझा 'युगवाणी'चा परिचय गुरुवर्य डॉ. द. भि. कुलकर्णी यांचेमुळे झाला. तेव्हापासून मी युगवाणी-चा वाचक व लेखक आहे. गुरुवर्य डॉ. वि. भि. कोलते, प्रा. म. शं. वाबगावकर, डॉ. म. त्र्यं. सहस्रबुद्धे,

यांच्या प्रोत्साहनामुळेही मी युगवाणीचा विदर्भात प्रचारकही झालो. यावेळेचा अंक हा जवळ जवळ वार्षिकच ठरले आहे. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत अनेक अडचणी, विवंचना अडथळे असतांना देखील नैराश्याने न ग्रासता नेटाने, संयमाने व दूरदृष्टीने आपण ह्या साहित्यरथाचे सारथ्य केले, त्याबद्दल आपले कौतुक व अभिनंदनच करायला हवे. विदर्भातील साहित्यिकांसाठी तर युगवाणी हे एकमेव (सध्यातरी) व्यासपीठ आहे.

या अंकातील डॉ. वि. भि. कोलते सरांचा कै. दत्तो वामन पोतदारांवरील अत्यंत अभ्यासपूर्ण लेख, डॉ. गोविंद देशपांडे यांचा लेख, खूप आवडले. कविता, ग्रंथवाचक चळवळ, साहित्य संस्थांची मुखपत्रे, अभिजात कलावंतावरील (कै. भाऊसाहेब समर्थ) आपला लेखही अगदी 'व्रती' शब्दाला शोभणारा आहे. संपादकीय, मांडणी, रचना, व शुद्धलेखनही उत्कृष्ट आहे. 'युगवाणी' अशीच प्रगती करो ही इच्छा !

– श्रीपाद के. चितळे, नागपूर

संपादक, 'युगवाणी' नागपूर
स. न. वि. वि.

एमेजू–९० नंतर तब्बल एक वर्षानंतर युगवाणीचे दर्शन होत आहे. मधल्या अनुपस्थितीची उणीव, अंशत: तरी, भरून निघावी म्हणून जुलै १९९१ चा अंक भरगच्च असावा असे वाटते. हा अंक विविधतेने नटलेला आहे आणि अंकातील बहुसंख्य लेख दर्जेदार आहेत. अंकात मधूनमधून पेरलेल्या भाऊ समर्थांच्या रेखाचित्रांमुळे अंकाच्या दर्शनीयतेत मौलिक भर पडली आहे. ही चित्रे पाहून रोशाच्या 'इंक ब्लॉट्स'ची आठवण आली. शाईचे हे निर्विकार ठिपके पाहून जो तो आपापल्या मानसिक जडणघडणीप्रमाणे त्या ठिपक्यांत आकार शोधतो. मनोमापनाचे व व्यक्तित्व दर्शनाचे हे 'प्रक्षेपण तंत्र' होय. रोशाच्या ह्या कसोट्यांचे प्रमाणीकरण करण्यात आले आहे. भाऊ समर्थांच्या चित्रांचा अशा प्रकारे उपयोग होऊ शकेल असे वाटते. त्यायोगे मनाच्या डोहात दडून असलेल्या भावभावना, विकृती ह्यांचा शोध घेता येईल. एखाद्या संशोधकाने ह्या दिशेने प्रयत्न करून पहावा. युगवाणीला अपेक्षित टिपणांच्या यादीत ह्या विषयाची भर घालता येईल 'भाऊ समर्थांची रेखाचित्रे व मनोवगाहन' ह्या विषयाच्या अभ्यासासाठी विद्यापीठांच्या मानसशास्त्र विभागाची, मुंबईच्या मनोविश्लेषण शास्त्रज्ञांच्या संस्थेची आणि मानसोपचार–तज्ज्ञांची साथ मिळविण्याचा प्रयत्न करून पाहण्याजोगा आहे.

युगवाणीच्या टिपणांच्या यादीत अजून एका विषयाची भर घालता येईल का ह्याचा आपण विचार करावा. सामाजिक गरजेतून 'व्यवसाय मार्गदर्शन' चालू झाले आहे त्यासाठी काही साहित्य तयार झाले आहे. होत आहे व होत राहणार आहे ह्या साहित्याला साहित्यिक मोल नाही तरी पण अशा साहित्याची नोंद टिपण स्वरूपात युगवाणीने घ्यायला हरकत नसावी व्यवसाय मार्गदर्शनाचा भाग म्हणून काही मानसशास्त्रीय कसोट्या तयार होतात. त्यांचीही तोंड ओळख टिपणातून करून देता येईल.

'सर्जनशीलतेची कसोटी' मराठीमधून तयार झाली आहे. ह्या कसोटीला मानसशास्त्रीय मूल्य तर आहेच; पण त्याशिवाय साहित्यिक मूल्यही आहेच अशा साहित्याची युगवाणीने नोंद घ्यावी व त्या साहित्याशी वाचकांना परिचित करावे.

युगवाणीने आपल्या कवेत असे काही विषय घ्यावेत ही नम्र सूचना.

– ह. ग. पाटील
अकोला

स. न. वि. वि.

'युगवाणी'च्या जुलै '९१ च्या अंकातील डॉ. सु. बा. कुलकर्णी यांचा 'ज्ञानेश्वरीतील शृंगारविश्व' हा लेख वाचला. हा लेख म्हणजे डॉक्टर साहेबांचा जो आवडता सिद्धांत-ज्ञानेश्वरांची आयुर्मर्यादा ऐंशी वर्षांची होती-तो सिद्धांत सिद्ध करण्यासाठी केलेली ओढाताण वाटते.

त्यांच्या म्हणण्यानुसार ज्ञानेश्वरांची शृंगार वर्णने ही स्वानुभवावरच आधारलेली असली पाहिजेत; पण काव्यात वा ललित वाङ्मयात वर्णिलेली प्रत्येक गोष्ट स्वानुभवावरून आधारलेली असली पाहिजे, असा नियम आहे काय ? 'पण लक्षात कोण घेतो !'मधील गतभर्तृकेचे अनुभव स्वतः हरिभाऊ आपट्यांनी घेतले होते असे म्हणणे सयुक्तिक होईल काय ? रघुवंशात, मेघदूतात किंवा शाकुंतलात येणारी आकाशभ्रमणाची किंवा अंतराळातून घडणाऱ्या पृथ्वीच्या दर्शनाची वर्णने कालिदासाने स्वतः त्यांचा अनुभव घेऊन मगच केली असे म्हणता येईल काय ? Science Fiction किंवा विज्ञानकथांतून त्या त्या लेखकांनी केलेली वर्णने स्वतः त्या त्या गोष्टींचा प्रत्यक्ष अनुभव घेऊन केली असे म्हणणे योग्य ठरेल काय ? कवीला किंवा लेखकाला आपल्या प्रतिभासामर्थ्याने परमन:प्रवेशाची कला साधलेली असते व म्हणूनच 'जे न देखे रवी, ते देखे कवी' ही म्हण प्रचलित झाली. ज्ञानेश्वर हे प्रतिभासंपन्न कवी होते, याबद्दल वाद होण्याचे कारण नाही. मग आपल्या प्रतिभेच्या जोरावर त्यांनी ही सर्व वर्णने केली असे मानल्याने, त्यांना कोणता कमीपणा येतो ? त्यासाठी ज्ञानेश्वर हे संसारी जीवन जगले होते, असे मानण्याची काय गरज आहे ? केवळ डॉ. कुळकर्णी यांचा ज्ञानेश्वरांच्या दीर्घायुष्याचा सिद्धांत सिद्ध करण्यासाठी ज्ञानेश्वरांना आपले ब्रह्मचर्य सोडण्यास भाग पाडावे लागते. त्यास दुसरे कोणतेही प्रमाण नाही.

आद्य शंकराचार्यांच्या जीवनातील एका प्रसंगामुळे तर डॉ. कुलकर्णी यांना ही कल्पना सुचली नसेल ? शंकराचार्यांनी मंडनमिश्राचा वादात पराभव केला. पण मंडनमिश्राची पत्नीही विदुषीच होती. तिने सांगितले की 'मी मंडनमिश्रांची अर्धांगी आहे. म्हणून जोपर्यंत माझा पराभव होत नाही, तोपर्यंत मंडनमिश्रांचा पराभव झाला, असे म्हणता येणार नाही. असे म्हणून तिने शंकराचार्यांना कामशास्त्रातील प्रश्न विचारले. शंकराचार्य हे बालब्रह्मचारी असल्याने त्यांना या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी अमरुक राजाच्या मृत शरीरात प्रवेश करून या सर्व शृंगारचेष्टांचा अनुभव घ्यावा लागला व मग त्यांनी या प्रश्नाची उत्तरे मंडनमिश्राच्या पत्नीला दिली. अशा रीतीने स्वानुभव हा त्यांच्या उत्तरांचा आधार ठरला शंकराचार्य हेही ज्ञानेश्वरांप्रमाणे बालब्रह्मचारी. अल्पायुषी व प्रतिभासंपन्न होते. हे त्यांच्यातील साम्य लक्षात घेऊनच कदाचित डॉ. कुलकर्णी यांना या लेखाचे स्फुरण झाले असावे. शंकराचार्यांप्रमाणे ज्ञानेश्वर हेही योगी होते. तेव्हा शंकराचार्यांनी आपल्या योगसामर्थ्याने जसा परकायाप्रवेश केला. तसा ज्ञानेश्वरांनाही करता आला असता, अशीही एक शक्यता आहे. ती डॉ. कुलकर्णी यांनी विचारात घेतलेली दिसत नाही.

खऱ्या प्रतिभासंपन्न व्यक्तीला स्वानुभवाची गरज नसते. परमन:प्रवेशाची कला त्यांना साध्य झालेली असल्याने इतरांना अगम्य असणाऱ्या गोष्टीसुद्धा त्यांच्या मानसिक (शारीरिक नव्हे) अनुभवाच्या कक्षेत येऊ शकतात. या अर्थानेच त्यांची वर्णने स्वानुभवावर आधारलेली असतात असे म्हणणे योग्य ठरेल.

रा. पां. निपाणीकर,
इस्लामपूर (जि. सांगली)

ग्रंथसहवास : कार्यवृत्त

श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालयातर्फे विविध ठिकाणी ग्रंथसहवासाचे आयोजन

रामनगर-मरारटोली

ग्रंथसहवास ही वि. सा. संघाची चळवळ आता लोकप्रिय होत आहे. जुलै व ऑगस्ट महिन्यात या उपक्रमातर्फे पुढील कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

१३ जुलै रोजी रामनगरच्या मरारटोली या उपेक्षित वस्तीत ग्रंथसहवासने दोन कार्यक्रमांचे आयोजन केले. त्यापैकी पहिला कार्यक्रम बालवाङमय प्रदर्शनाचा, या वस्तीतील मारोती मंदिरात आयोजित करण्यात आला. या वस्तीतील बालवाचकांनीही आपल्या आवडीची पुस्तके विकत घेतली. सायंकाळी श्री. वसंत सहस्त्रभोजनी यांच्या निवासस्थानी 'नवे ग्रंथ-नवे समीक्षक' तसेच ग्रंथ-सहवासचा कार्यक्रम घेण्यात आला. त्या कार्यक्रमात आनंद सहस्त्रबुद्धे यांनी 'टांकसाळीतील नाणी', सौ. सुनंदा साठे यांनी 'परवाचीच गोष्ट' व मनीषा मढीकर यांनी 'ध्रुवपद' या पुस्तकांचे परीक्षण केले.

कोराडी

ग्रंथसहवासचा जुलै महिन्यातला दुसरा कार्यक्रम कोराडी येथील विद्युत मंडळ वसाहतीत झाला. या कार्यक्रमात ग्रंथप्रदर्शनाबरोबरच स्थानिक कलावंतानी विनोदी लेखवाचन व नटसम्राट नाटकातील प्रवेश सादर केले.

अणे दालन / वि. सा. संघ

जुलै महिन्यातील तिसरा कार्यक्रम लोकनायक अणे दालनातच घेण्यात आला. या कार्यक्रमाला नागपूर विद्यापीठाच्या मराठी उदबोधन वर्गाला आलेले विद्यार्थी प्रामुख्याने उपस्थित होते यावेळी आधुनिक मराठी समीक्षेचा आढावा घेणारे ग्रंथप्रदर्शन मुद्दाम आयोजित करण्यात आले. सुमारे १००० ग्रंथ त्यात ठेवण्यात आले होते.

बजाजनगर

ऑगस्ट महिन्यातील पहिला कार्यक्रम १ ऑगस्ट रोजी बजाजनगरमधील कस्तुरबा भवनात आयोजित करण्यात आला होता. टिळक पुण्यतिथीनिमित्त टिळक अभ्यास साधने हे ग्रंथप्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्‌घाटन वि. सा. संघाचे माजी सरचिटणीस श्री. गो. काशीकर यांनी केले.

अहिल्या देवी मंदिर-धंतोली

ऑगस्ट महिन्यातील २ रा कार्यक्रम ९ ऑगस्ट रोजी देवी अहिल्या मंदिरात 'मैत्रीय' या स्त्री-संघटनेच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात मराठी चरित्र वाङ्मय हा विषय घेण्यात आला व ग्रंथप्रदर्शन आयोजित करण्यात आले. याच कार्यक्रमात घराघरात ग्रंथाचे प्रेम कसे वाढेल यावर उद्‌बोधक चर्चा आयोजित करण्यात आली. त्यात अनेक ग्रंथप्रेमी भगिनींनी भाग घेतला.

भंडारा

ग्रंथसहवासचे आज पर्यंतचे कार्यक्रम नागपूर शहरात झाले. ११ ऑगस्ट रोजी नागपूरच्या बाहेर भंडारा येथे ग्रंथ सहवासचा कार्यक्रम करून एका नव्या पर्वाला प्रारंभ केला. वि. सा. संघाच्या

भंडारा शाखेच्या सहकार्याने सहकार मंदिर भंडारा येथे ग्रंथसहवास, नवे ग्रंथ—नवे समीक्षक हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. ह्या कार्यक्रमात भंडारा शाखेचे अध्यक्ष अॅड. गुप्ते व माधुरी सुतोने यांची फार मदत झाली.

ग्रंथ देणगी

सुप्रसिद्ध समीक्षक डॉ. यशवंत मनोहर यांनी सुमारे १००० ग्रंथांची देणगी शिवाजी संदर्भ ग्रंथालयाला दिली आहे. डॉ. मनोहर यांच्या मूअल्य देणगीमुळे शिवाजी संदर्भ ग्रंथालय समृद्ध झाले आहे.

कै. सत्यभामाबाई गाडगीळ पुरस्कार

ग्रंथसहवास हा वि. सा. संघाचा उपक्रम पश्चिम महाराष्ट्रातही ग्रंथप्रेमिकांचे लक्ष वेधून आहे. सुप्रसिद्ध कथाकार गंगाधर गाडगीळ यांना ग्रंथसहवासची कल्पना खूपच आवडली. त्यांनी आपल्या मातोश्री कै. सत्यभामाबाई गाडगीळ यांच्या स्मरणार्थ रु. १०००/- ग्रंथसहवासचा पुरस्कार जाहीर केला आहे. आपल्या घरात उत्तम ग्रंथसंग्रह करणाऱ्या व्यक्तीस दरवर्षी तो दिल्या जाईल. ■

साभार पोच

अश्वत्थपत्र / शिरीष शांताराम कवडे / श्रीवामनराज प्रकाशन, पुणे / रु. १०/– [पृ. ३४]

सांज मोहरते तेव्हा / „ / संतकृपा प्रकाशन पुणे रु. ५/–

एक लेखक आणि एक खेडे / जया दडकर / पॉप्युलर प्रकाशन (म–३२४) रु. ९५/- [पृ. १२८]

ऋतुचक्र / अंक ५४ / इंदोर / रु. ३/– [पृ. ४५]

युरेका / विश्वनाथ खैरे / संमत प्रकाशन, पुणे / रु. १५/– [पृ. ४०]

पहल–४० / पहल–४१ / सपा. ज्ञानरंजन / जबलपूर / रु. १२/–

मला आई व्हायचंय / डॉ. भाल. पाटील / पॉप्युलर प्रकाशन (म–५५८) रु. १००/– [पृ. २९३]

परामर्श / तत्वचिंतक ज्ञानेश्वर विशेषांक / पुणे विद्यापीठ प्रकाशन / रु. २ /– [पृ. १६६]

भारताचा राजकीय परिसर / शरच्चंद्र गोखले / श्रीविद्या प्रकाशन, पुणे / रु. ५०/– [पृ. १४८]

शोध / अनिल दामले / श्रीवीद्या प्रकाशन, पुणे / रु. १००/- [पृ. २८]

किनारा तुला पामराला / उज्ज्वला पाटील-धर / श्रीविद्या प्रकाशन, पुणे / रु. ६०/– [पृ. १५७]

पास्कुआल दुआर्तेचा परिवार / कामीलो खोसे सेला/अनु: वसंत गद्रे / वहिनी प्रकाशन, पुणे / रु. ४०/–

सुवर्णाच्या प्रदेशात / मुरलीधर सायनेकर / रश्मी प्रकाशन, पुणे / रु. ७५/– [पृ. १५०]

व्यासोच्छिष्टम् / प्रभाकर वैद्य / अभिनव प्रकाशन / रु. १५/– [पृ. ११०]

समकालीन हिंदी कविता / संपा-अनु. चंद्रकांत पाटील / पॉप्युलर प्रकाशन / म–७१७ / रु. १२५/–

गीत ज्ञानेश्वरी / श्रीपाद गंगाधर कावळे / विश्वभारती प्रकाशन, नागपूर / रु. २५/– [पृ. ६४]

वामनवाडा / रामनाथ चव्हाण / श्रीविद्याप्रकाशन, पुणे,/ रु. ४०/- [पृ. ८३]

घटस्फोटाकडे / प्रतिभा घीवाला / श्रीविद्या प्रकाशन / रु. ५०/– [पृ. ९१]

| सं | मे | ल | न | | वि | शे | ष |

विशेष कार्यवृत्त :
भंडारा
जिल्हा साहित्य संमेलन : ३

"झाडीपट्टीने आपली बोली सांभाळावी" –हरिश्चंद्र बोरकर

१७ फेब्रुवारी १९९१ रोजी एक दिवसीय तिसरे भंडारा जिल्हा मराठी साहित्य संमेलन यशस्वीपणे पार पाडले. भंडारा व लाखनी या शाखांनी अशी संमेलने याअगोदरच आयोजित केली होती.

या संमेलनाचे अध्यक्ष होते भंडारा जिल्ह्यातील रेंगेपारचे (कोहळी) साहित्यिक व सध्याचे सिंधुदुर्गचे शिक्षणाधिकारी (जि. प.) हरिश्चंद्र बोरकर ! उद्घाटक म्हणून मार्क्सवादी विचारवंत व समीक्षक डॉ. वि. स. जोग यांची निवड झाली होती.

हे संमेलन पाच टप्प्यात विभागले गेले होते.

(१) उद्घाटन सोहळा. (२) भंडारा जिल्ह्यातील मान्यवरांचा सत्कार. (३) कथाकथन (४) कवी संमेलन. (५) सांगता समारंभ !

ठरल्याप्रमाणे सकाळी ठीक ९–३० वा उद्घाटन सोहळ्याला सुरुवात झाली. स्थळ होते रिक्रीएशन क्लबचे सभागृह !

अध्यक्ष हरिश्चंद्र बोरकर, उद्घाटक डॉ. वि. स. जोग, प्राचार्य राम शेवाळकर, द. सा. बोरकर, सत्कार मूर्ती बापूसाहेब लाखनीकर, प्राचार्य गो. मो. कोलते व प्रा. कृष्णा चौधरी याशिवाय स्थानिक शाखेचे शाखाध्यक्ष मधुकर कनेर, स्वागताध्यक्ष डॉ. चंद्रमोहन गुप्ता, उपाध्यक्ष द्वय माधवराव ब्राम्हणकर व रत्नाकर सालकडे व या संमेलनाचे सूत्रधार शाखा सचिव हिरामण लांजे व्यासपीठावर होते.

उद्घाटनाचा औपचारिक सोहळा आटोपताच सत्कार समारंभाला सुरुवात झाली. भगीरथ प्रयत्नाने भंडारा जिल्ह्यात शैक्षणिक गंगा प्रवाहित करणाऱ्या बापूसाहेब लाखनीकरांचा. त्यांच्या अमृतमहोत्सवी वर्षाप्रीत्यर्थ, या जिल्ह्यात साहित्यिक चळवळ गतिमान करण्यासाठी विशेष योगदान दिल्याबद्दल प्रा. कृष्णा चौधरी, रामटेक, व साहित्य निर्मितीची प्रक्रिया अखंड सुरू ठेवल्याबद्दल प्राचार्य गो. मो. कोलते, तिरोडा, यांचा या प्रसंगी वि. सा. संघ, अध्यक्ष प्राचार्य राम शेवाळकर यांच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

समाजसेविका श्रीमती लिलाताई गुप्तेच्या वतीने त्यांचे सुपूत्र ॲड. गुप्ते यांनी सत्काराचा स्वीकार केला. तर या जिल्ह्याचे साहित्य महर्षी ना. रा. शेंडे व प्रसिद्ध कवी भा. आ. पांढरीपाडे प्रकृती अस्वास्थ्यामुळे सत्काराला उपस्थित राहू शकले नाही. सर्वांच्या वतीने बापूसाहेब लाखनीकरांनी सत्काराला उत्तर दिले.

स्वागताध्यक्ष चंद्रमोहन गुप्ताचे छापील भाषण वि. सा. संमेलनाची आठवण करून देणारे ठरले. प्राचार्य राम शेवाळकरांनी आपल्या मंत्रमुग्ध करणाऱ्या अमोघ वक्तृत्वातून भंडारा जिल्ह्याची महती गायिली. डॉ. वि. स. जोगांचे देखील यावेळचे भाषण प्रभावी ठरले. 'साहित्यिकांनी दिवा बनावे, दिवाभीत बनू नये' असा त्यांनी सल्ला दिला.

अध्यक्ष हरिश्चंद्र बोरकरांचे चार पानी छापील भाषण साहित्य संमेलनातील भाषणाच्या तोडीचे, दर्जेदार स्वरूपाचे होते. कोकणात सध्या त्यांची सेवा असल्यामुळे त्यांनी कोकण व भंडारा जिल्ह्याची समृद्धी अनेक बाबतीत समान असल्याचे सांगितले. परंतु कोकणने आपली समृद्धी साहित्यात चित्रित करून सर्वांना सादर केली. भंडाऱ्याने आपले समृद्ध भांडार उद्ध्वस्त होत असल्याचे

उघड्या डोळयांनी पाहिले. म्हणून झाडीपट्टीने आपली बोली सांभाळावी असे त्यांनी कळकळीचे आवाहन केले.


तीन वक्त्यांचे विद्वत्तापूर्ण वक्तृत्व परिचर्चा करणारे ठरले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन घनश्याम डोंगरे यांनी केले.

कथाकथनाची सूत्रे होती वि. सा. संघ लाखनी शाखा सचिव द. सा. बोरकर यांच्या हाती !

एकूण दहा कथाकारांनी भाग घेतला. कवी संमेलनाचे सूत्रसंचालक होते नागपूरचे तीर्थराज कापगते ! कवींचा परिचय प्रा. कृष्णा चौधरी घडवित होते. यात नागपूरची कवियित्री कु. शर्मिला तिवारीसह जिल्ह्यातील एकूण २६ कवींनी भाग घेतला.

तुमसरचे शाखा सचिव प्रा. अशोक काळे यांची कविता लक्षवेधी ठरली. लाखनीच्या र. स. गिऱ्हेपुंजेंनी आपल्या सुरेल गायकीने रसिकांना रंजविले तर भंडाऱ्याच्या विठ्ठल लांजेवारनी गुंगविले. कवी दवलत, रमानंद, प्रल्हाद सोनवाने, डॉ. गुप्ता, राम महाजन, नाथ घरडे, कृष्णा चौधरी, तीर्थराज कापगते, बु. दा. भदाडे यांच्या कविता प्रभावी ठरल्या. शेवटी प्रा. कृष्णा चौधरी यांनी श्रोत्यांतर्फे अभिप्राय व्यक्त केला. द. सा. बोरकरांनी लाखनीला होऊ घातलेल्या वि. सा. समेलनाची कल्पना दिली. ■

द. सा. बोरकर
लाखनी



विदर्भ साहित्य संघ

उपकर्ते सभासद

१. श्री. वि. बा. उपाख्य दादासाहेब चितळे, नागपूर	५००१ /-
२. श्री. ना. शांतारामजी पोटदुखे, चंद्रपूर	५००१ /-
३. श्री. अरुण दिगंबर वरणगावकर, अमरावती	५००१ /-
४. श्री यशवंतराव एकनाथ कुळकर्णी, चंद्रपूर	५००१ /-
५. सौ उज्वल यशवंतराव कुळकर्णी, चंद्रपूर	५००० /-
६. श्री. जयंत मामीडवार. चंद्रपूर	५००० /-
७. श्री. दत्तात्रय वा. काशीकर, चंद्रपूर	५००१ /-
८. श्री. दशरथ माधवराव शिडाम. चद्रपूर	५००० /-

विदर्भ साहित्य संघाला लाभलेल्या उपरोक्त उपकर्ते सभासदांनी केलेल्या आपल्या सहकार्यावद्दल विदर्भ साहित्य संघातर्फे त्यांचे आभार मानून विदर्भ साहित्य संघ आपल्या परिवारात त्यांचे स्वागत करीत आहोत.

सुरेश द्वादशीवार
अध्यक्ष, विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ नागपूर

केंद्रीय कार्यवृत्त दि. १ जुलै ९१ ते ३१ ऑगस्ट १९९१

सोमवार दि. ८ जुलै, १९९१

विदर्भ साहित्य संघ व भारतीय विचार साधनेच्यावतीने आयोजित "१९९१ ची निवडणूक व नंतरचे चित्र" या विषयांवरील एका परिसंवादाचे आयोजन करण्यात आले.

परिसंवादात श्री. मा. गो. वैद्य व प्रा. प्रभाकरराव चांदे, प्रा. काशीकर यांनी विचार व्यक्त केले.

या परिसंवादात श्रोत्यांमधून प्रमोद पाठक, प्रा. बाळासाहेब पांडे, प्रकाश एदलाबादकर, यांनी आपापले विचार मांडले. डॉ. कुमार शास्त्री यांनी आभार मानले. भारतीय विचार साधनेचे नागपूर शाखेचे सचिव प्रा. श्रीकांत देशपांडे यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

भारतीय विचार साधनेतर्फे या कार्यक्रमात अॅड पु. मो. सोनटक्के उपस्थित होते.

गुरुवार दि २५ जुलै, १९९१

विदर्भ साहित्य संघातर्फे नव्या अर्थसंकल्पासंबंधाने एका परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. अध्यक्षस्थानी दै. तरुण भारतचे मुख्य संपादक श्री. लक्ष्मणराव जोशी हे होते.

या परिसंवादात प्रा. डॉ. कुमार शास्त्री, डॉ. श्रीनिवास खांदेवाले, प्राचार्य योगानंद काळे, श्री नरेश गद्रे, व डॉ. शेणवाई यांनी भाग घेतला. विदर्भ साहित्य संघाच्या वतीने आयोजित केलेल्या या परिसंवादाचे संचालन श्री. प्रकाश एदलाबादकर यांनी केले.

गुरुवार दि. १ ऑगस्ट, १९९१

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या छायाचित्रास पुष्पहार अर्पण करुन आदरांजली अर्पण करण्यात आली.

केंद्रीय अर्थ राज्यमंत्री शांतारामजी पोटदुखे यांचा सत्कार

रविवार दि. ४ ऑगस्ट, १९९१

विदर्भ साहित्य संघाचे माजी चिटणीस केंद्रीय अर्थ राज्यमंत्री ना. शांतारामजी पोटदुखे यांचा वि. सा. संघाच्या गडकरी सभागृहात विदर्भ साहित्य संघातर्फे सत्कार करण्यात आला.

मंत्रीमहोदयांनी या प्रसंगी वि. सा. संघाच्या शिवाजी संदर्भ ग्रंथालयासही भेट दिली. ग्रंथालयाच्या वतीने अंध विद्यार्थ्यांसाठी ब्रेल लिपीतील पुस्तकांचा विभाग नुकताच सुरू करण्यात आला आहे. यावेळी ब्रेल लिपीत पुस्तके तयार करण्याच्या कार्यक्रमाचा शुभारंभ केंद्रीय अर्थ राज्यमंत्री शांतारामजी पोटदुखे यांच्या उपस्थितीत झाला.

या प्रसंगीच्या प्रास्ताविकात विदर्भ साहित्य संघाच्या विविध नवीन योजनांसंबंधी अध्यक्ष प्रा. सुरेश द्वादशीवार यांनी माहिती दिली. १९९३ मध्ये विदर्भातील नाट्य चळवळींचा आढावा घेणारा एक बृहतकोश तसेच ऋग्वेद काळापासून ते इ. स. १९९० पर्यंतच्या कालखंडांचा 'विदर्भ संस्कृती कोश' प्रकाशित करण्याचे महत्वाकांक्षी प्रकल्प वि. सा. संघाने हाती घेतले असून त्यासाठी

विद्वानांशी संपर्क साधण्यात आला आहे. आणि या कोशांची पूर्ण तयारी म्हणून दोन दिवसांच्या कार्यशाळेचे आयोजनही करण्यात येत आहे अशी माहितीही त्यांनी दिली.

वि. सा. संघाने सुमारे सहा कोटी रुपयाची सांस्कृतिक संकुलाची व्यापक योजना हाती घेतल्याचेही प्रा. द्वादशीवार यांनी यावेळी सांगितले.

वि. सा. संघाच्या या सर्व योजनांसाठी श्री. शांतारामजी पोटदुखे यांचाकडून मदतीची अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

वि. सा. संघाचे पूर्वाध्यक्ष प्राचार्य राम शेवाळकर यांच्या हस्ते श्री. शांतारामजी पोटदुखे यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. वि. सा. संघाच्या वतीने अध्यक्ष प्रा. सुरेश द्वादशीवार यांनी ना. पोटदुखे यांना मानचिन्ह देऊन त्यांचा सत्कार केला. तसेच सौ. सुधाताई पोटदुखे यांचे स्वागत सौ. शोभाताई उपगडे यांच्या हस्ते करण्यात आले.

युगवाणीचा अंक संपादक श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी ना. शांतारामजींना भेट दिला.

नारायण मुद्रणालयातर्फे मधुसूदन बनहट्टी, विद्या प्रकाशनातर्फे श्रीपाद मुंजे, वैदर्भीय लेखिका संघातर्फे सुगंधाबाई शेंडे, महिला कॉंग्रेस समितीतर्फे कमलाताई हांडे, राजाराम वाचनालयातर्फे दिलीप खरे, साहित्य प्रसार केंद्रातर्फे राजाभाऊ कुळकर्णी, महाराष्ट्र उद्योजक मंडळातर्फे श्री. दिलीप देवघर, श्री. संजय मिश्रीकोटकर आदी व्यक्तींनी ना. पोटदुखे यांचा यावेळी सत्कार केला.

साहित्य क्षेत्राने माझे जीवन समृद्ध केले असल्याने या क्षेत्राचे मी देणे लागतोच, असे श्री. पोटदुखे यांनी आपल्या उत्तराच्या भाषणात सांगितले.

वि. सा. संघाच्या विकास योजना अतिशय धाडसी आहेत आणि त्या पूर्णत्वास नेण्यासाठी वि. सा. संघाला कोणतीही अडचण आपण भासू देणार नाही, असे आश्वासन केंद्रीय अर्थ राज्य-मंत्र्यांनी यावेळी दिले, तेव्हा उपस्थित श्रोत्यांनी टाळ्यांच्या कडकडाटात स्वागत केले.

साहित्याच्या माध्यमातून विदर्भ साहित्य संघाने गावांचा चेहरामोहरा बदलविण्याचे महत्त्व-पूर्ण काम केले आहे. असेही श्री. पोटदुखे यांनी सांगितले.

या समारंभाच्या अध्यक्षस्थानावरून बोलतांना प्रा. राम शेवाळकर म्हणाले की, संस्कृतीची भूक ही मानवाच्या प्रगतीची सूचक आहे. असे सांगून प्राचार्य शेवाळकर म्हणाले की, आजकाल ही भूकच लागत नाही, असे दिसून येते. शांतारामजींसारख्या कलेची कदर सणाऱ्या माणसाचा प्रभाव राजकारणात जाणवावा, अशी अपेक्षाही प्राचार्य शेवाळकर यांनी व्यक्त केली.

मंगळवार दि. १३ ऑगस्ट, १९९१.

विदर्भ साहित्य संघ व पु. भा. भावे स्मृति समिती तर्फे कै. पु. भा. भावे यांचा १९ वा स्मृतिदिन आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी श्री. प्रभाकर पणशीकर हे होते.

'महाराणी पद्मिनी' नाटकातील पद्मिनीचे स्वगत या प्रसंगी सादर करण्यात आले. तसेच मुंबईच्या कु. लीना राणे यांनी भाव्यांच्या 'सीता' या कथेचे कथन केले.

पु. भा. भावे स्मृती समितीचे श्री. प्रभाकर चाफेकर यांनी समितीच्या कार्याचा आढावा घेतला.

याप्रसंगी एम. ए. मराठीत प्रथम आलेले श्री. अनिल नितनवरे, "पत्रकार पु. भा. भावे" या विषयावरील निबंध स्पर्धेत प्रथम पुरस्कार मिळविणारे प्रा. म. ना. लोही व पु. भा. भावे वक्तृत्व स्पर्धेतील यशस्वी स्पर्धकांना श्री. प्रभाकर पणशीकर यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आले. वि. सा. संघाचे अध्यक्ष प्रा. सुरेश द्वादशीवार यांचेही यावेळी भाषण झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य राम शेवाळकर हे होते.

कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन प्रकाश एदलाबादकर यांनी केले.

बुधवार दि. १४ ऑगस्ट १९९१.

सुप्रसिद्ध संशोधक, अभ्यासक व विदर्भाचे थोर साहित्यिक कै. डॉ. य. खु. देशपांडे यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या छायाचित्रास हार अर्पण करून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

गुरुवार दि. १५ ऑगस्ट, १९९१.

स्वातंत्र्यदिनानिमित्त ध्वजारोहण व ध्वजवंदनाचा कार्यक्रम झाला. या प्रसंगी कार्यकारिणीचे स्थानिक सदस्य व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमानंतर उपस्थितांना मिठाई वाटण्यात आली.

शनिवार दि. १७ ऑगस्ट, १९९१

डॉ. सौ. आशा सावदेकर संपादित "कविता विदर्भाची", केशव जोशी संपादित "युगवाणी साहित्य सूची" आणि श्री. कुंदर दिवाण लिखित "छंदःशास्त्र : एक अध्ययन" या तीन पुस्तकांचे प्रा. शेवाळकर यांच्या हस्ते वि. सा. संघाच्या गडकरी सभागृहात समारंभपूर्वक प्रकाशन करण्यात आले. तसेच डॉ. सौ. आशा सावदेकर, श्री. केशव जोशी, श्री. कुंदर दिवाण आणि या पुस्तकांचे मुद्रक श्री. मधुसूदन वनहट्टी यांचा प्राचार्य शेवाळकर यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

डॉ. वि. भि. कोलते यांनी दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन केले. प्रा. राम शेवाळकर प्रा. शा. वा. स्वान, डॉ. जगन्नाथ नाईकवाडे आणि डॉ. व. वि. कुळकर्णी यांची या पुस्तकांची समीक्षा करणारी भाषणे झाली. वि. सा. संघाचे कार्याध्यक्ष वामन तेलंग यांनी त्यांचे स्वागत केले.

याच समारंभात ज्येष्ठ साहित्यिक व वि. सा. संघाचे पूर्वाध्यक्ष, नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. वि. भि. कोलते यांच्या हस्ते पूर्वाध्यक्ष प्रा. राम शेवाळकर यांच्या कार्याचा गौरव शाल, श्रीफळ आणि स्मृतिचिन्ह देऊन करण्यात आला. याप्रसगी बोलतांना डॉ. भाऊसाहेब कोलते यांनी प्रा. राम शेवाळकरांच्या साहित्यिक सेवेचा गौरव केला. विदर्भ साहित्य संघाचे कार्य प्रा. शेवाळकरांच्या कारकीर्दीत अधिक जोमाने विस्तार पावेल असेही, डॉ. कोलते यांनी सांगितले.

अमरावतीहून विदर्भ साहित्य संघ नागपूरला स्थानांतरित झाला, याची आठवण करून देत वि. सा. संघाने अमरावतीला वि. सा. संघाचे एखादे संकुल उभारावे, अशी सूचना देखील डॉ. कोलते यांनी यावेळी केली. अध्यक्ष प्रा. द्वादशीवार यांनी ही अपेक्षा पूर्ण होण्याचे दृष्टीने वाटचाल होत असल्याचे सांगितले.

विदर्भ साहित्य संघाने केलेल्या सत्काराबद्दल प्रा. राम शेवाळकर यांनी कृतज्ञता व्यक्त केली. हा सत्कार म्हणजे आपल्यावर असलेल्या साहित्य संघाच्या व मराठी रसिकांच्या प्रेमाची पावतीच

आहे. असे ते म्हणाले, कार्यक्रमाचे संचालन आणि आभारप्रदर्शन श्री. प्रकाश एदलाबादकर यांनी केले.

रविवार दि. १८ ऑगस्ट, १९९१

प्रसिद्ध दलित साहित्यिक कै. अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या छाया-चित्रास हार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली.

मुख्यमंत्री ना. सुधाकरराव नाईक यांचा सत्कार

बुधवार दि. २१ ऑगस्ट. १९९१

आपल्या नागपूर दौऱ्यात मुख्यमंत्री नाईक यांनी विदर्भ साहित्य संघाला आपण भेट देण्याचे आश्वासन दिलेले होते. त्याची पूर्तता त्यांच्या भेटीने झाली.

मुख्यमंत्र्यांनी विदर्भ साहित्य संघाच्या शिवाजी संदर्भ ग्रंथालयातर्फे चालविल्या जाणाऱ्या ब्रेल लिपी विभागाला भेट दिली. त्यावेळी मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत कु. राधा इखणकर या अंध विद्यार्थिनीने साने गुरुजींच्या "श्यामची आई" या प्रसिद्ध ग्रंथाचे ब्रेल लिपीत टाईप रायटरवर टंकलेखन केले. सौ. कुंदा केळापुरे यांनी या ग्रंथातील त्या भागाचे वाचन केले.

विदर्भ साहित्य संघाच्या सांस्कृतिक संकुलाच्या भव्य आणि महत्वाकांक्षी प्रकल्पाची देखील मुख्यमंत्र्यांना माहिती करून देण्यात आली. या प्रकल्पासाठी चटईक्षेत्र निर्देशांक वाढवून देण्याच्या वि. सा. संघाच्या अर्जावर विचार करून योग्य तो निर्णय घेण्यात येईल, असे मुख्यमंत्री नाईक यांनी यावेळी सांगितले. शेवाळकर डेव्हलपर्सचे श्री. आशुतोष शेवाळकर यांनी मुख्यमंत्र्यांना सांस्कृतिक संकुलाची योजना समजावून सांगितली.

गडकरी सभागृहात माननीय मुख्यमंत्र्यांच्या अभीष्टचिंतनाचा कार्यक्रमही आयोजिण्यात आला होता. वि. सा. संघाच्या वतीने प्रा. सुरेश द्वादशीवार यांनी शाल व श्रीफळ देऊन ना. सुधाकरराव नाईक यांचे अभीष्टचिंतन केले. वि. सा. संघाचे कार्याध्यक्ष श्री. वामन तेलंग यांनी त्यांना स्मृतिचिन्ह भेट दिले. वि. सा. संघातर्फे प्रकाशित पुस्तकांची भेट श्री. चंद्रकांत कुळकर्णी यांनी दिली. युगवाणीचा ताजा अंक सपादक श्री. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी मुख्यमंत्र्यांना दिला. युगवाणी मधल्या काळात प्रकाशित होऊ शकली नाही त्याबाबत मुख्यमंत्र्यांनी अडचणी काय त्या विचारून युगवाणीची आस्थेने विचारपूस केली. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी मुख्यमंत्र्यांना परिस्थिती विशद केली.

सरचिटणीस मनोहर म्हैसाळकर यांनी ५००१ रुपये रकमेचा धनादेश नागपूर जिल्ह्यातील मोवाड येथील पूरग्रस्तांच्या मदतीसाठी मुख्यमंत्री ना. नाईक यांच्या स्वाधीन केला.

नागपूर महापालिकेने अन्य साहित्यिक व सेवाभावी संस्थांना आपल्या करातून मुक्त केले आहे. वि. सा. संघ मात्र म. न. पा. करापोटी ४० हजार रुपये दरसाल भरीत आहे. या करातून वि. सा. संघास मुक्त करण्यात यावे असे निवेदन देखील मुख्यमंत्रांकडे अध्यक्ष प्रा. द्वादशीवार यांनी केले. तसेच अंध विद्यार्थ्यांसाठी पुस्तके तयार करण्याकरिता संगणक यंत्रसं आणण्याची संस्थेची योजना मुख्यमंत्र्यांसमोर अध्यक्षांनी मांडली.



स्वागत!

लाखनी येथे होऊ घातलेल्या
विदर्भ साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून
विदर्भातील आदिवासी जीवन व वाङ्मयाचे
गाढे अभ्यासक डॉ. भाऊ मांडवकर
यांची निवड झाली. युगवाणी व
विदर्भ साहित्य संघातर्फे त्यांचे अभिनंदन!

◆◆◆



मराठीतील आजच्या आघाडीच्या कथालेखिका
सौ. आशा बगे यांनी विदर्भ साहित्य संघातर्फे
आयोजित करण्यात यावयाच्या
पहिल्या लेखिका संमेलनाचे अध्यक्षपद
भूषविण्यास स्वीकृती दिली.
युगवाणी व वि.सा. संघातर्फे
त्यांचे आभार व अभिनंदन!

◆◆◆



श्रद्धांजली...

विदर्भाच्या मातीतील एक जेष्ठ कवी लेखक
श्री. पां. श्रा. गोरे यांचे नुकतेच निधन झाले.
युगवाणीची त्यांना विनम्र श्रद्धांजली!

◆◆◆

प्रकाशक मनोहर म्हैसाळकर, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, नागपूर-१२
मुद्रक मधुसूदन पांडुरंग बनहट्टी, नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर-१२

PRINTED MATTER PERIODICAL युगवाणी / ऑगस्ट '९१ / मूल्य दहा रुपये
…चित्र : शंकर महाकाळकर

सत्कारास उत्तर देतांना माननीय मुख्यमंत्र्यांनी वि सा. संघाचा 'वैदर्भीय संस्कृती कोश' हा प्रकल्प आणि साहित्य व संस्कृतीच्या चळवळीशी संबंधित अन्य प्रकल्पांना आपण शक्य ती सर्व मदत करू असे नि:संदिग्ध आश्वासन यावेळी दिले.

अंध विद्यार्थ्यांसाठी चालविल्या जाणाऱ्या ब्रेल लिपी प्रकल्पासाठी ना. सुधाकरराव नाईक यांनी मुख्यमंत्री निधीतून १२ लाख रुपयांची देणगी देखोल याप्रसंगी जाहीर केली. त्यापैकी सोबत आणलेला १० लाख रुपयांचा धनादेश मुख्यमंत्र्यांनी वि. सा. संघाचे अध्यक्ष प्रा. सुरेश द्वादशीवार यांच्या स्वाधीन केला.

कार्याध्यक्ष श्री. तेलंग यांनी उपस्थितांचे व पाहुण्यांचे आभार मानले. कार्यक्रमऱ्चे संचालन श्री. प्रकाशश एदलाबादकर यांनी केले.

शुक्रवार दि. २३ ऑगस्ट, १९९१

विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष प्रा. सुरेश द्वादशीवार, कार्याध्यक्ष वामन तेलंग व सरचिटणीस श्री मनोहर म्हैसाळकर यांनी वि. सा. संघाच्या कारंजा (लाड) शाखेस भेट दिली. वि. सा. संघाचे ४५ वे संमेलन कारंजा (लाड) येथे घेण्यासंबंधाने तेथील पदाधिकाऱ्यांशी चर्चा झाली. वि. सा. संघाचे ४५ वे संमेलन येत्या एप्रिल १९९२ मध्ये (कारंजा) लाड येथे घेण्यात यावे असे ठरविण्यात आले.

शनिवार दि. २४ ऑगस्ट, १९९१

विदर्भ साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष व सुप्रसिद्ध ज्येष्ठ कवि, लेखक पांडुरंग श्रावण गोरे यांचे नुकतेच निधन झाले. वि. सा. संघाचे अध्यक्ष प्रा. सुरेश द्वादशीवार, कार्याध्यक्ष श्री. वामन तेलंग व सरचिटणीस श्री. मनोहर म्हैसाळकर यांनी यवतमाळ येथे कै. पां श्रा. गोरे यांचे निवासस्थानी जाऊन श्रद्धांजली अर्पण केली

लाखनी येथे येत्या ऑक्टोबर महिन्यात संपन्न होणाऱ्या ४३ व्या विदर्भ साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ भाऊ मांडवकर यांना शुभेच्छा देऊन त्यांचा वि. सा. संघाचे अध्यक्ष प्रा. सुरेश द्वादशीवार, कार्याध्यक्ष श्री. वामन तेलंग व सरचिटणीस श्री. मनोहर म्हैसाळकर यांनी कळंब येथे सत्कार केला.

मनोहर म्हैसाळकर

सरचिटणीस



महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना. श्री सुधाकरराव नाईक यांनी विदर्भ साहित्य संघाला नुकतीच भेट देऊन, या संस्थेपुढील समस्या तसेच संस्थेच्या योजना जाणून घेतल्या. या प्रसंगी युगवाणीचा वाङ्मयीन नियतकालिक विकास परिषद विषयक विशेषांक युगवाणीचे संपादक श्री. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी मुख्यमंत्र्यांना भेट दिला.

मराठीतील वाङ्मयीन नियतकालिकांच्या दुर्दशेचा आढावा घेऊन त्यांच्या उत्तरोत्तर विकासाच्या समस्यांवर उपाययोजना शोधण्याकरता विदर्भ साहित्य संघातर्फे आयोजित मराठी वाङ्मयीन नियतकालिकांच्या इतिहासातील अशा पहिल्याच परिषदेचा समग्र वृत्तांत व परिषदेतील चर्चा या अंकात प्रकाशित झालेली आहे.
या परिषदेतील मागण्यांचे तीव्र पडसाद महाराष्ट्राच्या विधानपरिषदेत श्री. लक्ष्मण माने व श्री. ना.धो. महानोर, यांच्या प्रयत्नांमुळे उमटले असून महाराष्ट्र शासनाच्या वतीने शिक्षणमंत्री डॉ. पतंगराव कदम यांनी या नियतकालिकांच्या संदर्भातील भीषण आर्थिक समस्यांवर उपाययोजना सुचविण्याकरता एक समिती नेमण्याची घोषणा देखील नुकतीच केलेली आहे. युगवाणीनेच एप्रिल-जून-८९ व जुलै-सप्टेंबर-८९ च्या आपल्या प्रदीर्घ संपादकीयातून या समस्येला प्रथम वाचा फोडून काही उपाय सुचविलेले होते. पुढे युगवाणीतूनच ही मोहीमही चालविली व यासंबंधीच्या परिषदेचे आयोजनही केले होते. येथील नागपूर पत्रिका, लोकमत, तरुण भारत इ. दैनिकांनी देखील युगवाणीने चालविलेल्या या मोहिमेस संपूर्ण सहकार्य करून नियतकालिकांची समस्या ही एकूणच विकासाचीच समस्या समजून जनमत देखील तयार केले.
आपल्या भेटीत मुख्यमंत्री ना. सुधाकरराव नाईक यांनी वर्षभर युगवाणी का निघू शकली नाही याची आस्थेने चौकशी करून त्याची कारणेही जाणून घेतली.